
# बारा गावचं पाणी

# बारा गावचं पा

वसन्त बापट



# बा रा  गा व चं  पा णी



पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

वसंत बापट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# बारा गावचं पाणी

REFBK-0013679

चित्रे : यशवंत चौधरी

© वसंत बापट

पहिली आवृत्ती १९६६।१८८७

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
**ग. रा. भटकळ**
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ WR

ज्येष्ठ पण प्रिय मित्र राऊसाहेब पटवर्धन यांस—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 20262 वि: ...
क्रमांक 368 नों: दि: 10.2.6

# अनुक्रम


| | |
|---|---|
| शेवटी भेटलेले पहिले गाव | १ |
| मनाली : माझी लाडकी | ७ |
| करकरीत कोरे चंडीगड | १५ |
| पहाडांची देखणी राणी | २५ |
| सो लॉंग शिलॉंग | ३५ |
| कॉकटेल पॉंडिचेरी | ४५ |
| रामेश्वरा, तूं कोठे रे गेलास? | ५५ |
| कन्याकुमारी | ६५ |
| भुताटकीचा मांडव | ७५ |
| उदे उदे उदेपूर | ८५ |
| जनानी जयपुरी | ९७ |
| सौंदर्यतीर्थ कोणारक | १०७ |
| ऐका काशीनगरीची कहाणी | ११७ |
| बारा गावचं पाणी | १२९ |

## ऋणनिर्देश

*१९६३ मधे आंतरभारती विश्वस्तनिधीने मला एक वर्षाची प्रवासवृत्ती दिली. या काळात मी भारताचा प्रवास करावा अशी अपेक्षा होती. त्याबद्दल मला लिहिलेल्या पत्रात विश्वस्तप्रमुखांनी आपला हेतू स्वच्छ लिहिला होता : See and dream.*

*मी तेच केले. त्यातूनच निर्माण झालेले हे ललित.*


*आंतरभारती विश्वस्तनिधीने उपलब्ध करून दिलेल्या संधीचा उपयोग मी भरपूर करावा म्हणून, राष्ट्र सेवा दल पुढे सरसावले. कॅमेरा, टेपरेकॉर्डर, इतकेच नव्हे तर नवी कोरी फियाट मोटर...हे सारे सेवा दलाने माझ्या प्रवासासाठी दिले. श्री० लीलाधर हेगडे यांना सेवादलाने माझ्याबरोबर पाठवले आणि त्यासाठी आर्थिक साहाय्यही केले. या सर्व कामात गोव्याचे मुख्य मंत्री श्री० दयानंद बांदोडकर यांचीही मोठी मदत झाली.*

*परत आल्यावर मी जे लेखन केले त्यातील नगरकौतुकाचे लेख या पुस्तकात एकत्र येत आहेत. 'पहलगाव'वरचा लेख 'साधने'त आणि बाकी सारे 'रविवारच्या लोकसत्ते'त प्रकाशित झाले.*

*या प्रवासात श्री० लीलाधर हेगडे यांनी बरीच छायाचित्रे घेतली; श्री० यशवंत चौधरी यांना सजावटीसाठी या छायाचित्रांचा अतिशय उपयोग झाला.*

—वसंत बापट

अनुक्रम 70002 दि:
36



# शेवटी भेटलेले पहिले गाव



बनिहाल खिंडीपासून एखाद्या काथ्याच्या सतरंजीच्या गुंडाळीसारखा उलगडत येणारा रस्ता अनंतनागजवळच्या एका तिठ्यावर येऊन थांबतो. एका प्रचंड चिनारवृक्षावर आदळल्यामुळे या प्रवाही रस्त्याचा ओघ दुभंगतो. डाव्या हाताला वळा, सोळा कोसांवर श्रीनगर आहे. उजव्या हाताला वळा, सोळा कोसांवर पहलगाव आहे. सगळ्या मुशाफिरांचा रस्ता चुकतो तो इथेच. सगळे आपले वाममार्गाला लागतात आणि श्रीनगरात जाऊन कडमडतात. पहलगाव म्हणजे अर्थात (अक्षरशः) पहिले गाव. पण एवढा विवेक वेळीच न सुचल्यामुळे माणूस इतस्ततः भटकतो, दमतो, निवतो आणि मग शेवटी 'पहिल्या गावाला' जातो!

तेच केले आणि पस्तावलो!

श्रीनगरात आठ दिवस मुक्काम करायची बुद्धी कोठून झाली, असा अनुताप व्हावा इतके पहलगाव देखणे निघाले. खरे पाहिले तर इतक्या देखणेपणाची अपेक्षा कोणी ठेवलेली नसते. शिवाय, हे देखणेपण तरी कसे? सुंदर घरे, आखीव रस्ते, गोपुरे आणि मंदिरे, सौध

आणि अट्टालिका, माड्या आणि महाले, बागा आणि बगीचे यांनी निर्माण केलेला नखरा पहलगावच्या गावीही नाही. टुमदार एकमजली घरटी, लख्ख सारवलेली अंगणे, इटुकल्यामिटुकल्या फुलबागा असली निर्व्याज रम्यताही पहलगावला लाभलेली नाही. नेरूर, शिरोडे किंवा वालावलीला, पोसलेल्या केळी आणि मोरपिशी पोफळी यांच्या मखरांत दिसणारे न्हालेले सौंदर्यही पहलगावला नाही. तरीही पहलगाव सुंदर आहे! आपण एका नवलाईच्या ठिकाणी आलो आहोत असे वाटले की मुशाफीर खूष होतो; ही खुषी उत्पन्न करण्याची शक्ती पहलगावच्या वास्तूत आहे.

पहलगावला घेऊन जाणारा रस्ता जरा बनेल आहे! हुषार व्यापारी पहिल्यांदा सामान्य माल गिन्हाइकापुढे ठेवतो आणि माल न पटून गिन्हाईक निघून जाऊ लागले की फरकन एक नवा तागा त्याच्यापुढे करून विचारतो, 'का आहे की नाही अस्सल नग!' जाणारे गिन्हाइक पुन्हा मटकन खाली बसते आणि लोभावल्या नजरेने मालाचा पोत न्याहाळू लागते. पहलगावचा रस्ता असाच वस्ताद आहे. आधी कमालीचे आढेवेढे घेतो. मध्येच एखादा झरा, एखादे पाटस्थळ, एखादे बर्फाळ शिखर दाखवीत तिरकी मान करून तो आपल्याकडे पाहतो. "ठीक आहे, पण आवर्जून 'घरी' कळवण्याइतपत नाही!" अशा अर्थाची आपली मुद्रा पाहून पुन्हा निमूटपणे नवा माल दाखवू लागतो. आणि अखेर कंटाळून आपण जांभई द्यावी, बसच्या खिडकीवर डोके ठेवून पेंगण्याची सोय कितपत आहे ते पाहावे तो लिदार नदीच्या खळखळ पाण्याशेजारी उभे असलेले पहलगाव दत्त म्हणून पुढे उभे राहते.

पहलगाव! काय पण गाव! गावाला रस्ते किती असावेत? पायवाटा नाही विचारीत मी. रस्ते! शुद्ध रस्ते! लांब रुंद रस्ते! ते किती असावेत? निदान चार. एकही चौक ज्यात नाही ते कसले गाव! निदान तिठा असावा. पण छट्! पहलगावला एकच रस्ता आहे! त्याच्या दोहो तर्फांना घरे आहेत. या घरांना विशेष व्यक्तिमत्त्व असे काहीच नाही. बैठी घरे. एकमजली, फार तर दुमजली. तळमजल्यावर दुकाने आणि दुकानांच्या मागे किंवा डोक्यावर घरसंसार! आपल्या मुलखातही

अशी गावे नाहीत असे नाही. एकट्या मुंबईपुण्याच्या मार्गावरच चौक, खोपोली...यांचे रूप असेच आहे की! पण ही गावे म्हणजे वाटेवरची वाटगावे आणि घाटाखालची घाटगावे! पहलगावचे तसे नाही. अमरनाथच्या वाटेवरची पहिली बाजारपेठ असूनही त्याचे रूप केवळ कामचलाऊ नाही. घाटाच्या खोबणीत असूनही ते दिमाखाने घाटाच्या छाताडावरच मिरवत असल्यासारखे वाटते. एक वाट. इकडे घरे, तिकडे घरे. घरांच्या एका रांगेमागे स्वप्नातल्या नदीच्या पाण्याइतके स्वच्छ हसरे पाणी घेऊन जाणारी लिद्दार नदी. दुसऱ्या रांगेमागे, कंच हिरव्या वृक्षांनी झाकलेले उंच उंच डोंगर. एका रांगेतील घरे गिरिसंमुख. दुसरी नदीसंमुख. काहींच्या परसात क्रीडाशैल, काहींच्या तरंगिणी! मी मान्य करतो, हे थोडेसे 'गुहागर'सारखे झाले. गुहागरच्या एकमेव रस्त्यावर अशीच दुतर्फा घरे आहेत. त्यातल्या एका रांगेतील घरांच्या परसदारी समुद्राची गंभीर गाज घुमत असते...पण गुहागरच्या दुसऱ्या रांगेतील घरांमागे खाचरांशिवाय काहीच नाही! शिवाय खाऱ्या घामट हवेचा शाप त्याला आहेच. पहलगावला लाभलेली प्रसन्नता म्हणूनच खास त्याचीच आहे.

पहलगावचे मन अजून संभ्रमात आहे. आपण वसावे की वसू नये, हा निश्चय त्याला आजपावेतो करता आलेला नसल्यामुळे ते 'आहे–नाही'च्या सीमेवर उभे आहे. दोन शतकांपूर्वीच्या अमेरिकन गावासारखे ते दिसते. पिस्तुलबाज अमेरिकन चित्रपटात असते तसे. रस्त्याच्या टोकाला एक प्रचंड गुत्ता असता तर हे चित्र पुरे झाले असते. लाकडी पट्ट्यापट्ट्यांची घरे, घोडी (म्हणजे तत्सम प्राणी) आणि आजूबाजूचे विलक्षण सुंदर रान...ही सारी सामग्री तिथे आहे. उणीव आहे ती 'टॅव्हर्न'ची. तेवढे असते की सोनेरी झुलपांच्या सुंदरीसाठी ढो ढो गोळीबार करीत लढणारा हेन्री फोंडा किंवा गॅरी कूपर इथे सहजच दिसला असता असेच कुणालाही वाटेल. पण पहलगावचे लोक कसले! अगदी बिच्चारे! आणि आपल्या धारदार नाकापुढली निरुंद वाट चालणारे! आणि सुंदरी? 'अगा जे दिसलेच नाही' त्याविषयी काय बोलावे?

दिसते त्याविषयीच बोलतो तर. ज्या एकुलत्या एक रस्त्यावर कधी-कधी आपण फिरायला बाहेर पडतो, किंवा 'बाजार' करायला निघतो,

किंवा आणखी काही कामासाठी हिंडतो त्या रस्त्याला नदीची किनार आहे आणि डोंगरांची सोबत आहे. हे डोंगर आपले सदा सजलेलेच असतात. उघडेबोडके दिसायला यांना आवडत नाही. देवदार, फर आणि कंपनीचा कायम मुक्काम असल्यामुळे या डोंगरांना कातीव हिरवी वस्त्रे लपेटलेली असतात. या उंच उंच आणि दाटीवाटीने उभ्या असलेल्या देवदारूंच्या झाडीतून पाऊलवाटांचे जाळे पसरलेले आहे. हे जाळे लांबून दिसतच नसल्यामुळे आपण त्यात सहजी फसतो. या पायवाटांच्या अंगाअंगाने सोइस्कर हिरवळींचा तुकडा पाहावा आणि त्यावर एक तंबू ठोकून डेरेदाखल व्हावे, असा एक षौक इथे भलताच लोकप्रिय आहे. अर्थात, लोकप्रिय म्हणजे प्रवासीप्रिय ! इथला वस्तीकर कशाला राहुट्यांच्या फंदात पडेल ! पहलगावला प्रवेश करणाऱ्या प्रवाशांच्या डोळ्यांना हिरव्या पार्श्वभूमीवरील ही शुभ्र पिरॅमिडुकली फार फार सुखवतात. नदीच्या काठावर किंवा डोंगरांच्या अंगाखांद्यावर तंबूंचे कळपच्या कळप तयार होतात. हा तंबू उभारण्याचा धंदा इथे भलताच तेजीत आहे. प्रत्येक सैन्याबरोबर जर पहलगावकरांची एक छोटीशी टोळी ठेवली तर कसल्याही जागेत ती हां हां म्हणता छावणी उभारून देईल !

लिदार. एक नदी ! हिच्या काठावर कुठे घाण नाही. पण ही नदीच आहे ! हिचे पाणी कुठे साचत नाही. शेवाळी रंगाची साय कुठे धरत नाही आणि गाईगुरे हिच्यात डुंबत नाहीत. हिला घाट नाही. काठावर तीर्थ नाही की कुंड नाही ! पण ही आपली एक 'प्युअर' नदी आहे. कोणा देवाच्या जटेतून, अंगठ्यातून, कानातून, कमंडलूतून, यज्ञातून ही निघालेली नाही. म्हणून ही फार फार पवित्र आहे ! हिचा प्रवाह हा नावाप्रमाणे जोरात वाहणारा तर आहेच; पण हिचे पात्र शुद्ध पाषाणांच्या चढउतारांचे असल्यामुळे ही नेहमीच फेसाने डवरलेली असते. अनेक निर्झरिणींची व हिची गाठ पडते, म्हणून हिला नदीपण प्राप्त होते. पण हिची चाल शेवटपर्यंत निर्झरिणीची आहे. उड्या मारल्या तरी कशा बेताने. हिला प्रपात आणि उत्पात ठाऊकच नाहीत. शुभ्र कबुतरे रांगेने बसली आणि नाजुकनाजुक उड्या मारीत रांगेने पुढे सरकली तर जशी दिसतील तसा दिसतो हा प्रवाह. ही हिमदुहिता पहलगावसारखीच

संभ्रमात आहे. आपण निर्झरिणी की नदी हेही हिला नीटसे ठरवता आलेले नाही. म्हणून तर हिचे पाणीही भ्रमात फिरत असते. आपण अजून बर्फच आहोत असे त्याला वाटत असते. मला वाटते, लिदारच्या गारव्यामुळेच तिच्याशी कोणी फारशी सलगी करायला जात नसावे. परिणाम : कमालीची स्वच्छता !

पहलगावची सगळीच होटेल्स रम्य परिसरात आहेत. पण एक (अर्थात मी राहिलो ते !) विशेषच भाग्यवान आहे. होटेलचे अंगण संपले की, नदीचे पात्र सुरू होते. ते संपते तिथे एक प्रचंड पर्वत आपल्या छातीवर कोसळायला उभा आहे. त्याच्या सर्वांगावर हिरवा झगा आहे. पण त्यावर अधेमधे बर्फाचे जरीपट्टे आहेत. माथ्यावर झळझळीत मुकुट आहे. या मुकुटाची लबाडी अशी आहे की, तो चांदीचा आहे की सोन्याचा याचा नेमका छडा कधी लागायचाच नाही ! पहिल्यांदा तो भर दुपारी मला दिसला. म्हटले, हा रुप्याचाच ! रात्री चेटूक झाले. चंद्र उगवला. पाहता पाहता स्वारीने आपला रंग बदलला ! मुकुट सोन्याचा झाला. पहाटे डोळे चोळून पुन्हा पाहिले ! आता तर तो थोडा गुलाबी, थोडा निळा, थोडा शुभ्र आणि थोडा पिवळसर — एक रंगमय कोडेच होऊन बसला होता ! मग म्हटले, याच्या नादी लागण्यात अर्थ नाही... तसाच बाहेर पडलो. एकुलत्या एक रस्त्यावरून वरल्या अंगाला जाऊ लागलो. गावाची शीव सोडली. तोच समोरच्या क्षितिजावर एक शिखरराज असाच रंगदार गोतावळा घेऊन दोन छोट्या डोंगरांच्या खिंडीत उभे होते ! हॉटेलमध्ये परत आल्यावर समोरचा लबाड मुकुट मला म्हणाला — वुइ आर नॉट अलोन !

—



# मनाली : माझी लाडकी



मनाली! किती लाडके नाव! मनाली...छे, छे, खरे म्हणजे मनाऽऽऽऽली!! सलीमा, सकीना, रूपमती, रूपाली, तशीच ही मनाली. किती लाडात यावे लागते एवढा उच्चार करायला. पाहा स्वतःशी गुणगुणून. कोण आहे मनाली? ती आहे एक आटपाट नगरी. बस का? गावाचंच नाव का मनाली? असा विरस होऊ देऊ नका. जरा आपल्याशीच म्हणून पाहा...हॅव यू एव्हर बीन टु मनाली!

कुठे आहे मनाली? काश्मीरच्या आग्नेयेला, पंजाबच्या उत्तरेला, लाहोलच्या दक्षिणेला, हिमालयाच्या कुशीत. केवढी आहे मनाली? खेड्याहून मोठी आहे, शहराहून छोटी आहे. अटकर आहे. 'सुशीलेचे परि बाल्य सरत आले' एवढी आहे. कशी आहे मनाली? ती आहे मनालीसारखी. झोपेत चालणारी, झोपेत बोलणारी, झोपेत सफरचंदी स्वप्ने पाहणारी, नव्या जगाकडे, जमान्याकडे अर्धउघड्या तिरप्या नजरेने बघणारी प्रमीला! मनालीला कुणी जावे? ज्यांचे हिशेब नेहमी चुकतात, ज्यांची घड्याळे हरवलेली असतात, जे यंत्रातून बाहेर घरंगळतात, 'सुटी निवांतपणे घालवायची आहे' हे बॅड लावून ज्यांना

सांगायचे नसते, प्रकाशझोतांनी चुरचुरणारे डोळे ज्यांना निववायचे असतात, हिमालयात ज्यांना चौपाटी भरवायची नसते त्यांनी निमूटपणे जावे मनालीकडे. ती या किरकिऱ्या बाळांना थोपटीत अंगाई म्हणेल. कसे जायचे मनालीला? पठाणकोटातून, नुरपूरचा किल्ला डावीकडे घालून, जोगींदरनगरचा कडा चढून, मंडीच्या खिंडीतून, व्यास नदीच्या किनाऱ्याने, घाटातून 'आउट' होऊन, कुलू कुलू करीत देवदारांच्या गर्दीत शिरले की मनाली दर्शन देते. मात्र एक लक्षात ठेवा. पठाणकोटहून निघाल्यावर सारखे नागमोडी चालीनेच गेले पाहिजे. नाकासमोर सरळ रस्ता जातो, पण तो जातो पाताळाकडे! तेवढा टाळावा! मंडी ते कुलू हा प्रवास तर जपून केला पाहिजे. जपून म्हणजे मंत्र जपून! डावीकडे पाहावे, उजवीकडे पाहू नये. त्या बाजूच्या चिंचोळया दरीतून अंग घासटीत, कात टाकीत व्यास नदी खळखळते. दीड-दोन हजार फूट उंचीचे कडे या निरुंद पात्रात सूर मारण्यासाठी नवशिक्यासारखे बिचकून उभे असतात. ज्या दिवशी जिवाचा धडा करून एखादा कडा झेप घेईल त्या दिवशीची सनसनाटी बातमी भविष्यपुराणात दिली आहे: "कुलू खोऱ्यात कडा कोसळून साडेतीनशे ठार! ठार झालेल्यात एक कवी व तीनशे एकोणपन्नास धनगर! बकऱ्या मात्र शीरसलामत!!" या वाटेने जाताना आपल्या डोक्यावर काय आहे तेही पाहू नये. तिथे केवळ दीड वितीच्या अंतरावर गोवर्धन पर्वत अधांतरी टांगलेला असतो.

शहरचे वारे मंडीलाच पोटभर पिऊन घ्यावे. पुढे ते मिळणार नाही. जत्रेचे दिवस सोडले तर सगळे कुलू खोरे हिमालयाच्या थंड उबेत गप्पगार झालेले असते. तसे ते आहे पंजाबमध्ये, पण कुठेतरी घालायचे म्हणून ते पंजाबमध्ये घातलेले आहे एवढेच. वास्तविक हिमाचलातील वन्य जमातींशी कुलूचा अधिक निकट संबंध आहे. त्याहूनही कुलूकरांचा अधिक संबंध येतो लाहोल आणि स्पिती खोऱ्यातील मोंगोलवंशीय आदिवासींशी. कुलू आणि लाहोल खोऱ्यात अडसर म्हणून हिमालयाने आपली एक टांग टाकून दिली आहे. ही टांग ओलांडल्याशिवाय दोन्ही खोऱ्यांतली मंडळी एकमेकांना भेटणार कशी? ही टांग ओलांडायची असते त्या जागेला नाव आहे रोहटांग! चौदा

हजार फूट उंचीवरली ही खिंड हाच कुलू आणि लाहोलमधला दरवाजा. थेट तिबेटपासून निघालेले सौदागर आपली खेचरे घेऊन याच मार्गाने पोचतात कुलू खोऱ्यापर्यंत. पण रोहटांग उतरून आल्यावर अवघ्या पाच कोसांवर सौदागर थबकतात. कारण इथे आहे मनाली. उंच उंच देवदारू, फर, भूर्ज, असल्या जबरदस्त वृक्षराजांच्या पहाऱ्यात मनाली राहते. ती आपल्याच तंद्रीत असते. त्यामुळे सारे सौदागर आणि मुलखावेगळे मुशाफीर तिला मनसोक्त पाहू शकतात.

खोऱ्याची राजधानी कुलू. पण राणी आहे मनाली. कुलूला राहायचे ते सरकारी कामासाठी, जायचे ते पिठामिठासाठी. मनालीला जायचे ते मनालीसाठी. सगळी धांदल विसरून, सगळी धावपळ मिटल्यावर, तृष्णेची धाव खुंटल्यावर, केवळ आपल्या मनाला थोपटण्यासाठी मनालीला जायचे.

तसे पाहिले तर मनालीला पाहण्यासारखे काय आहे? न तेथे प्रेक्षणीय वास्तू, न निसर्गाचा रुद्रावतार. हिमालयाच्या एवढी निकट असूनही मनालीहून हिमदर्शन होणार नाही. अक्राळविक्राळ कडे आणि खोलखोल दऱ्या मनालीला नाहीत. नदी आहे, पण ती मोठ्या निर्झरा-सारखी. मंदिरे आहेत ती केवळ माणसाच्या वस्तीला हवीच असतात म्हणून. आणि घरे? ती असतात बैठी, फळकुटांची, निवाऱ्यापुरती. तिथला बाजार अगदीच गरीबडा. नाही म्हणायला...खास वाढवलेल्या दरात फॅशनेबल चिजा विकणारे एखादे स्टोअर, सीझनलादेखील खर्चीक गिऱ्हाइकांची वाट पाहणारे एखादे उपाहारगृह. मुख्य रस्ता एक; त्याला रुंदीपेक्षा लांबी फार. ब्रशच्या फटकाऱ्याने मनालीचे चित्र काढले तर ते कसे दिसेल? सुरवातीला आणि शेवटी एकदोन फाटे फुटलेला लांबलचक रस्ता. त्याच्यावर चित्रविचित्र कपड्यांतले नानावंशी स्त्री-पुरुष. आगेमागे उंच चढण असलेले डोंगर. त्याच्यावर जिथेतिथे देवदारांची घनगर्दी. जरा दूरावर खळखळत जाणारी ब्यास नदी. तिच्यावर कामापुरता पूल. पलीकडे डोंगरचढणीवर छोटी छोटी भातखाचरे. तिथेच वर दोन कुंडे, चार देवळे. डोक्यावर निळेभोर आकाश...मात्र या सर्व दृश्यांवर जादूगार झोपेने फिरवलेली जादूची कांडी!

हिंदुस्थानच्या अक्षरशः एका कोपऱ्यात आणि तिबेटच्या इतक्या शेजारी असलेल्या मनालीच्या अंगणाची राखण करण्यासाठी स्थलदेवता कशी भीषण असली पाहिजे! आणि ती आहेही तशीच. मनालीची देवता आहे हिडिंबा! गावालगतच्या पहाडात तिचे मंदिर आहे. घटोत्कचासारखे अगडबंब वृक्ष तिला सोबत करतात. मंदिर छोटे पण हिडिंबा राणीने तिथल्या लाकडी तुळवटांवर नक्षीदार काम करून घेतलेले आहे. मात्र पुजारी कसले लबाड; ते मुळी हिडिंबेला आपल्या मंदिरात राहूच देत नाहीत. त्यामुळे या शून्य मंदिरात हिडिंबेची मूर्ती कुणाला दिसणार नाही. ती पाहायची तर पुजाऱ्यांच्या घरी गेले पाहिजे. किंवा तिचे दर्शन घेण्यासाठी कुलूच्या जत्रेला गेले पाहिजे. तिथे दसऱ्याच्या दिवशी देवांची मिरवणूक निघते. त्यात अग्रपूजेचा मान असतो मनालीच्या हिडिंबेचा. सगळे देव, देवी सजून तयार झाल्यावर जरा उशिराने हिडिंबाराणी येते आणि मगच मिरवणूक हलू लागते. खरोखरच असेल का हा हिडिंबेचा मुलूख? असेलही कदाचित! तिला राहण्याजोगा घनदाट वनप्रदेश आहे खरा इथे.

डाव्या तिरावर हिडिंबा तर उजव्या तिरावर वसिष्ठ ऋषि अशी योजना व्यास नदीने केली आहे. रघुवंशाचा गुरू इतक्या दूरावर आश्रम बांधून का राहिला कोण जाणे! बाकी, तपोनिधींना दूर काय नि जवळ काय, ते पडले मनोवेग! एक सोय बरीक वसिष्ठ ऋषींनी बऱ्यापैकी करून ठेवली आहे: आश्रमाच्या आसमंतात गरम पाण्याची कुंडे आहेत. भाविकांना भोगमुक्ती आणि खर्जुल्यांना रोगमुक्ती देणाऱ्या या पाण्यात बुचकळी न मारणारे नास्तिकच अधिक सुखी असले पाहिजेत, इतका या पाण्याला गंधकाचा दर्प येतो! आपण आपले बाहेर उभे राहावे. नदीच्या पलीकडे सूर्यास्त रंगलेला असतो. समोरच्या टेंबावर पूर्ण एकांतवासात कलासाधना करणारा एक आधुनिक युरोपियन महर्षी राहत असे. त्याचे नाव रोरिक. हिमालयाची चित्रे रंगविण्याचा त्याला निदिध्यास होता. परत फिरताना शेतातल्या पांदीत थोडे रेंगाळायला हरकत नाही. बाजूच्या बटाट्यांच्या शेतात कोणी ग्रामतरुण


कोणा ग्रामतरुणीचा हात ओढीत असतो. हे नुसतेच पाहायचे! छायाचित्र घ्यायला गेल्यास कॅमेऱ्यावर ढेकूळ बसते!

उंच उंच राईतून चालता चालता सुकलेल्या पानांच्या सुया पावलांखाली कुजबूज करतात. समोरच्या हिरव्या उतारावर साधीभोळी तरवडांची, रानझेंडूंची पिवळी फुले रांगोळीसारखी ठसठशीत दिसत असतात. आपले मन फुलपाखरासारखे त्या फुलांकडे धावते. तोच त्या रंगवेड्या मनाला आपल्याकडे खेचून घेणारा एक मादक गंध वातावरणात दरवळतो. त्याची ओळख पटायला उशीर लागत नाही. तो गंध असतो रसरसून पिकलेल्या सफरचंदांचा. सर्व मनालीवर झुलत्या रेशमी वस्त्रासारखा हा गंध तलम पसरलेला असतो. रानटी झाडांच्या आणि घायपातांच्या गर्दीत मध्येच असतो सफरचंदाचा बाग. या इथल्या सोन्याच्या खाणी! मोठमोठी फळे, गहिरे गहिरे रंग, रसरशीत ताजेपणा आणि चोखंदळ खवैयालाही तृप्त करणारा स्वाद... ही सफरचंदांच्या सर्वच जातीची संपत्ती आहे. एकेकाची नावे तरी कशी? गोल्डन डिलीशस, रॉयल, रेड किंग, आणखी अशीच! या बागांमुळे मनालीच्या वनाला खरे म्हणजे गंधमादन हेच नाव शोभते.

मनालीच्या भोवती फिरताना वाट चुकावी. देवदारांच्या गर्दीत हरवून जावे. कुठल्यातरी कुंपणातून सफरचंदांच्या बागेतच घुसावे. शहरच्या पाहुण्या, खाऊन खाशील किती! एखादा रुपया मोजलास की चारसहा भलीमोठी रसरशीत सफरचंदे हाती पडतील. ती खाऊन घे. कापू नकोस. एकदम चावा घे. अशी संधी पुन्हा येणार नाही. शिवाय मनालीच्या चिमुकल्या बाजारात केळी चार रुपये डझन आहेत! सफरचंद खाताक्षणी परतीची वाट सापडेल! आणि नाहीच सापडली तर एखाद्या धनगराला वाट विचारावी.

गद्दा धनगर ही खास जमात आहे. सडसडीत बांधा, उंच देहयष्टी, धरधरीत नाक, डोळ्यात मिष्कील हासू आणि अंगात भरड लोकरी कपडे या थाटातला धनगर केवळ शापित यक्षगंधर्व असणार हे उघड आहे! मोंगोल चेहऱ्यांच्या आदिवासी गर्दीत धनगर कसे रेखीव, कोरीव दिसतात. त्यांची हसरी पोरे उराशी लाडकी कोकरे कवटाळून


मजेत पायपीट करीत असतात. मनालीत दुसरे काही नाही तरी ही पोरे आणि कोकरे पाहिलीच पाहिजेत. बाकी काही न पाहाता तिथे राहावे, नुसते राहावे. अंगभर गुंगी भरून घ्यावी, डोळे जडावू द्यावे. हिरवे-निळे रंग मनावर माखावे. लाल सोनेरी सफरचंदे श्वासाने फुप्फुसांत ओढून घ्यावी. आणि परत फिरावे लागलेच तर धनगराच्या पोराने कोकरू धरावे तशी मनाली आपल्या छातीशी धरूनच !





...ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
दि: ..................
नों: दि: ..................

# करकरीत कोरे चंडीगड



प्रत्येक शहराला आपले म्हणून एक व्यक्तिमत्त्व असते. इंद्रियांच्या अनेक संवेदनातून ते आकार घेत जाते. शहरातले रस्ते आणि गल्ल्या, वाड्या आणि माड्या, तिथला बाजार, तिथल्या वसणुकीचे प्रकार, स्त्रीपुरुषांचे पेहेराव, बागा आणि उजाड जागा, मंदिरे-मशिदी, संस्था आणि संघटना अशा अनेक घटकांनी हे व्यक्तिमत्त्व घडविलेले असते. त्याला वेटाळून टाकणारी एक गंधांची दुनिया असते. अमृतसरच्या बाजारात येणारा वड्डीचा वास आणि म्हैसूरच्या राजरस्त्यावर येणारा रेशमी चंदनाचा सुगंध यात असलेल्या फरकामुळे तर ही शहरे अगदी भिन्न असल्याचा बोध ठसतो! प्रत्येक शहरात गजबज ही असायचीच. पण लुधियानाची गजबज वेगळी, दिल्लीची वेगळी, बनारसची वेगळी आणि अमदाबादची तद्दन जुदी! शब्द, गंध आणि रूप यांनी हे विश्व उभे केलेले असले तरी ते काही तडकाफडकी उभविता येत नाही. 'रोम एका दिवसात बांधून झाले नाही' या वचनाचा तरी खरा अर्थ काय आहे? रोमचे राजवाडे आणि इर्गिज, घाट आणि राजमार्ग बांधायला अनेक शतके लागली एवढाच जर या

वचनाचा अर्थ असेल, तर त्याला फारसा अर्थ नाही! रोम शहराच्या नामोच्चारासरशी अनुभवांचे वा कल्पनांचे, सफलविफल स्वप्नांचे, जाणीवनेणिवांचे, प्रकाशतिमिरांचे...सकल संवेदनांचे जे कोंभावर कोंभ उगवतात, जी वर्तुळे नादझंकारांसारखी उठतात, तिथल्या इतिहासाचे जे वजन जाणवते, वैराग्य आणि कलासाधना यांची जी एकत्र नांदणूक लक्षात येते, प्राचीन मानव समाजाच्या जबर महत्त्वाकांक्षेचा जो प्रत्यय येतो, खुपसलेले खंजीर आणि ढासळलेल्या साम्राज्यांची जी विराट चित्रे उभी राहातात त्या सर्वांनिशी अस्तित्व मिरवणारे रोम एका दिवसात बांधून झालेले नाही, असा त्या प्रसिद्ध वचनाचा अर्थ केला पाहिजे. एखादा अचाट शक्तीचा विश्वकर्मा एकच काय पण शंभर निर्जीव नगरे एका दिवसात उभी करू शकेल. आधुनिक विज्ञानाला आणि तंत्रज्ञानाला अशक्य काय आहे? पण या निर्जीव नगरांना जर चैतन्य अर्पण करायचे असेल, व्यक्तिमत्त्व द्यायचे असेल, या बिनचेहऱ्याच्या वास्तूंना जर चेहरा-मोहरा निर्माण व्हायला हवा असेल, त्यांच्या शरीरांना त्यांचा म्हणून एक गंधगुण लागायला हवा असेल तर मात्र पुष्कळ थांबावे लागेल. विश्वकर्म्यांची मोठी फौज आली तरी तिला हे जमणार नाही. अनेक शतकांची पुटे चढल्याशिवाय, उन्हात भाजून, पावसात भिजून, थंडीत काकडून निघाल्याशिवाय, काळाशी लढल्याशिवाय, जखमांच्या खुणा अंगभर दिसू लागल्याशिवाय वसतीला स्वतःचे रंगरूप येत नाही. शहरही मुरावे लागते!

हा केवळ जुन्याचा अभिमान नाही. तसे पाहिले तर मला जीर्ण वास्तूंविषयी काहीच म्हणावयाचे नाही. मोठमोठ्या राजवाड्यांविषयी कसलाही लोभ धरावयाचा नाही. राजवाडे बांधले जातात ते पुढे पाडले जावे म्हणूनच! ऋषिमुनी आले, त्यांनी आपले काम केले, ते गेले. बरे झाले. आता ते फिट्ट बसलेही नसते. राजेमहाराजेही आता काळाच्या उदरात गडप झाले. हेही ठीकच. ऋषींना, राजांना महात्म्यांना, हुतात्म्यांना, प्रतिभावंतांना जमाना असतो, कालखंड असतो. पण शेतकऱ्यांना, कामकऱ्यांना, कारागिरांना, सौदागरांना अखंड काल असतो. त्यांची परंपरा कधी तुटत नाही. त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट ही की घरांना, बाजारांना, चावड्यांना कोणी पुरातत्त्व म्हणून

मुद्दाम जगवत नाही! ती आपल्या जन्माने जन्माला येतात, ताकतीने जगतात, मरणाने मरतात! म्हणून कोणत्याही शहराचे खरे रहस्य सामान्यांच्या वाडीवस्तीत लपलेले असते. त्याचा रंग, त्याचा गंध, त्याचा शब्द, तिथे ठरतो. पुष्कळ मुशाफिरांच्या लक्षात ही गोष्ट येत नाही. राखण करून जतन केलेले पुरातनत्व आणि आपोआप जिवंत राहिलेले सनातनत्व यात फार फरक आहे.

चंडीगडला आज हीच उणीव भासत असते! पंजाबची राजधानी चंडीगड, शून्यामध्ये वसलेली ही वसाहत मोठ्या जिद्दीने, कौशल्याने, विचाराने वसवलेली आहे. पण विचारपूर्वक केलेल्या या रचनेत विकारांचे सौंदर्य अजून निर्माण झालेले नाही. आगापिछा नसलेल्या एखाद्या बाजिंद्यात जशी खानदानीची उणीव अकारण जाणवत राहाते, तसे चंडीगड पाहताना होते. हा दोष चंडीगडचा नाही. त्याच्या नवेपणाला, ताजेपणाला, बाह्य रचनेतील कुशलाईला असलेला हा स्वाभाविक शाप आहे.

चंडीगड! ल कार्बूझिएने दगडामातीत खिळवलेले एक वर्धिष्णु स्वप्न. ज्या झपाट्याने चंडीगड जन्माला आले आणि वाढले तो पाहिला की क्षणात विश्व उभे करणाऱ्या विश्वकर्म्याच्या वंशजांनीच ते घडविले हे कोणीही म्हणेल. दहा वर्षे......इतिहासाच्या प्रदीर्घ प्रवाहातला इवलासा तुकडा. १९४८ मध्ये विमानातून जागेची पाहाणी झाली. १९४९ मध्ये भूप्रदेशाचा अभ्यास झाला. अमेरिकन नगर-रचना-तज्ज्ञ आल्बर्ट मेयर याच्या साहाय्याने कार्बूझिएने कल्पनांना दृश्य रूप द्यावयास सुरवात केली. १९५१ मध्ये नगराचा पाया घातला. १९५३ मध्ये राष्ट्राध्यक्षांनी नगराचे औपचारिक उद्घाटन केले. आणि अवघ्या तीनचार वर्षांच्या अवधीत भव्य सरकारी इमारती, कोर्ट-कचेऱ्या, इस्पितळे, शिक्षणसंस्था, हॉटेले, थिएटरे, बाजारांसकट वीस हजार लोकांची वसती तेथे वसविण्यात आली! पिण्याच्या पाण्याचे नळ, भुयारी सांडपाणी-व्यवस्था, रस्ते, वीज या सर्व सोयींसकट! आता तर बागा आणि पुष्करणी झाल्यापासून सालंकृत चंडी मोठी नेटकी दिसायला लागली आहे. हे सगळे काम ज्या 'कोऱ्या पाटी'वर झाले ती पाटी तरी कशी? औरसचौरस पंधरा मैलांचे क्षेत्रफळ,

उजाड मुरुमाड्या मातीचे. वर गहन निळे आकाश. एका बाजूला रुसून बसलेल्या टेकड्या, उत्तरेची वेस राखण्यापुरत्या. उजव्याडाव्या कुशीजवळ दोन नद्या. आसपास उफाड्याची शेती. काश्मीर, हिमाचल प्रदेश यांना जवळ करणारे पंजाबचे हे हृदयस्थान. मूळ जमिनीवर अक्षरशः एकही खेडे नाही, वाडी नाही. अगदी निश्चितपणाने या निर्वेध भूमीवर एक आटपाट नगर वसवायची संधी मिळणे हेच वास्तुशिल्पज्ञाचे एक अचाट स्वप्न खरे ठरण्यासारखे आहे!

पाहिले तर नवी दिल्ली नव्यानेच वसली. पण फार थोड्या वेळात ती मूळ दिल्लीशी बेमालूम सांधा जोडून बसली. शिवाय, प्रचंड सत्तेने झपाटलेल्या त्या लोकोत्तर वास्तूतून इंग्रजांची छावणी उठल्यावर, जुनी साम्राज्ये पचवणाऱ्या हस्तिनापुराशी, इंद्रप्रस्थाशी तिचे सरळच नाते जमले. नव्या दिल्लीचे वय फार नसले तरी तिची खानदानी जातकुळी लपत नाही! इथली माती महापुरुषांच्या, प्रभावी सत्ताधीशांच्या चरणांखाली मळली गेली आहे हे तिथे सर्वत्र जाणवत राहाते. तिथली हवाही कशी मदधुंद आहे. चंडीगडची माती अजून उठवळ वाटते आणि हवा हलकी!

यावरून, चंडीगडमध्ये सौंदर्य नाही, असा निष्कर्ष कोणी काढू नये. वाहतुकीच्या प्रवाहाविषयी अंदाज बांधून आखलेले शानदार रस्ते आणि त्यांच्या तिरांवर वसलेली घाटदार घरे यांनी हे नवे नगर कसे टापटिपीचे वाटते. घर असो की बाजार, निवासस्थान की व्यवहारकट्टा, सर्वत्र आधुनिक शिल्पाचा सरळमार्गी रंधा फिरलेला आहे. समाजाचे तेरा थर कल्पून त्यांच्यासाठी वेगवेगळ्या आकार-मानांची घरे तयार केली आहेत. या घरांचे तीस समुदाय आहेत. प्रत्येकी पंधरा हजार लोक राहतील अशा या तीस पेठाच आहेत म्हणा ना. माणूस कोणत्याही दर्जाचा असो, त्याला आपल्या परीने सुखसोय झाल्यासारखे वाटले पाहिजे. एक खोलीचे घर बाद. किमान दोन खोल्या, सज्जा, न्हाणीघर (वगैरे). उन्हाचा त्रास कमी व्हावा आणि हवा खेळती राहावी या किमान सोयी सर्व थरातल्या कुटुंबांना हव्यातच. अंतर्बाह्य सजावट सौंदर्यदृष्टीने केलेली, पण उधळपट्टीची नव्हे. 'त्यातल्या त्यात, पगाराच्या आत' असा न्याय! रविवारपेठेत

धान्य, सोमवारात लाकूड आणि मंगळवारात गूळ असला प्रकारही चंडीगडला नाही. प्रत्येक वस्तीला दैनंदिन गरजा भागविणारा स्वतंत्र बाजार काढून दिल्यामुळे कोणाला वणवण करायला नको. जसा बाजार वेगळा तशी शाळा वेगळी, वेगळा बगीचा, वेगळे पायरस्ते. थोडक्यात म्हणजे तीस छोट्याछोट्या नगरांचे मिळून केलेले एक मोठे नगर!

अर्थात या तीस पेठा, अगदी एकासारखी दुसरी अशा काही नाहीत. तसे असते तर मधमाशांच्या मोहोळात आणि शहरात फरक तो कसला राहाता? एका षट्कोनी कोनाड्याला दुसरा षट्कोनी कोनाडा जोडला की मोहोळ तयार होते. त्याला ल कार्बूझिए कशाला हवा? चाळी बांधणारा कोणीही कंत्राटदार चालला असता की! तेरा प्रकारची घरे, त्यांच्या दशा, त्यांचे वस्तीकर, त्यांच्या भिन्नभिन्न हौसामौजा या दृष्टीने विविधता तर निर्माण होतेच. मात्र ती मर्यादित विविधता असते. साचे वेगवेगळे केले तरी साचेबंदपणातून सुटका होत नाही. म्हणूनच की काय, मुख्यतः सरकारी बाबूंसाठी बांधलेल्या या शहरांत काही विभाग खाजगी घरबांधणीसाठी राखून ठेवले आहेत. पण ज्याला जे हवे ते त्याने बांधावे असला सवता सुभा मात्र कोणालाच मिळणार नाही. चंडीगडच्या चौकटीत जे बांधायचे त्याला शिल्पी महामंडळाकडून रुकार मिळाला पाहिजे. त्यामुळे खाजगी घरांचे रूपही चंडीगडच्या एकूण मानचित्रात चपखल बसेल. एकाने यावे, सहाखणी माडी बांधावी आणि वर टिनपाटाचे छप्पर घालावे; आणखी कोणी उठावे, त्याने भडक रंगाचा सज्जा असलेली एक बेडौल चाळ उठवावी; तिसऱ्या कोणा दानशूराने एखादे वेगडी सोनकळसाचे देऊळच बांधावे; असला प्रकार इथे चालणार नाही. वाटेल तसे वाढायला परवानगी नाही घरांना. सद्हेतूने केलेल्या शिस्तबद्धतेने माणसे कावून जाऊ नयेत म्हणून की काय, कार्बूझिएने आणखी एक युक्ती काढली. प्रत्येक वस्तीला स्पर्श करणारी एक नागमोडी पायवाट त्याने चंडीगडच्या अंगोपांगांतून नेली आहे. या पायवाटेभोवती हिरवे रान माजेल. त्या रानाला वाटेल तसे वाढायची परवानगी राहील!

टिपटाप टापटिपीच्या वस्त्यांपासून जरा फटकून असलेल्या

विद्यापीठाच्या आवारात प्रवेश केला की तिथला रेखीवपणा अधिकच डोळ्यात भरतो. भिन्नभिन्न ज्ञानशाखा सांभाळणाऱ्या भव्य नीटस इमारती, जगावेगळे असलेले खुले प्रेक्षागार, सुंदर वसतिगृहे यांच्या पसाऱ्यात अगदी निराळ्या सौंदर्याने भारलेले एक वास्तुशिल्प पुन्हा-पुन्हा पाहत राहावेसे वाटते. घाटदार गोलाईचे पाखे असलेली ही चिरेबंद वास्तु एका कृत्रिम पुष्करणीकाठी एखाद्या शिल्पस्थ हंसासारखी दिसते. विश्वविद्यालयाच्या आवारातले हे गांधीस्मारक आहे. त्याच्या शिरावरची पिरॅमिडसारखी टोपी सफेत ठेवलेली आहे, त्यामुळे तर हा शिलाहंस अधिकच उजळ दिसतो. इतके देखणे गांधीस्मारक क्वचितच कोठे असेल!

एका अंगाला विद्यापीठ तर दुसऱ्या अंगाला शासनमंदिर! अनुशासन आणि शासन नगरातल्या वर्दळीपासून जरा दूर असलेली बरी असा हा विचार असावा. पण शासनाच्या इमल्यांचे वैभव राजशाही असले तरी ती मुळाशी, जनपदांशी इमान राखून आहेत. त्यामुळे चक्रधारी श्रीमंतांसाठी ठेवलेल्या प्रांगणांभोवती, पायी चालणाऱ्या असंख्यांसाठी उंचावरून जाणारे मार्ग रचले आहेत. म्हणजे सरकारच्या दारात धनिक खालच्या स्तरावर आणि निर्धन वरच्या स्तरावर उभे राहतात! या विभागात म्हणजे 'कॅपिटॉल'मध्ये तीन वास्तूंचा समावेश होतो. वास्तविक प्रचंड चौकाच्या चारी दिशांना चार मंदिरे उभी करावी असा कार्बुझिएचा हेतु होता. पण काटकसर आणि टीका या उभय कारणांसाठी चौथे मंदिर उभे राहिले नाही. यात सर्वांत भव्य आहे ते सचिवालय; सर्वांत विक्षिप्त आहे ती विधानसभा आणि सर्वांत कलात्मक आहे ते न्यायमंदिर. सचिवालयात शेकडो खात्यांचे हजारो अधिकारी पुरुष बसणार. त्यांचे काम दैनंदिन शासनाचे, विधिमंडळाच्या कायद्यांनुसार कारभार करण्याचे. या कामातील निरलंकृत साधेपणा, त्याची उपयुक्तता, त्याच्याशी रोज घडणारा जनसंपर्क या साऱ्या गोष्टी ध्यानात घेऊन इमारत रचली आहे. उपयुक्तता आणि कार्य हेच येथे गुण असल्याने डामडौलाला फाटा आहे. साधी सरळ कार्यप्रवणता—फंक्शनल ॲस्पेक्ट—येथे सुंदर वाटते. या इमारतीच्या भिंती सिमिटाच्या मोठमोठ्या फरशांनी घडवल्या आहेत. त्यावर न गिलावा न रंग.

सिमिटाचा मूळ रंग इथे पाहावा. त्याच्या अनलंकृत, अनघड रूपातून जे सौंदर्य प्रत्ययाला येईल ते येथे पाहायचे. इमारतीच्या डागडुजीला, रंगरंगोटीला खर्च करायला नको आणि तरी तिच्या वेधकपणात उणीव राहू नये अशी तिची योजना आहे. नऊ मजल्यांची ही इमारत साध्या कच्च्या सिमिटाची खरी, पण दूरावरून तिचे दर्शन घेताना संगमरवरी वास्तू पाहिल्याचा आभास होतो. चौरस चौरस गाळ्यांचा एकसुरीपणा घालवण्यासाठी तिच्या वरच्या मजल्यांवर जो पादमार्ग–रँप–आरेखिला आहे तोही डौलदार वाटतो. गच्चीवर उपाहाराची सोय आहे. आतूनही अनेक उपयुक्त सोई केलेल्या असल्यामुळे कार्बुझिएच्या तंत्रात खर्च फार आणि जमा थोडी ही टीका खोटी आहे हे पटते.

विधानसभा एखाद्या प्रचंड नौकेसारखी...तीही वंग्राच्या बोटीसारखी दिसते. वादळात सापडलेल्या पंजाबच्या राजकारणाचे तर हे प्रतीक नाही ना ? की बिनधोक किनाऱ्याला लागाल असे लोकांना दिलेले हे आश्वासन ? विधानसभेची इमारत आवडावी असा खूप प्रयत्न करूनही ती मनाला रुचत नाही. कलावंताने केलेला प्रत्येक प्रयत्न सफल होतो थोडाच ! पण न्यायमंदिर पाहताना मात्र हे पटल मनावरून साफ दूर होते. न्यायमंदिराने लोकांना भिववू नये, आश्वासावे. त्याच्या सान्निध्यात उभे राहिल्यावर आदराने मस्तक झुकावे, पण त्याचे अस्तित्व नकोसे वाटू नये. न्यायमंदिराची इमारत न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक यांच्या मुद्रेसारखीच असावी ! तिच्याबद्दल आदर, दबदबा वाटत असतानाच, फाटलेल्या पोळलेल्या मनाला तिच्या दर्शनाने विसावा मिळावा. प्रचंड उंचीच्या पाच विभाजक भिंतींच्या कुशी तेवढ्या दर्शनी भागात दिसतात. त्यांना प्राथमिक पण झळझळीत रंग दिलेले आहेत. त्यांना स्तंभांची शक्ती आहे, कमानींचा प्रवाह आहे, जीवनाचे वैचित्र्य आहे. जितकी न्यायासने तितकी दालने आहेत. ती एकसंध आहेत आणि तरीही स्वतंत्र आहेत. सगळ्या इमारतीला भव्यता व्यापून राहाते, तरीही तिला विलक्षण तोल आहे. न्यायाच्या तराजूसारखा, शास्त्र-काट्यासारखा. खुद्द न्यायमंदिरात आलो की सौम्यसुंदर भित्तिचित्रें, पटचित्रें ( टॅपेस्ट्री ) यांमुळे ती जागा अक्षरशः

गूढ आकर्षण निर्माण करते. न्यायमंदिराशी संबद्ध असलेले सर्व गद्य आणि रुक्ष व्यवहार पार पाडण्यासाठी ज्या 'उपयुक्त' खोल्या आहेत त्या दर्शनी भव्य मोहोऱ्यामागे सफाईने लपविलेल्या आहेत. सर्व न्यायमंदिराचे प्रतिबिंब पडेल असा जलाशय मंदिराच्या भोवताली निर्माण केला आहे. त्यामुळे ते रंगदार खांब अक्षरशः द्विगुणित होतात. या मंदिराचा आरंभ खोल भूतळात होतो, म्हणून ते खंबीर 'पायावर' उभे आहे, अशी यात सूचना मिळते. न्यायाचे स्वच्छ प्रतिबिंब स्वीकारील अशी ही भूमी आहे, असाही भास होतो. पण असले विचार मनांत न आणणारा कोणी केवळ वास्तुसौंदर्य म्हणून इकडे दृष्टिक्षेप करील तर त्याचेहि नेत्रनिर्वाण दुणावेल.

...हे सारे सुंदर आहे. स्वच्छ आहे. चित्रविचित्र असूनही एकरूप आहे. परंपरेला कवटाळून बसणाऱ्या जडशीळ मनाला हे निर्माण करतां आले नसते. चंडीगडच्या अंगणात एक प्रचंड तलाव कृत्रिम रीत्या तयार केला आहे; त्यावर हिंडणाऱ्या नावांची शिडे कोणत्या रंगाची असावी येथपर्यंत सर्व काही नियोजित आहे. पण तीही एक नवलाई आहे! कितीतरी गुणी शिल्पज्ञांनी ही नवलमय नगरी उभविली आहे. पण ही नगरी अजून कोरी करकरीत आहे. तिला अंगासरशी घडी पडलेली नाही. तिचा नवेपणाचा वास गेलेला नाही. तिचा चेहरा अजून अंधुक आहे, अदृश्य आहे. खरे तर ही केवळ बीजभूत आहे. आता अनेक पावसाळे हिला झोडपतील, अनेक मातीची पुटे वाढवतील तेव्हा ही नगरी नव्हाळीत येईल. ते उद्या दोनचार शतकांनी. तोपर्यंत दिसेल ते निव्वळ शरीर. पुढल्या पिढ्यांना हाक मारील तो तिचा आत्मा!

चंडीगड! भुईवर नुकताच उगवलेला एक अंकुर!



# पहाडांची देखणी राणी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
.................... दि: ....................
.................... 

कलकत्त्याहून थेट उत्तरेकडे चारशे मैलांची झेप घेतली की, ज्या सात हजार फूट उंचीच्या टेकडीवर गरूड पोचेल त्या टेकडीवर एक देखणी गिरिनगरी वसलेली आहे. दार्जीलिंग! स्वर्गाच्या मार्गावरची एक सुंदर पेठ. आता ज्यांना गरुडभरारी नको असेल त्यांनी काय करावे? सिलिगुडीपर्यंत खऱ्याखुऱ्या आगगाडीने जावे आणि मग तिथून दार्जीलिंगपर्यंतची पन्नास मैलांची नागमोडी वाट चढण्यासाठी इटुकल्यापिटुकल्या लुटुपुटी गाडीत बसावे. या गाडीचे नावच आहे लुटुपुटीची गाडी : टॉय ट्रेन! बंगालातले गंगाखोरे म्हणजे एक सपाट आणि अफाट मैदान. त्याच्या उत्तर सीमेवरच्या नाक्याला सिलिगुडी म्हणायचे. इथूनच जातो घाटदार रस्ता स्वर्गाच्या बुरुजांकडे! हे बुरुज ज्या तुंग तिकोनावर आहेत त्याच्या अग्रांनाच म्हणतात दार्जीलिंग, गंगाटोक, कालिंपाँग!

सिलिगुडीला जर हवा निरभ्र असली तर उत्तर वेशीकडे एक झळझळीत रौप्यमुकुटधारी देवता दिसेल. हिचे नाव किंचिनजुंगा. ही एक जादुगारीण आहे. नजरबंदी करण्यात ही तरबेज आहे. पाहता

पाहता ती ओढ लावते. गूढ शक्तीने खेचून घेते. मग आपण आपोआप उत्तरेला वर वर वर चालत राहतो. दाट जंगलातून, खेड्यातून मार्ग कापीत आपण एका तिठ्यावर येऊन पोचतो. या तिठ्याला म्हणायचे घूम! घूम हे नावही जादूचेच. सौंदर्याचे वेड लावून माथे भ्रमात पाडायच्या खेळातलाच हा एक भाग आहे हे स्पष्ट असते. पण इथून तिस्ता नदीकडे घरंगळत जायची सोय असूनही आपण जादुगार देवतेच्या रोखाने चालत राहतो. वळणावाकणांच्या आड ती मधेच अदृश्य होते. हिच्या चमत्कारिक आकर्षणातून आपण सुटलो असे वाटून निःश्वास टाकावा तेवढ्यात 'कूऽऽक' म्हणून ती पुन्हा पुढे उभी राहते. म्हणून आपण गडबड करूच नये. शहाण्या मुलासारखे समोर पाहून चालत असावे. वाटेत काहीबाही दिसेल. तिकडे लक्ष देऊ नये. माझेच उदाहरण पाहा : वाटेत करसाँग गावी घराच्या दर्शनी दारात मोकळा केशसंभार सोडून, नुकतीच न्हालेली कोणी गिरिकिशोरी मस्तीत हसत बसली होती. मी आपला तिच्याकडे न पाहता सरळ दार्जीलिंगला येऊन थडकलो! हे अज्ञात सुंदरी, तू मला क्षमा कर!

दार्जीलिंगला पोचताक्षणी एक गोष्ट ताबडतोब ध्यानात येते. किंचिनजुंगा ही जादुगारीण नाहीच! तो पर्वतही नाही! किंचिनजुंगा हा एक प्रचंड आरसा आहे! कैलासाच्या दर्पणात मुखडा न्याहाळणाऱ्या अप्सरांप्रमाणे, गिरिनगरीची राणी किंचिनजुंगाच्या आरशात पाहत बसली. स्वतःच्या सौंदर्यावर खूष होणाऱ्या नार्सीससप्रमाणे स्वतःला खिळवून बसली, हरवून बसली. नव्हे, हा आरसाही नव्हे. हा एक प्रचंड पडदा आहे! निळ्या मखमली आभाळावर पांढऱ्याकाळ्या रेशमाने आकृती भरलेला, दार्जीलिंगच्या पायापर्यंत हिरवीगार चुणीदार लोळण घेणारा प्रचंड बॅक ड्रॉप! गिरिनगरीच्या राणीला पाहायचे ते या बॅक ड्रॉपसमोरच!

सन अठराशे पस्तीसमध्ये सिक्कीमच्या महाराजांनी चार चौरस मैलांची ही नैसर्गिक बागशाही ईस्ट इंडिया कंपनीला बहाल केली. त्या वेळेपासून कुंपणी सरकारची माणसे या थंडगार वसतीत वहिवाट करून आहेत! शिमला, दार्जीलिंग आणि शिलाँग ही साहेब लोकांची भारतीय विलायत! घरच्यासारखी हवा आणि रानोमाळ पसरलेले

अफाट सौंदर्य यांमुळे या ठिकाणी साहेब फार खुशीत असायचा. थंड हवेची शिरशिरी झोकून बंगल्यात घुसावे, नेमस्त चषक घ्यावा आणि मग दर्जेदार तमाखूने भरलेली पाइप शिलगावून व्हरांड्यात येऊन बसावे. या क्रियाकलापाला स्वर्गसुख म्हणतात!

कधीकाळी राज्यरचना आणि राष्ट्ररचना करायचे काम जर माझ्याकडे आले तर बंगालचा रोष मी निश्चित ओढवून घेईन! कारण दार्जीलिंग बंगालमधून काढून टाकल्याशिवाय मला बरे वाटणार नाही. ते कुठल्याही अर्थाने बंगालमधे बसतच नाही तर त्याला मी काय करणार! दार्जीलिंगचा भूगोल, इतिहास, तिथली समाजरचना, संस्कृती...थोडक्यात संपूर्ण दार्जीलिंग हे बंगालहून पार वेगळे आहे. दमट घामट हवा, गर्दीच गर्दी, वर्दळीवर यायची वृत्ती, पुकुरमत्स्यप्रेम, शांतिनिकेतनी सौम्य कलात्मकता...हा बंगाल. इथे त्यातल्या एकाही गोष्टीचा मागमूस नाही. हे पर्वत, हा बर्फ, हे उंच उंच देवदार, भूर्ज, पाइन, ही थंडी, हे चढउतारांचे टुमदार शहर, ही गिरिसहज स्वच्छता, आणि मुख्य म्हणजे नेपाळी, भूतिया आणि लेपचा लोकांचे चित्रमय समाज...किती वेगळ्या राज्यातले दृश्य आहे हे! मघा जिच्याबद्दल सांगत होतो ती करसाँगची किशोरीच पाहा : (किंवा पाहू नका) : तिचा लालबुंद रंग, तिचे प्रमीलित नेत्र, तिचे मोकळेझाकळे हास्य, तिचा झगा, शालीचे केलेले जाकीट यातली एक तरी गोष्ट बंगाली आहे का? त्यावेळी मी किंचिन-जुंगेच्या कपटामुळे तिच्याकडे निरखून पाहिले नाही ते एक असो. पण दार्जीलिंगच्या रस्त्यावर त्या करसाँगकरणीच्या छोट्यामोठ्या बऱ्यावाईट प्रतिमा कमी का हिंडत होत्या?

लावणीवाङ्मयात गोऱ्या गालाना खव्याची उपमा आलेली आहे. खरोखरच खव्याचे गाल पाहायचे तर भूतिया वस्तीतच गेले पाहिजे. 'नेपाळी' हे दार्जीलिंगचे जरा मालदार वस्तीकर. भूतिया म्हणजे जनता! 'लेपचा' म्हणजे अगदी खास श्रमिक! बाकी आपण सगळे, बंगालीदेखील, उपरे! फक्त मुशाफीर! औट घटकेचे रहिवासी!! हे लेपचा, भूतिया, लदाखी, स्पिती-लाहोलवाले, शेर्पा, बोमदिलापासून वालांगपर्यंतचे सगळे आदिवासी पाहिले की एक गोष्ट राहून राहून

मनात येते : एकेकाळी तिबेट आपला होता! भूतान, सिक्कीम, नेपाळ, तिबेट आणि हिमालयाच्या कुशीतले सगळेच प्रदेश कसे मिळतेजुळते आहेत. राजनैतिक संघर्ष ज्यावेळी कोणाच्या स्वप्नातही नव्हते, आक्रमक लोभी डोळे जेव्हा या निसर्गशांत प्रदेशांवर वळलेच नव्हते, तेव्हा अवघड बर्फाळ वाटांवरून, चिंचोळ्या घाटांमधून, हिमनद्यांच्या तटांवरून, चाऱ्याच्या जागा शोधीत किती अनिकेत मुक्तपणे फिरत असतील, जमेल तेथे जमवीत असतील, मुले जन्माला घालीत असतील, बकऱ्यांच्या कातड्या पांघरून न लाभलेली ऊब मानवी शेजाराने निर्माण करीत असतील! त्यावेळी वाढलेल्या या टोळ्या! हिमालयाप्रमाणेच ही गडबडही स्थिरावली आणि मग यांना नावे पडली : लेपचा! भूतिया! अलाणे, फलाणे!

दार्जीलिंगला भूतियांची खास वसाहत आहे. हे केव्हा तरी बौद्ध झाले. इथेच त्यांचा मठही आहे : भूतिया मठ. शहराच्या एका पाख्यामधे जरा उतारावर भूतियांची वस्ती आहे. गरिबी असूनही मुलेलेकरे कशी टुमटुमीत असतात. लाजऱ्याबुजऱ्या बायकांचे जलतरंगी खिदळणे तर कानात रुमझुमत राहाते.

सगळेच भूतिया काही अशिक्षित नाहीत. कॉलेजचे तोंड पाहणारेही पुष्कळ आहेत. पण त्यांना ते जरा जडच जात असावे. भूतिया पोरांच्या अंगात दरडीवरल्या करडांची चपळाई असते. ती शाळेत कशी बसणार? वस्तीच्या एका टोकाला मठाची सुंदर वास्तु उभी आहे. देवदारांच्या जोडीच्या स्तंभांमधून हा मठ पाहावा. एक प्रचंड जलरंगी चित्र दिसत राहते. याला म्हणतात कॉंपोझिशन! मठाच्या अंगणात गेलात तर मंत्रपठण ऐकू येईल. मठात जायला कुणाला मज्जाव नसतो. धर्मगुरूंचे एक दशक तिथे मंत्रपाठ करीत असेल. आतल्या बाजूस एक कुंद अंधारे गर्भगृह असेल. तिथल्या तुपाचा, धुपाचा, फुलांचा, रेशमी किनखापांचा, जुनाट पोथ्यांचा एक संमिश्र वास तुमच्या मेंदूपर्यंत घुसेल. धर्म कुठलाही असो, "मंबो जंबो हूडूडू" केल्याशिवाय भाविकांची श्रद्धा बसत नाही.

भूतिया मठाच्याही पुढे, आणखी डोंगर उतरल्यावर, तिबेटी शरणार्थींना कामधाम पुरवणारी, त्यांच्या मुलाबाळांना विद्याव्यवसाय

शिकवणारी संस्था आहे. आपल्या श्वासाचा अंदाज घेऊन तिथपर्यंत जावे. नपक्षी मागे फिरावे. देशबंधु चित्तरंजन दास यांचे घर वाटेत लागते. त्यांना मृत्यूने गाठले तेही याच ठिकाणी. क्षणभर नतमस्तक होऊन उभे राहावे आणि चौरस्त्याकडे यावे. खरोखर या हिमालयीन गावांत एक 'माल रोड' असलाच पाहिजे असा नियमच आहे का? माल रोडवरची दुकाने ही गावाच्या सोयीसाठी नसतात. मुशाफिरांना पैसे खर्च करण्याची ऊर्मी आली की ती जिरवण्यासाठी ही दुकाने असतात. यात अजबखाने, ऊनी-रेशमी वस्त्रालये, फोटोग्राफर्स, खिसेकापू, हॉटेले इत्यादी चिजा असल्याच पाहिजेत. पस्तीस हजार वसतीच्या दार्जीलिंगच्या मानाने हा बाजार फारच शोभिवंत, फॅशनेबल आणि श्रीमंत आहे. पण असल्या बाजारात एक सोय असते: इथे घेण्यापेक्षा बघण्याचीच गंमत फार! का कोणास ठाऊक, थंड हवेच्या ठिकाणी गरम कपडे आपोआप सुंदर दिसायला लागतात. पश्मिन्याची लांडी शाल (स्टोल) पांघरणाऱ्या दिल्लीवाल्या, जाड ट्वीडचे शिकारी कोट घातलेले साहेब, बॅलाक्लाव्हा (म्हणजे घडीच्या माकडटोप्या) किंवा स्कलकॅप्स (म्हणजे टक्कलटोप्या) घातलेले वृद्ध, पिंजारलेल्या लोकरीचे स्वेटर्स व गळपट्टे घातलेले झाकीबाज तरुण, कॉट्सवूलचे चौकटीचे ब्लाउझ आणि लोकरीच्या लांड्या पण तंग तुमानी घातलेल्या पारशिणी...एकजात सगळी मंडळी छान वाटतात! गोड हिवाळा पिऊन ज्याचे त्याचे गाल इथे गोबरे झालेले असतात. मला वाटते, अशा ठिकाणी चहाचे मळे असणे हे तर क्रमप्राप्त, स्वाभाविक आणि साजरेच आहे!

दार्जीलिंगला आणखीही पुष्कळच काही काही आहे! 'टायगर-हिल' वर गेलात, आणि गेले हे पाहिजेच, तर किंचिनजुंगाच काय पण एव्हरेस्टदेखील दिसू शकेल! मात्र हवा स्वच्छ आणि नशीब बलवत्तर पाहिजे. याच मार्गावर अर्धा चढ चढून गेल्यावर 'केल्व्हिनेटर' दुग्धशाला आहे. दार्जीलिंगच्या अलीकडला 'घूम'चा मठही चित्राय-मान आहे. इथे वनस्पति-वाटिका आहे, गव्हर्नमेंट हाऊस आहे, खिस्ती मठ आणि त्याला जोडून सेंट जोसेफ कॉलेज आहे. जीवशास्त्राचे प्रचंड अजबघरही आहे. चारपाच मैलांवर 'लेबाँग' येथे जगातला

सर्वांत छोटा (आणि सर्वाधिक उंचीवरला?) रेसकोर्स आहे! घोडे धावायचे रिंगण अक्षरशः मोठ्या बैलघाण्याएवढे असावे! आणि आता सर्वांहून अधिक मोठे आकर्षण निर्माण झाले आहे : हिमालयीन गिर्यारोहण संस्था!

१९५३ : एक भाग्यशाली संवत्सर. या वर्षी सर हिलरी आणि तेनसिंग नोर्के एव्हरेस्टच्या माथ्यापर्यंत पोचले. या घटनेपासून स्फूर्ती घेऊन मंडळी इतक्या तडफेने कामाला लागली की १९५४च्या अखेरीस गिर्यारोहणाची ही नमुनेदार संस्था उभी राहिलीदेखील. दार्जीलिंगच्या भूर्जगिरीवर (बर्च हिल) संस्था उभी आहे. मेजर जयाल, ब्रिगेडिअर ग्यानसिंग, यांच्यासारख्या कर्तबगार गिर्यारोहकांनी आणि विक्रमी तेनसिंग यांनी संस्थेत प्राण ओतला आहे. उत्तम ग्रंथशाला, हिमालयाचा उठावाचा नकाशा, गिर्यारोहकाची सरंजामासह प्रतिकृती, हिमालयातील लोकसमुदायांच्या वस्त्रालंकारांचे नमुने, उत्तुंग शिखरांवर रोवलेले ध्वज आणि मानचिन्हे, हिमपर्वतात आढळणाऱ्या पक्ष्यांचे, माशांचे, फुलपाखरांचे, प्राण्यांचे प्रकार दाखवणारा संग्रह या आणि अशा अनेक उपांगांमुळे संस्था इतकी वेधक झाली आहे की ती न पाहता दार्जीलिंग सोडणे पाप ठरते! इथे वन्य व विशेषतः थंड प्रदेशातले प्राणी ठेवण्याची सिद्धताही जोरात सुरू आहे. इमारतीचा लिफ्ट बंद पडला तर चार जिने चढण्याचे श्रम ज्याला फार वाटतात अशा आपल्यासारख्या शहरी शिराळशेटांना आणि जरत्कारूंना हे सारे पाहून विलक्षण अचंबा वाटावा हे स्वाभाविक आहे; पण जगातले सर्व धाडसी लोकही ही संस्था पाहून स्तिमित होतील असा प्रत्यय इथे सहजी येतो.

ज्या दिवशी दार्जीलिंगच्या बाजारात प्रथम पाऊल ठेवले त्या दिवशी माझे ग्रह उच्चीचे होते खास! अनोळखी चेहऱ्यांच्या गर्दीत एक ओळखीचा हसरा चेहेरा दिसला. याला आपण कोठेतरी पाहिले आहे... कोठे बरे? सिनेमात याचे फोटो सर्वत्र झळकलेले आहेत. रुबाबदार लोकरी कपडे आणि डोईवरही निमलष्करी टोपी घातलेला हा माणूस... अरे! हा तर साक्षात् तेनसिंग नोर्के!

जिवाचा धडा करून पुढे होऊन ओळख करून घेतली. हस्तांदोलन झाले. शेर्पासाहेबांच्या हिशेबात रोज असले प्रसंग बारा येत असतील.

पण एव्हरेस्टवर ज्याने आपले, म्हणजे माणसाचे, म्हणजे माझेही म्हणजे तुमचेही पाऊल ठेवले, ज्याच्या विस्फारलेल्या डोळ्यांना पृथ्वीच्या सर्वोच्च शिखरावरून एक कल्पनातीत अद्‌भुत दृश्य दिसले, त्याला मी भेटलो! ज्या हाताने, नेपाळचा असो की भारताचा, मानवाचा जयकेतू स्वर्गाच्या वालेकिल्ल्यावर लावला त्या हाताची भेट माझ्या दुबळ्या हाताने घेतली! या आनंदातच दार्जीलिंगमध्ये आणखी एक चक्कर मारली! चौरस्त्यावर गेलो. जितक्या कोनातून दार्जीलिंगकडे आणि दार्जीलिंगच्या अधिष्ठात्री देवतेकडे, किंचिनजुंगेकडे पाहाता आले, तितक्या कोनातून तृप्तातृप्त नजरेने पाहत राहिलो.

दार्जीलिंगची देवता! कोणकोणत्या देवता या स्वर्गात राहतात बरे! 'दॉरजी' म्हणजे इंद्राचे वज्र. त्याचे स्थान म्हणजे दॉरजीलिंग, अशी व्युत्पत्ती आहे. पण या भूर्जगिरीवर वज्राघात करण्याचे इंद्राला तरी काय प्रयोजन पडले असावे? उघड आहे! त्याची ती प्रसिद्ध मत्सरी बुद्धी! भारतवर्ष आपला लाडका देश. ही यज्ञभूमी. आणि इथे मात्र न आपला मान, न शिवाचा, न विष्णूचा. इथे क्षितिजावर मूर्ती उभी आहे ती किंचिनजुंगाची! या देवतेची पाठ राखायला आणखी एक महाबलशाली पर्वतेश्वर एव्हरेस्टनामा...तोही आहेच! 'संदाक्फू' या तीस मैलांवरील स्थानावरून ही स्वारीही दर्शन देतेच!

उगीच देवांचा रोष नको म्हणून शेवटी माणसांनी इथेही पाषाणांची, प्रतिमांची मंदिरे उभारलीच! इथे गिरजाघर आहे, मशीद आहे, बौद्ध मठ आहेत, शिवमंदिरेही आहेत. शिवमंदिराभोवती तेवढा महारोग्यांचा गराडा असतो, तसा इथेही आहे. प्रत्यक्ष मंदिरात मात्र एक अद्‌भुत घडलेले आहे. बौद्ध उपासना आणि हिंदु जपजाप्य इथे एकत्रच चाललेले असते! हे खरे शांततामय सहजीवन! नेपाळेश्वरांनी बांधलेले एक नवे शिवमंदिरही येथे आहे. त्यात मूर्तीपेक्षा, स्तंभांपेक्षा, शिखरापेक्षा, गाभाऱ्यापेक्षा, पूजाविधीपेक्षा, नेपाळच्या राण्यांची आत्मपूजा पाहण्यासारखी आहे. कोणाला वाटेल, नेपाळ ते केवढेसे राष्ट्र. त्याचा बडिवार तो किती! पण तसे नाही. नेपाळचा राणा केवढा बीदावलि-बहाद्दर आहे माहीत आहे? तो लेख असा :

"श्री धीरेश्वराय नमः। स्वस्ति श्रीमदतिप्रचंडभुजदंडेत्यादि ओजस्वी-राजन्यप्रोज्ज्वलनेपालतारा अतिप्रबल गोरखाबाहुर्ज्योतिमय त्रिशक्तिपट्ट-पृथुलाधीश श्रीश्रीश्री महाराज जुद्धशम्शेरबहाद्दुर राणा जी० सी० एल० एच०, जी० सी० एल०, जी० सी० एस० आई०, जी० सी० एस० एल०, एम० एल० जी०, सी० आई० ई०, जी० के० आर० के०, यितेंग, पावटिंग, शुनचियान, लुचुयान, श्यांगच्यांग, अनरेरी लेफटिनेंट जनरल ब्रिटिश आर्मी, अनरेरी कर्णेल ऑफ ऑल दी गोरखा राइफल रेजिमेंटस इंडियन आर्मी, प्राइम्मिनिष्टर एंड सुप्रीम कमांडर इन चीफ ऑफ नेपाल स्वर्गवासी 'धीरशम्शेर जंगबहादुर राणा...' यांनी हे मंदिर बांधून घेतले.

संवत १९९५ साल फाल्गुन कृष्ण १२ गते ५ वा शुभदिन....इत्यादी"

हे धनिक धन्य आणि त्यांची मंदिरेही धन्य. पण या हिमसुंदर तीर्थाच्या ठिकाणी ज्याला खरोखरी ईश्वराचे सान्निध्य हवे असेल त्याने थोडी वेगळी साधना करावी. असे करावे : पंच पंच उषःकाले उठावे, टायगर हिलची वाट धरावी. झरकन मागे वळावे...रात्रीच्या गडद अंधाराची काळी बुंथी मुखावरून दूर करीत उत्तर क्षितिजावर एक अतिदिव्य देवता जागी होत असेल. नुकतीच शय्येवरून उठून ती आळोखेपिळोखे देत असल्यामुळे तिचे संपूर्ण दर्शन तुम्हाला एकदम होणार नाही. तिचे सुंदर मुख तुम्हाला दिसेल न दिसेल. तिची तेजोमय काया धुक्याच्या शालीतून अर्धीमुर्धी प्रकट होईल. तेवढ्यात उगवतीवर आलेली उषा तिला प्राजक्ताचे अर्घ्य अर्पण करीत असताना दिसेल. मग हिची कळी उमलेल. कोवळ्या उन्हाच्या तिरकस प्रकाशझोतात, निळ्या नभाच्या पार्श्वभूमीवर हिची राजसवाणी झळझळीत मुद्रा पाहा तरी. हीच ती कांचनगंगा. हिच्या उज्ज्वल प्रकाशात न्हाऊन निघालेले दार्जीलिंग समाधी लावून बसलेले पाहाच एकदा.

असा अनुभव वारंवार येत नसतो!

मराठी ग्रं[illegible], ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... ... ... वि: ... ...
क्रमांक ... ... ... नों: दि: ...

# सो लाँग शिलाँग



'गावठी साहेब' आपणा सर्वांच्या परिचयाचा असतो, पण 'देशी विलायत' सर्वांनीच पाहिलेली नसते! वास्तविक प्रत्येक थंड हवेचे ठिकाण थोडेबहुत 'विलायती' असतेच. अगदी माथेरान-महाबळेश्वर-सारखी परसातली पहाडी गावे घेतली तरी, त्यांचे रंगरूप सपाटीवरल्या उखिरविखिर स्वदेशी गावापेक्षा कितीतरी वेगळे असते. थंड गहिरी हवा, लाल वाटांवरच्या बागा आणि बंगल्या, 'रसभरी' आणि 'इष्टापुरी'सारखी मुलखावेगळी करवंदे...शिझनला आलेली पारशी आणि किरिस्ताव कुटुंबे, छोट्याछोट्या तट्टांवर सवारी होऊन निघालेले गोरेगोमटे बाबालोक, गॉल्फ-लिंक्स आणि रेसकोर्स...या सर्व सामग्रीमुळे आपली पहाडी आरामपुरे देखणी, लोभसवाणी वाटतात. खरे म्हणजे तिथली मौज आपल्या बेतशीर खिशाला पेलणारी नसते. हाताजवळचे सुख, पण आटोक्यात न येण्यासारखे असते आणि इतर कारणांपेक्षा या एवढ्याच कारणाने ही ठिकाणे आपण विलायतेत जमा करून टाकतो!

पण शिलाँगची गोष्टच निराळी. शिलाँग नावच किती अपूप! शिवाय नकाशातही त्याची जागा केवढी चमत्कारिक! सीमान्त आसामच्या

दक्षिण वाटिकेतली एक सुंदर गुलटेकडी माथ्यावर शिलांग मिरवीत उभी आहे! गुलटेकडी तर खरीच! डोळ्यात मावत नाहीत एवढ्या रंगांच्या फुलांचा, पानांचा शिडकाव तिच्यावर झालेला आहे. ओळखीची आणि अनोळखी...दोन्ही तऱ्हांची फुले. गर्दजर्द झेंडू, तरवड, गोकर्णीही इथे आहेत आणि लाल शेंदरी पिवळ्या रंगांची गच्च गोल अनोळखी गर्दीही आहे. केळी-पोफळीची बने आणि पाइन-देवदारांची झाडेही. पण त्याशिवाय ज्यांची नावे निश्चित माहीत नाहीत अशा कितीतरी वृक्षवल्ली!! उगीच आपला चाळा म्हणून त्यांना अर्जुन, किंशुक, सरल अशी नावे ठेवीत जावे. हा खेळ वाटभर पुरेल. वाट म्हणजे घाट! गोहाटी सोडल्यावर आठदहा मैलांची सपाटी असेल नसेल. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्याच्या मध्य नाडीसारखा जो मुख्य राष्ट्रीय हमरस्ता आहे त्याला इथून फाटा फुटतो. फाट्याच्या जरा पुढे ग्याट! ही ग्याटाची भानगड नीट कळल्याशिवाय आसाममध्ये प्रवास करणे कठीण आहे. घाटरस्ता अरुंद असल्याच्या सबबीवर घाटात एकमार्गी वाहतूक असते; तीन तास ऊर्ध्वगामी आणि तीन तास अधोगामी वाहतूक जाऊ देण्याचा खेळ आळीपाळीने खेळण्यात येतो. म्हणजे आगाऊ माहिती करून घेतली नाही तर औट घटका हरी हरी करण्याची सोय येथे उपलब्ध आहे!

ते काही असो! गोहाटी ते शिलाँग अवघा त्रेसष्ट मैलांचा मामला, रंगदार ढंगदार मामला! वळणाची वाट आवडणाऱ्या आपल्या व्यक्तित्वातील कवित्वाला समाधान देणारा, शून्यातून पाच हजारात नेणारा रस्ता! शिलाँगची उंची समुद्रसपाटीपासून पाच हजार फूट आहे. हा शुद्ध भूगोल. पण गोहाटी सपाटीवर (की खालीच?) आहे हे लक्षात घेतले की शिलाँगचे पंचहजारी वैभव विशेष ध्यानात येते. अस्से वळा तस्से वळा, शिलाँग आता भेटेल मग भेटेल, असे आपण म्हणतो तेव्हा ते येत नाही. मग वळणांच्या गिरक्यांत जाणिवेला भोवळ यायच्या क्षणी ते सफ्फाई पुढे ठाकते.

हेच शिलाँग. ही आसामची राजधानी. आसामपासून फटकून असलेली. रुसून डोंगरावर बसलेली. खरोखरच वाटते आसामचे मुळी

शिलाँगवर प्रेमच नाही, शिलाँगचेही आसामवर नाही. पण कर्माने गाठ बांधली आहे ती सांभाळायची एवढेच. आपण गोहाटी सोडतो, राष्ट्रीय हमरस्ता सोडतो, सपाटी सोडतो, म्हणजे आणखीही पुष्कळ सोडतो. ब्रह्मपुत्रा सोडतो, भवतीची दलदल, माशा, मच्छर, दैन्य, सगळे सोडतो. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातला साळी-मासळींचा वास आणि सडतमुरत ठेवलेल्या तांबूलाचा दर्प, गजबज आणि घामट कोलाहल, फिक्कट चेहरे, बंगाली वळणाची माणसे हे सारे आपल्या जागी खिळवून ठेवून आपण चक्राकार जिन्याने जाऊन शिलाँगच्या दारावर टकटक करतो. असे करीपर्यंत आपण आसामचे आसामत्व वजा केलेले असते! शिलाँगच्या दारात पाऊल टाकायचे म्हणजे आसामी आसाम सोडून विलायती आसामात यायचे! खुद्द शिलाँगमधे तळशिलाँग आणि वरशिलाँग (अपर शिलाँग) असे दोन भाग आहेत. पण ते आपले उगाच. वास्तविक आसाम राज्यातच तळ-आसाम आणि वर-आसाम असे दोन प्रदेश आहेत. हा भेद केवळ जमिनीच्या उंचीने केलेला नाही. जमीन, तिचा पोत, तिची बियाणी, पानाफुलांचा प्रपंच, हवा, माणसे, आभाळ सगळेच मुळीं वेगळे; मग शिलाँगला वर-आसाम-शिवाय दुसरे काय म्हणणार! इंग्रेज बहादुरांना हा मुलूख फार आवडायचा. तेव्हा त्यांनी आपली फयाशनच पाडली : या मुलखाला म्हणायचे भारतातले स्कॉटलंड! म्हणजे पुण्यात राहून जिवाची मुंबई करण्याचाच हा प्रकार. आपल्या घराच्या गच्चीला 'हे आमचे महाबळेश्वर' असे संबोधत नाही असा पेन्शनर कोणी पाहिला आहे काय? शक्य नाही! असल्या चुनेगच्ची महाबळेश्वरावरची हवा खाऊन अस्सल महाबळेश्वरचे सुख मिळत नसले तरी थोडीफार कल्पना येतेच की! नाही तरी आपण खऱ्या स्कॉटलंडमधे कशाला कडमडतोय? तेव्हा साहेबाच्या सांगण्याप्रमाणे यालाच आपले स्कॉटलंड म्हणावे हे उत्तम. "अहो अमृत अमृत म्हणजे तरी काय? वयनींच्या हातच्या चहाच्या चौपट चवदार असेल, आणखीन काय!" ही भिक्षुकाची समाधानी वृत्ती तशी काही वाईट नाही. पण खरी गोष्ट अशी आहे की शिलाँगला स्कॉटलंड म्हणूच नये! शिलाँगला सरळसरळ शिलाँगच म्हणायला काय हरकत आहे? कालिदास ईज दि (धी)

शेक्सपीअर ऑफ इंडिया आणि बगोवा ईज धी ब्रॅडमन ऑफ अवर चाळ असली तुलना पाहिजेच कशाला? साहेबाने जे म्हटले ते त्याचे त्याला लखलाभ असो. खरे म्हणजे शिलाँग हे स्कॉटलंडसारखे नसून शिलाँगसारखेच आहे हे चक्षुर्वै अर्धसत्यम् आहे. स्कॉटलंड पाहिल्यावर पूर्ण सत्य सांगण्याच्या अवस्थेत मी असेन, अशी आशा आहे!

शिलाँगची जात विलायती खरी; पण त्याच्यावर एक आशियाई कलम झालेले आहे. अतिपूर्वेच्या या आपल्या प्रदेशावर शेजाऱ्याचा —ब्रह्मदेशाचा—परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? मध्ययुगीन आसाम तर चक्क ब्रह्मदेशातून टपकलेल्या अहोम राजांच्याच आधिपत्याखाली होता. त्याशिवाय भटक्या गिरिजनांनी, नागवंशियांनी कळत-नकळत कितीतरी संस्कार या प्रदेशावर केलेले आहेत. आता तुम्हीच सांगा : रिल ब्राँग, मॉपरेम लुंपारिंग, लाइतुमुखरा ही पेठांची नावे आपल्याला जरा तरी ओळखीची वाटतात का? आणि शिलाँगच्या परिसरातली मॉव्स्मै, मॉव सैनराम, मॉवजुन्नइन, खोन खेन, ख्रेंग ख्रेंग मॉवफ्लांग ही स्थाने तरी काय! बरे सणा-उत्सवांची नावे तरी कशी? शद्सुक्-मैनसिएम, नोंग्क्रेम, बेह-दिएंगख्लाम! आपल्याला भारतीय नावांपेक्षा वेगळी नावे मिळतात ती पार विलायती पण तरीही ओळखीची! हॅपी व्हॅली, स्वीट फॉल्स, बिशप फॉल्स, गॉल्फ कोर्स, बडा बाजार इत्यादी इत्यादी. इथे नावांच्या गोफाला दोनच पदर आहेत. एक गिरिजनांच्या भाषांचा आणि दुसरा इंग्रजीचा. इथे तुम्हाला नारायण पेठ, फत्तेगंज, अजमेरी गेट, माधवपुरा, असली पेठनावे मिळायची नाहीत. पांडव गुंफा, सीता न्हाणी, हरकी पावडी असली बात नाही. आणि याचे कारण उघड आहे. मैदानी, दुआबी, आर्यावर्ती, दख्खनी भारताचा या भागाशी काहीएक संबंध आलेला नाही. शिलाँगचे वस्तीकर आहेत 'खासी' आणि 'जेंतिया'! या गिरिजनांच्या दोन समाजांनी फारच वेगाने मिशनरी संस्कृतीला मिठी मारली. नतीजा : अर्धवट इंग्रेज आणि अर्धवट भारतीय असलेली एक खाशी पाचर आसामच्या उरात मारली गेली. भारतीय विविधतेत हीदेखील खपून गेली हे वेगळे!

ब्रह्मपुत्रेच्या प्रचंड पात्रातून कसेबसे दक्षिणकाठी पायउतार झाले की गोहाटी हे प्राचीन आणि अर्वाचीन नगर लागते. विद्याभ्यास, बाजारहाट,

सामाजिक संस्थांचे चलनवलन, भौगोलिक दृष्ट्या महत्त्व असलेले स्थान... सर्व दृष्टींनी पाहिले तर गोहाटी हीच आसाम राज्याची राजधानी असली पाहिजे हे स्पष्ट आहे. पण राजधानी आहे शिलाँग ! का ? साहेबाने ठरविले म्हणून ! सुंदर परिसर, पर्वतराजींचा सहवास, थंडगार हवा, मळेवाले व मिशनरी यांची मुबलक वस्ती या आणि अशा कारणांसाठी इंग्रजाला शिलाँग पसंत पडले ! तिथे रेल्वे नाही, रस्ता अडचणीचा आहे, आसामची पाणवाट ब्रह्मपुत्रा तिथून दूर आहे, लोकवस्तीच्या प्रमुख पुंजाला हे ठिकाण गैरसोयीचे आहे, या गोष्टींचे सोयरसुतक साहेबास काय होय ! त्याने आपली तन्दुरुस्ती आणि दिलचस्पी ध्यानात घेतली. शिलाँगच्या डोंगरमाथ्यावर नागमोडी रस्ते आखले. रपेटीसाठी बडी चक्कर आणि छोटी चक्कर (दि लाँग राउंड ड्राइव्ह; दि शॉर्ट राउंड ड्राइव्ह) यांची योजना केली. दिवाबत्ती, दवापाणी या सोयी पाहिल्या. टुमदार पण प्रशस्त आवारांचे बंगले उभे केले. कारभारासाठी इमारती रचल्या. भूकंप, पूर, हिवताप या अस्मानी संकटांपासून स्वतःचा बचाव करून आमचे मायबाप इंग्रज सरकार शिलाँगच्या या राजमाचीवर ठाणे देऊन बसले. इथल्या हवेने पोरे गुटगुटीत झाली. मडमा टुमटुमीत राहिल्या ! बाकी फिकीर साहेब करतो कशाला ? देश स्वतंत्र झाल्यावरही आसामच्या शासनाला एक पायरी खाली उतरणे गैर वाटले. ज्या थंड राजमाचीवरून साहेबांनी शकट हाकला त्याच शिलाँगला राज्यसरकार बिलगून बसले. त्यामुळे शिलाँगची शान दरबारी नसली तरी सरकारी आहे ! पहाडी गावाच्या मानाने रस्ते कसे लंबेचवडे आहेत. चौकातिठ्यांवर हवालदार आहेत. कचेऱ्या सजवणाऱ्या बाबू लोकांचा मोठा समुदाय आहे. फैनाबाज दुकाने आहेत. दबदबा आहे. शांताकार शिलाँग एकापरीने सुस्त, निद्रिस्त वाटते; कारण इथे दिले-घेतले करणाऱ्या, बेवे आणे गाणाऱ्या, शिट्याभोंगे फुंकणाऱ्या, तासघंटा बडवणाऱ्या...बाजाराचा, बजबजीचा तसा अभावच आहे. नेटके लोक नेमके काम करून नीट रस्त्याने नियमित येतात-जातात असे हे शिलाँग. त्याचा बाबू छाप मोहरा तसा ठसून राहतो.

लाइतुमुखरा ! इकडचा मुखडा सर्वांत रुबाबदार. पाइनवुड होटेल, गव्हर्नमेंट हाऊस, बडे चर्च पाहत पाहत या फॅशनेबल भागात एक

फेरफटका मारावा. बऱ्याच बड्या अधिकाऱ्यांची, श्रीमंत मळेवाल्यांची घरे इकडेच आहेत. मठाधिष्ठित शाळा आणि कॉलेजे यांतल्या गोजिरवाण्यांचे दर्शन सकाळीच घ्यावे. मग लहर लागली तर डोंगरी वाटा चढतचढत चित्रविचित्र बंगल्या न्याहाळाव्या. या गावाची एक मौज आहे. इथे खरोखरीचे युरोपिअन आजही पुष्कळ भेटतात. त्यातले काही मळेवाले आहेत किंवा होते. मिशनरी उद्योग करणारेही आहेतच. त्यांतले काही जण अर्धगृहस्थ-अर्धसंन्यासी वाटतात. त्यांनी स्वतःला छंद लावून घेतलेले आहेत, शिकारीचे, उपयुक्त ज्ञानाचा संचय करण्याचे. डॉ० व्हेरिअर एलविन हे प्रसिद्ध मानववंशतज्ज्ञ शिलॅंगलाच स्थायिक झाले होते. पण या सर्वांहून वेगळी अशीही गोरी माणसे तुम्हांला शिलॉंगमध्ये भेटतील. इतरत्र करमत नाही म्हणून ती इथे राहातात. देशी विलायतेला 'होम टाउन' मानून राहातात. आयर्लंडला परत जाऊन पुन्हा भारतात आलेले—धारवाडला कायम राहिलेले एक सेवानिवृत्त प्रिन्सिपॉल मला माहीत आहेत. हिंदुस्थानाबद्दल विचित्र आकर्षण वाटल्याने हिंदुस्थानात वस्तीला आलेली पाश्चिमात्य मंडळीही भेटतात. भिकार पृथ्वीवर हा गांधी-विनोबांचा देश कर्मश्रीमंत वाटतो अशी श्रद्धा असलेले युरोपीय-अमेरिकी लोकही मला माहीत आहेत. एखादा हाल्डेन 'शेवटचे आश्रयस्थान' म्हणून या बालेकिल्ल्याचा आश्रय करतो हेही सर्वश्रुत आहे. पण शिलॅंगमधले गोरकाय अशा कुठल्याही निष्ठेने, श्रद्धेने, हेतूने, आकर्षण वाटले म्हणून...येथे कायम वस्तीला आलेले नाहीत; ते आहेत केवळ 'आदतसे मजबूर!'...इथेच राहिलो, इथेच राहायचे, बस! और कुछ नही! पण हीदेखील शिलॅंगला मिळालेली एक कृतज्ञ पावतीच आहे. इतकी किंवा यापेक्षा सुंदर स्थळे जगात आहेत, कबूल! पण शिलॅंग ते शिलॅंग! अशी अनुक्त तारीफ करीत ही माणसे शिलॅंगलाच चिकटतात.


शिलॅंगच्या झाडामाडांसारखे खास शिलॅंगी लोक म्हणजे मात्र 'खासी'. आपल्याला कल्पना करता येणार नाही इतकी खासी माणसे सरकारी दप्तरात आहेत. खासी भाषा ही चौदा भाषांच्या सिंहासनांहून

खाली सामान्य आसनावर बसलेली आहे; पण म्हणजे काही ती उपेक्षणीय नाही. खासी भाषा हा विषय घेऊन बी० ए० (ऑनर्स) ही परीक्षा उत्तीर्ण होता येते, हे शिक्षणक्षेत्रातल्या मंडळींना तरी माहीत आहे काय ? पाश्चात्याळलेले खासीही कमी नाहीत. उंची सूट परिधान केलेले खासी पुरुष आणि शिफॉन-नायलॉनचे दर्जेदार वेष केलेल्या खासी ललना जिथेतिथे भेटतातच. खरे म्हणजे आसाममधील सर्वांत फॅशनेबल, नखरेल स्त्रिया फक्त या खासी समाजातल्याच म्हटले पाहिजे. शिलाँगच्या राजरस्त्यावरून, झुळझुळीत रंगीत कपडे घालून, केशभूषा करून, ओठांवर लाल रंगाची कांडी फिरवून हिंडणाऱ्या अटकर बांध्याच्या खासी तरुणी ज्यांनी पाहिलेल्या नाहीत ते वंचित होत ! मात्र या खासी समाजात परंपरागत वस्त्रभूषणे घालणारे स्त्रीपुरुषही भरपूर आहेत. जरा पांढरपेशे खासी किंवा खासिनी, अर्धवट आसामी आणि अर्धवट युरोपीय पेहेराव करतात. पण जमातीचा खास पोषाख करणारी मंडळीही बाजारात दिसतातच. ‘बड्या बाजारात’ तर सर्व विक्री खासिनीच करतात. अट्टल व्यवहारी असतात त्या. कोळी महिलां-सारख्या वस्ताद आणि हुशारही असतात. गिऱ्हाइके गटवण्यात चपळ असतात; त्यांतही भोळे सावज हेरण्यात तरबेज असतात. बडा बाजार म्हणजे एक कायम स्वरूपाचा जत्रा-बाजार आहे. नित्योपयोगी सर्व काही मिळण्याची ती जागा आहे. बायकांनी चालवलेला बाजार... सर्वांसाठी. पिंगट डोळ्यांची अर्धगौर खासी युवती गरम किंवा रेशमी कापड विकताना पाहिली की आपण आतल्या खिशात हात घालून पैसे बाहेर काढतो की हृदय ते नीटसे कळतच नाही ! असल्या रसिक गिऱ्हा-इकाचे मर्म ओळखून न ओळखल्यासारखे करणाऱ्या, बारीक पण लांबट डोळ्यांच्या मासोळ्या भिरभिरत ठेवणाऱ्या खासिनी दिसल्या की बडा बाजार दिसला ! खासी पंचांगांतला आठवडा आठ दिवसांचा— म्हणजे खरोखरीच आठवडा असतो. प्रत्येक दिवसाचे नाव त्या त्या दिवसाच्या बाजाराला मिळते — की निरनिराळ्या बाजारांची नावे त्या त्या दिवसांना मिळाली आहेत वाटते ! बडा बाजार नववा ! सदा भरलेला !

शिलाँगच्या गुलहौशी रहिवाशांना घटका घालविण्यासाठी तशा पुष्कळ सोयी आहेत. गॉल्फ आहे, रेसकोर्स आहे, क्लब आहे,

बाजार आहे, थंडगार 'गरम' पेये देणारी आरामगृहे आहेत. पण तरीही पुन्हा पुन्हा पाय वळतात ते वॉर्ड सरोवराकडे. लष्करी छावण्या असलेल्या शांत रस्त्यातून, वरशिलाँगच्या चढउतारावरून, शिलाँग शिखरावरून, पार्कमधून, विधानसभेवरून...कोठूनही फिरून आलेला माणूस 'वॉर्ड लेक'कडे वळलाच पाहिजे. चंद्रकोरीच्या आकाराचे हे कृत्रिम जलाशय. पण माणसाचा हात लागला म्हणून त्याला कृत्रिम म्हणायचे एवढेच. का म्हणून ते कृत्रिम? का म्हणून दुय्यम दर्जाचे? शांत शांत सरोवर. त्यावर कमान टाकलेला एक साधा लाकडी साकव. सरोवराचे हृद्गत शांतपणे समजावून घेण्यासाठी त्याच्या भोवतालच्या पायवाटेवरून मुकाट चालणारे मुशाफीर. छोट्या रंगीत नावा. पाण्याच्या ओढीने नावातून फिरणारी रंगेल पण संयत युगले...कुठल्याही नगराला असे एक हृदय पाहिजेच. शिलाँगला तर त्याची फार गरज आहे. त्याने इथे ओलावा आणला आहे. डोळ्यांना हिरवा गारवा आणणारे दूर्वाळ अंगण त्याच्या भोवती आहे. वृक्षही घनगर्द आहेत. हलका गुलाबी फुलभार शालीसारखा अल्हाद घेऊन उभे असलेले नाजूक हिरवे सोयरेही आहेत आणि केवळ गच्च पर्णावळ पांघरणारे वृक्षशास्त्रीही आहेत. कॅशिआसारखी बावनकशी मोहोरा उधळणारी दिवटी मंडळी आहेत तशी आपल्या अग्रदार शालीनतेचा ओला दर्प उराशी बाळगीत स्वतःशीच पुटपुटणारी मिजासखोर पाइन, फर आणि कंपनीही आहे! इथे पाणी शांत असले तरी ते मध्येच डहुळेल अशी व्यवस्था करणारे अचपळ पक्षी आहेत. आणि ते कसेही असो, जलवंतीच्या शालीन वक्षाचा श्वासोच्छ्वास प्रकट करणारा, उंच खोल जाणारायेणारा, डौलात गिरकी घेणारा रस्ता आहे. त्याच्यावरून न बोलता फिरत जावे. शिलाँग सोडण्याचा क्षण जवळ आला तरी त्यातल्या त्यात वाट वाकडी करून येथे घुटमळावेच. मग, आपल्या हसऱ्या चेहऱ्यावर लाजरा पंजा पसरून तिरके पाहात राहाणाऱ्या खासी युवतीच्या डौलाने शिलाँगच्या प्रतिबिंबाकडे पाहात सरोवराला म्हणावे, सो लाँग शिलाँग!

ठाणे.
वि: ........
ओ: दि: ........




# कॉकटेल पाँडिचेरी

एका म्यानात दोन तरवारी राहात नाहीत. कबूल आहे. पण एका स्थानात दोन गावे नांदू शकतात हेही खरे आहे. उदाहरणार्थ पाँडिचेरी. चार अक्षरे उच्चारायचा जिभेला कंटाळा येतो म्हणून हिलाच म्हणायचे पाँडी! पण पाँडी म्हणताच फरक केवढा पडतो! पाँडी किती गोडी, किती फॅशनेबल. जशी (पारिसची) पारी तशीच ही पाँडी—नखरेल आणि न्हानगी (पेती)!!

पूर्व किनाऱ्यावर केवळ ऐतिहासिक अपघाताने शिल्लक राहिलेली ही फ्रेंच पेठ. खरोखर ब्रिटिशांनी हे दोनतीन ठिपके कसे टिकू दिले कोण जाणे. आपण आपली शिकार पोटभर खाल्ल्यावर सिंहाने जसे कोल्ह्या-लांडग्यांकडे दुर्लक्ष करावे, 'कुरतडू देत दोन तुकडे' या उदार भावनेने त्यांना हाकलू नये, तसे इंग्रजांनी सगळा देश घशात घातल्यावर फराशिसांना व फिरंग्यांना दोनचार घास खाऊ दिले. नाही तर वलंदेज चाच्यांप्रमाणे फिरंगी आणि फराशिसांना त्यांनी केव्हाच उपटून फेकले असते. फ्रेंचांनी जावे हे वास्तविक १७५७मध्येच ठरले होते. पण निगरगट्ट ढेकणाप्रमाणे दोनतीन फटींत ते दडून बसलेच. दैव

अनुकूल होण्याची दोनशे वर्षे वाट पाहिल्यावर शेवटी हताश होत्साते मांशूर परत गेले. जाण्यापूर्वी त्यांनी साधले ते एवढेच, भारतीय विविधतेत एक निराळा ठसा उमटवला. हा ठसा ओझरता आहे, पण आहे. वार निसटता झाला आहे, पण खूण ठेवून गेला आहे. 'फ्रेंच चुंबनाची निशाणी' असा पॉंडिचेरी या शब्दाचा अर्थ करायला हरकत नाही! दिवसमास गेले तरीही फ्रेंच संस्कृतीचा गंध गेलेला नाही. बोलून-चालून पारिसचा 'पर्फ्यूम' आहे तो महाराज!

पण हा सुगंध ज्याला लागला ते आमचे अंगही आहे अस्सल भारतीय! फ्रेंचांनी शिकस्त केली पण त्यांचा पूर्ण विजय कदापी होऊ शकला नाही. म्हणून पॉंडी ही संपूर्ण फ्रेंच कदापी झाली नाही. निर्भेळ काळ्या रंगाच्या मानववंशाच्या लाटांवर लाटा येतच राहिल्या. मूठभर फ्रेंच शिबंदी त्यांत बुडाली नाही; पण केवळ आपले अस्तित्व टिकवण्यापलीकडे तिला काही करताही आले नाही. त्यांच्या पांढुरक्या पॉंडीला आमच्या काळ्या चेरींनी असे काही घेरून टाकले की, आजही तेथे एका वास्तूवर दोन नगरे नांदत आहेत. एक आहे समुद्रकिनाऱ्यावर रुंद रस्त्यांनी विणलेले, टुमदार व्हिल्यांचे नीटस उपनगर; आणि दुसरे आहे लांबच लांब गल्लीबाजार असलेले भुकेल्या घरांचे गजबजमोहोळ. ही दोन्ही नगरे एकमेकालगत आहेत. एक-मेकात आहेत, नव्हे एकच आहेत. शॅंपेन आणि माडी यांची ही विचित्र कॉकटेल आहे.

अंधाऱ्या रात्री पॉंडिचेरीकडे जाऊ लागले की एक विचित्र अनुभव येतो. पॉंडिचेरी एवढीशी; तिला वेढा घालणारा भारत कितीतरी मोठा, या गोष्टीचे प्रत्यंतर एका वेगळ्याच प्रकारे येत राहाते. आपण जात असतो एका फ्रेंचाळ वसतीकडे; आपल्या अपेक्षा असतात अगदी वेगळ्या. क्रूस, मनोरे, बगीचे आणि बंगल्या, शानदार उपाहारगृहे, मिश्रवंशीय कामिनी...हे आणि असले नवलपरीचे डोहाळे मनाशी चाळा करीत असतात. आणि प्रत्यक्षात भेटते काही वेगळेच! वाट वळते, फिरते, आणि अंधार डुचमळतो; पण तो अधिकच दाटत जातो. त्यातही भातशेतीची, नारळीपोफळींची, केळीनागवेलींची चाहूल येतच असते. अंधाराच्या काळ्याशार पार्श्वभूमीवर मधेच

चौतभर पांढरेफेक दिसते. ती असते कोणा काळ्याभोर किसानाची लुंगी, किंवा मुंडासे! तेवढेच ढवळे. बाकी सारे काळेकाळे. तका-कणाऱ्या काजळाच्या डोंगरावर छिन्नी चालवून विश्वकर्म्याने घडवलेल्या उंच शेलाट्या काया. अंधारातून सतत यातायात करणाऱ्या. कशासाठी? पुष्कळ वेळा मनात येते, आता रात्री दहाचा सुमार आहे, अशा वेळी या खेडुतांना इकडून तिकडे जाण्याचे काय प्रयोजन असेल! पण ते जातच असतात. इकडून तिकडे, तिकडून इकडे. एरवी काही का करीनात. पण 'पॉंडी' सारख्या कॉकटेलपुरीकडे त्यांचे काय घोडे अडले असेल! पण असते अडलेले!! एक, दोन...हजारो माणसे, शेतकरी, कारागीर, हेलकरी, मोलकरी, गुमास्ते, फिरस्ते सौदागर जातच असतात...पॉंडीकडे, पॉंडीकडून. भरती-ओहोटीसारखे. तिकडे उपसागराच्या वेळेवर जसा न संपणाऱ्या लाटांचा वेढा, तसा इकडे उपखंडाच्या वेळेवरही. अशा कैचीच्या व्यूहात सापडलेली पॉंडी करील काय? मारे तिने फ्रेंच पेहेराव घातला, ती बोबडेबोबडे बोलली, ती नाजूकसाजूक मद्य प्याली, नाचली, समुद्राच्या गाजेसारख्या गंभीर वाद्यांच्या आवर्तात बुडाली...पण जाईल कुठे? काजळी देहांच्या न संपणाऱ्या बाहूंनी तिला वेढले. भात आणि तांबूल यांचा गंध वाहणाऱ्या असंख्य झुळुका तिला झोंबत राहिल्या. माणसे, माणसे आणि अगण्य माणसे तिच्या रोखाने येतच राहिली. एक दिवस ती आपली झाली. अरे फ्रेंचानो, आज ना उद्या—तुम्हांला हटावे लागणारच होते. असे ना तसे. बोलूनचालून तुम्ही येत होतात ताऱ्याच्या किरणांसारखे दुरून. तुम्ही येणार ते प्रचंड पण मोजता येण्यासारख्या संख्येनेच ना? तोफाबंदुका घेऊनच ना! पण आम्ही येणार ते भुईतून! कोंभांवर येणाऱ्या कोंभांसारखे! न संपणाऱ्या संख्येने, श्रेणीने. तोफाबंदुका नव्हे तर नांगर खांद्यावर घेऊन. तुमचा विजय होणार कसा?

फ्रेंचांनी हे 'अटळ' जाणले. ते गेले. जाताना आमच्या रांगड-धोब्रड, काजळकाळ्या अस्तित्वाच्या कानात एक 'ईव्हिनिंग इन पारिस'चा फाया ठेऊन गेले एवढेच! थँक यू मॉसिअ! आपण जातो जमिनीकडून समुद्राकडे; आता फ्रेंच होते जेते, राज्यकर्ते; ते

जमिनीच्या बाजूला कशाला राहातील ? मुंबईला साहेब कुठे राहाणार! मरीन ड्राइव्हच्या अंगाला की परळ-लालबागेत! फ्रेंच झाले तरी साहेबच. समुद्राच्या गोत्रातले! समुद्राजवळ ते घर करणार. हवा खावी, डोळ्यांनी समुद्र प्यावा. त्याच्या लाटांच्या तालांवर झुलत नाचावे. त्याची वादळे अनुभवत रक्तातली वादळे निववावीत. आपण जातो जमिनीकडून समुद्राकडे; साहजिकच चेरी आधी लागते आणि मग येते पाँडी! जकातनाकी, तिठा आणि पिठा या चिजा आधी! हळूहळू दुकानांचे आकारमान वाढीला लागते. पानबिडीच्या खोपटांच्या जागी शिग्रेट विकणारे 'छापे', तांबूलाच्या 'गाद्या'. मग छोटी होटले...मग 'लॉज' आणि 'निवास' नामक खानावळी! मग मधेच दिसतो ट्यूबलाइटचा झगमगाट. एक सिनेमा थिएटर, खूप ...गर्दी, लाउडस्पीकर, किंचाळणारे ग्रामोफोन...! माणसे पानतंबाखू खाणारी, थुंकणारी, धुराचे भपकारे सोडणारी, केसांना खूप तेल चोपडणारी, आडव्याउभ्या गल्ल्यांतून सिनेमाच्या लोहचुंबकाकडे खेचली जाणारी..."हे तर नेहमीचे दृश्य...यात पाँडिचेरी कुठे आहे ?" कोणीही हेच विचारील. अगदी बरोबर. ही पाँडी नव्हेच! ही फक्त चेरी...! हजार जणींसारखी! देशभर विखुरलेल्या तालुक्यांच्या-जिल्ह्यांच्या गावांसारखी. चेरीतली घरे अगदी आपल्या घरांसारखीच आहेत. दुमजली, सज्जांची, किरकोळ खिडक्यांची. इथले बाजार, आडतपेठा...सगळे काही इतरांसारखेच. गल्ल्या आणि रस्ते यांना 'रू' किंवा 'बुलव्वर' अशी नावे दिली म्हणून त्यांचा स्वभाव का पालटणार आहे ? पण 'चेरी'तून सरळ जाणारा मध्यनाडीचा रस्ता तुडवीत आपण रेल्वेस्टेशनपार गेलो की अल्हाद पाँडीत यायला होते! ही निराळी.

अंगणांची रुंदी आता वाढली. गवाक्षांचे विस्तार अफाटले. घरांच्या डोक्यावरच्या छपरी टोप्या इस्त्रीदार झाल्या. फिकट गहिरे रंग दिलेल्या नीटस चौरस व्हिल्ल्यांच्या अंतरात निःशब्द शांतता वसतीला आली. येथे ऐकू येते फेसाळ लाटांचे मंद्र संगीत. समुद्रकिनाऱ्याला शिवलेल्या रेशीमकाठासारखा समांतर रस्ता आणि त्यावरचा फूटपाथ...त्याच्याही एका अंगाने धावत जाणारी ठेंगणी कट्ट्याची भिंत, हे सारे रसिकांनो,

फक्त तुमच्यासाठी आहे. गजबजीचा वास इथे येणार नाही. इथे कोलाहल नाही. जगायची धडपड नाही. दिवसभराचे श्रम विसरण्यासाठी इथे गर्दी आणि गोंधळाचा कैफ करावा लागत नाही. इथे निवांतपणे वारा खावा. फडफडणाऱ्या स्कर्टची तेवढी धांदल पाहावी. लांबसडक बोटांना कपाळावर येणारी कुरळी गर्दी मात्र येथे हटवावी लागते. या कट्ट्यावर बसावे, एका बाजूने अंमळ धुंदच असलेल्या समुद्राचा पंजा धरणीशी धसमुसळेपणा करीत असतो; पण दुसऱ्या बाजूला, कोणी तरी कोणाच्या तरी कानात काही तरी सांगत असते. मग मधेच कुठेतरी काचपात्र खळखळते. "करांतुनी तव खिद‌ळत आले स्तनाकार पेले, जळता गंधक पाच उकळती यांहिं रंगलेले" असल्या ओळी आपल्याला आठवू लागतात. तेवढ्यात कुठे तरी काही तरी झंकारते. आपल्या पाठीच्या कण्यावर कोणीतरी पियानो वाजवते! चला! आता येथून निघाले नाही तर ही फ्रेंच रमलाची रात्र वेड लावील!

उमलत्या सकाळी पॉंडीमधे फेरफटका करावयास निघावे; तरी नीरवतेत कुठेच फरक पडणार नाही. सरळ आखलेले रेखीव रस्ते, त्यांचे रंधे मारलेले कोपरे, मोजूनमापून बसलेली शिस्तबद्ध घरे या सर्वांवर शांतता शिंपडलेली असेल. कुठे एखाद्या चुकार वेलीची एखादी फुलवंती फांदी फाटकाबाहेर झुकलेली असेल इतकेच. बाकी सगळे चिडीचूप. 'इथे फ्रेंच राहात होते' अशी पाटी नसली तरी एका पाश्चात्य समाजाने वळण लावलेली ही वस्ती आहे हे मुशाफिराला जाणवत राहातेच. पॉंडिचेरीत हे पाहायचे आणि ते पाहायचे हे खरे नव्हेच. हे मेडिकल कॉलेज, हा पार्क, हे गव्हर्नरचे घर...हे नाही पाहिले तरी काही बिघडले नाही. पाहायला पाहिजेत ती निघून गेलेल्या एका संस्कृतीची पदचिन्हे!

दोन गावांच्या या वास्तूत तिसरेही एक गाव आहे. त्याला म्हणायचे अरविंदाश्रम. श्रीअरविंदांच्या 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' चार दिवस मनःशांती अनुभवायला येणारी माणसे येथे पुष्कळ भेटतील. पण मुख्य वस्तीकर वेगळे. ते इथे कायम वस्तीसाठी आलेले आहेत. त्यांची

वसणूक म्हणजे आश्रम. आश्रम आश्रम असा वेगळा प्रपंच येथे नाही. म्हणजे हे कुंपण, हे दार, ही आश्रमाची जागा आणि या आश्रमाच्या झोपड्या अशी अंगुलिनिर्देशाने दाखविण्यासारखी अवस्था अरविंदाश्रमाला नाही. जवळजवळ एकतृतीयांश पाँडी आश्रमाने व्यापली आहे. पाँडीचा अरविंदाश्रम तिथल्या या किंवा त्या रस्त्यावर नाही. तो इथे, तिथे, पलीकडे, आणि त्या तिकडेही आहे. विशिष्ट निळसर-करड्या रंगाचे घर दिसले की हे आश्रमाचे म्हणून ओळखावे. आश्रमाचा एक विभाग, उदाहरणार्थ शिक्षणसंस्था इथे असली तरी उद्योगशाळा अर्ध्या कोसावर असू शकते. अर्थात अरविंदांची समाधी हे मुख्य स्थान. माताजी तिथे जवळच राहातात आणि आश्रमाचे कार्यालयही तेथेच. उपासना अशी स्वतंत्र नसतेच. समर्पणभावनेने असणे हीच उपासना. पण 'यावत् शरीरयात्रा तावत् कर्म' सुटत नसल्यामुळे आणि निष्कारण देहपीडा करण्याचे प्रयोजन नसल्यामुळे आश्रमाने अठरा कारखाने चालवले आहेत! यंत्रशाळा, उद्योगशाळा, पशुशाळा, विद्याशाळा, सब कुछ. अरविंदाश्रम म्हणजे चार आश्रमात पडलेली पाचव्याची भर आहे! ब्रह्मचर्याचा येथे आग्रह असतो; गृहस्थाश्रम म्हटला की अनुषंगाने उभा राहाणारा कर्मप्रपंच यात येतोच; हे वानप्रस्थही आहे; आणि आकांक्षासंन्यास हा तर मूळ आधारच आहे! म्हणजे चारी आश्रमांच्या दीनेइलाहीने तयार झालेला हा पाचवा आश्रम आहे!

आश्रमाचा आधार : आई : माताजी. त्यांच्या संमतीशिवाय येथे कोणाला कायम राहाता येणार नाही. ज्याची त्याची आध्यात्मिक योग्यता, प्रेरणा, अंतःशक्ती इत्यादी निकष मनोमन लावून मग अनुकूल कौल झाला तरच माताजी त्याला आश्रमात स्वीकारतात. ज्याने त्याने आपली ऐहिक मालमत्ता माताजींना अर्पण करून मगच आश्रमस्थ व्हावे. त्याच्या योगक्षेमाची जबाबदारी माताजींची. गंमत ही की सर्वांचा योगक्षेम एकाच पातळीवरून चालवण्याची गरज माताजींना वाटत नाही. ज्याला जशी सवय असेल तशी त्याची आश्रमात सोय होते. त्यामुळे बिनफर्निचरच्या कोठीत राहाणारी माणसे येथे असतात तशी सोफा-पलंग-रेफ्रिजिरेटरची सुखे अनुभवणारीही असतात! सर्वांना सोयी वेगवेगळ्या असल्या तरी रसोई मात्र एकच असते! रांगेत उभे

१३६८५


राहून थाळीपाटात हवे तेवढे जेवण घ्यावे. मात्र एका वाढपात! पुन्हा मिळणार नाही. भात, डाळ, दही, केळी, साखर, पाव, हाच रोज बेत. बेचव असणे हा आश्रमीय अन्नाचा जन्मसिद्ध हक्कच आहे! पण निष्कलंक भांडी, वाखाणण्याजोगी स्वच्छता, शिस्त, संयम...यांचा खोलवर परिणाम केल्याशिवाय राहाणार नाही ही रसोई.

प्रायोगिक शिक्षणसंस्था, ग्रंथशाला, मुद्रणशाला, उद्योगशाला असल्या विभागांचे दर्शन घेणाराला एक गोष्ट जाणवते. इथे करंटेपण नाही. दारिद्र्य आणि दीनता म्हणजे साधी राहणी व उच्च विचारसरणी असे इथे मानले जात नाही. 'योगः कर्मसु कौशलम्' हे इथे अनेकार्थांनी खरे आहे. स्वयंपूर्ण सामुदायिक जीवनाचा एक यशस्वी प्रयोग येथे चालला आहे. इथल्या उत्कृष्ट शाळा, पोहायचे तलाव आणि प्रशस्त क्रीडांगणे तर दृष्ट लागण्याजोगी आहेत. लिंगभेद न मानणाऱ्या या आश्रमातले किशोर-किशोरी आरोग्यसंपन्न, उत्साही, आनंदी आहेत. हे जगातले एक स्वतंत्र जग आहे. ही एक प्रचंड टेस्ट ट्यूब आहे. इथली उत्साहशक्ती फसफसली तरी बाहेर पडणार नाही. तुमच्या आमच्या सामान्य जगाला तिचा आत्ता तरी काहीही उपयोग नाही. नव्याने अवतरणाऱ्या पुरुषोत्तमाचे स्वागत करण्याची ही तयारी आहे असे हे लोक म्हणतात; पण आधीच अवतरलेल्या अधम पुरुषांसाठी यांच्याजवळ मोक्षमंत्र तर नाहीच, पण फुंकरदेखील नाही! पाँडीच्या आसमंतात पसरलेल्या दैन्यावर, दारिद्र्यावर यांच्याजवळ तोडगा नाही; इतकेच नव्हे, तर यांच्यासाठी आपण काही करावे असे येथे कोणालाही वाटत नाही. दूरतम भविष्याकडे एकटक पाहात तपश्चर्या करणाऱ्या या महात्म्यांना गळ्यापर्यंत वाढलेल्या वारुळांची, कोळिष्टकांची, विषवल्लींची पर्वा नाही!

— पण ते काही असले, तरी इथली क्रीडांगणे छानच आहेत! मुलगे आणि मुली एकाच तऱ्हेचा वेष करून एकच खेळ मैदानावर सरमिसळ खेळतात, त्यावेळी त्यांची गुटगुटीत शरीरे फारच गोजिरवाणी दिसतात! सगळे कसे छान छान आहे. पण समजा, पलीकडल्या शेतातला एक किडकिडीत मुलगा खोकत खोकत इथे आला तर? तर ही अमोघ आध्यात्मिक शक्ती त्याच्यासाठी काही करू शकत नाही. या गावातलेच

हे तिसरे पाटण त्या जर्जर मुलाला अंगणातही घेणार नाही. नैतिक दगडांनी पोरट्याला पिटाळून लावतील!

छे! असले काहूर पाँडीत माजणारच! मग पुन्हा आपले पाय समुद्राकडे वळवावेत. फ्रेंच साम्राज्यासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या स्मारकापाशी रेंगाळावे. आता त्या स्मृतींचा इतका त्रास होत नाही. झाले गेले समुद्राला मिळाले, असे म्हणावे. अगदी डुप्लेचा पुतळा पाहातानासुद्धा रागावू नये! आपल्या इतिहासात बराच वावरलेला हा महापुरुष! वास्तविक हा कुठल्याही हेस्टिंग्ज-डलहौसीसारखाच साम्राज्यलोलुप. पण पराभूत म्हणून किंचित हुतात्मा वाटणारा! समुद्राकडे पाहात त्याची पाषाणमूर्ती उंच चबुतऱ्यावर उभी आहे, दगांना रेलून चबुतरा! तो घडवला आहे प्राचीन हिंदू मंदिराच्या भव्य अवशेषांनी. फोडलेल्या मूर्तींचेच हे खांब झाले आहेत. आमच्या सौंदर्यशाली पवित्र परंपरेला पायाखाली तुडवून डुप्ले गर्वात उभा आहे. पण डुप्ले! तुझ्यावर आमचा राग नाही. एक गोष्ट मनात येते: आमच्या राज्यकर्त्यांची आणि म्हणून 'ऐतिहासिक' ठरलेली ही पाषाणस्मारके फोडण्याचा आग्रह वेडेपणाचा असेल; पण थारेपालट म्हणून असल्या चार डुप्लेंच्या माथ्यावर एका स्वातंत्र्यवीराचा पुतळा उभारायला काय हरकत आहे!



# रामेश्वरा! तूं कोठे रे गेलास!



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ................. दि: .................
क्रमांक ................. नों. दि .................

काशी-रामेश्वर हा एक देवताद्वंद्व समास आहे. या दोन्ही तीर्थांचा विचार आणि उच्चार एकदमच करण्याची रीत आपल्या देशात आहे. काशीला विश्वेश्वराची, विश्वाच्या धन्याची राजधानी; रामेश्वर हा परमेश्वराने—रामाने—पूजिलेला ईश्वर! म्हणजे दोहोंच्या माहात्म्यांत उणेअधिक मानण्याची शक्यताच नाही. भारतवर्षातल्या सगळ्या प्रमुख तीर्थांची किंवा चारी धामांची यात्रा घडो न घडो, या दोन क्षेत्रांचे दर्शन झाले की भारतीय मनाला धन्य धन्य वाटते, अशी काशीरामेश्वरांची मातब्बरी. पण श्रद्धेची शिदोरी तुटपुंजी बाळगणाऱ्या यात्रिकाला मात्र काशी-रामेश्वरांपैकी कोणते क्षेत्र अधिक उबग आणील हे ठरवणे कठीण आहे. प्रकाशमान होते ती 'काशी' अशी त्या नावाची व्युत्पत्ती आहे; पण प्रत्यक्षात मात्र घाणेरडे अंधारे गल्लीबोळ, बजबजलेले घाट, महारोगी, उनाड गाईबैल आणि त्यांच्या गराड्यात गावलेले एक अतिशय सामान्य मंदिर म्हणजे काशी! पण काशी कशी का असेना, रामेश्वराने वेगळे असायला हवे की नाही? कुठे रामेश्वर आणि कुठे काशी! उत्तर भारताची

प्राणनाडी गंगा. तिच्या प्रवाहात किती काफिले, तिच्या किनाऱ्यावर किती कारवाँ! कोट्यवधींच्या पायरवाने झिजलेले तिचे घाट. कल्पने-पलीकडे सुपीक तिची कूस. माणसे, माणसे आणि माणसे अशा दुआब्रात गर्दी, गचाळपणा, गलिच्छपणा, गाईगुरे, गिचमीड वस्ती ही सगळी घाण आपण अपेक्षीतच असतो. रामेश्वराची स्थिती वेगळी नाही का? पूर्व-दक्षिण समुद्रांच्या संगमाजवळ देशाच्या एका टोकाला क्षितिजान्त लाटांवर नजर लावणारा रामेश्वर. त्यालाही गोंधळी गल्ल्यांत कोंडून ठेवणे बरोबर आहे का? गैरशिस्त वस्तीच्या सगळ्या ओंगळ गंभारातून त्याला निर्लेप ठेवायला नको का आपण?

तुलनेनेच पाहिले तर काशीश्वरापेक्षा रामेश्वर बऱ्यापैकी जागेत राहातो हे उघडच आहे. तरीही एका निराळ्या ओवळेपणाने हे तीर्थ विटाळलेले आहे. ज्या यात्रिकाने आणि विशेषतः सौंदर्ययात्रिकाने रामे-श्वराबद्दल भाबड्या कल्पना केलेल्या असतील त्याचा दारुण अपेक्षाभंग झाल्याशिवाय राहाणार नाही. स्वप्न आणि सत्य यांच्यात तफावत तरी किती पडावी! 'यॅरो अनव्हिजिटेड' आणि 'यॅरो व्हिजिटेड' अशांतलाच हा प्रकार.

...हिरव्याकंच पोफळबनांतून, केळींच्या बागांतून वळणे घेत आपली वाट दक्षिणेकडे घरंगळत जाईल, नद्या आणि झरे ओलांडील; भातखाचरांच्या बहुरंगी जाजमावर काळ्या, पिवळ्या झोपड्या सोंगट्यां-सारख्या दिसत राहतील; कल्पवृक्ष माडांची साथसोबत सतत असेल: मग हळूहळू माणसांची वर्दळ कमीकमी होत जाईल; घामांचे वास मावळतील; गर्दीची गजबज विझेल; समुद्राच्या लाटांची धीरगंभीर गाज खर्ज लावून बसलेली असेल; तिचे ढालेपण हळूहळू वाढत जाईल...मग झाडामाडांच्या खुणाही हरवतील...वाळू ओलावत जाईल...खसफस-देखील ऐकू यायची नाही. अचानक पुन्हा एकदा माडांची एक एकाकी गर्दी दिसेल आणि तिथे निवांत बसला असेल ध्यानस्थ रामेश्वर. एखाददुसरा उग्र कर्मठ पुरुष त्याला अभिषेक घालीत असेल. मोजक्या यात्रेकरूंचा छोटासा मेळा मंदिरातल्या गारव्याला टेकून बसलेला दिसेल. आता आपणही अंधाऱ्या गूढ गाभाऱ्यात तेवणाऱ्या मंद नंदादीपाचा धूर पीत क्षणभर स्वस्थ असावे. या आणि अशाच कल्पना नाही का

आपण मनात खेळवीत! रामाने ज्याची पूजा बांधली तो देव एखाद्या बाजारपेठेत राहील कसा? सेतू म्हणजे हावडा ब्रिज नव्हे! जिवाशिवाच्या भेटीला बँड बडवू नये!

रामेश्वराच्या भेटीसाठी आपण वाटचाल करू लागलो की आपले स्वप्न आकाराला आल्यासारखा भास होऊ लागतो. मानमजुराई स्टेशनवरून दिसणाऱ्या नारळीपोफळी स्वप्नातल्या आश्वासनाची बूज ठेवतात. 'रामनाड' म्हणजे रामाचा देश! मोटरने येणाऱ्या प्रवाशाला आपले वाहन इथेच ठेवावे लागते. रामनाडहून 'मंडपम्' आणि मंडपमहून पामबनम्! म्हणजे एकाहून एक अद्भुतरम्य नावांची गावे. पामबनम्जवळून जाताना एक गोष्ट ध्यानात येते. जमीन आणि समुद्र हे द्वैत येथे संपलेले आहे! सगळे कसे एका पातळीवर आहे. जमिनीची पाण्यावर आणि पाण्याची जमिनीवर कुरघोडी नाही. एकमेकात खेळीमेळी आहे. ज्याला जशी आणि जेवढी जागा मिळेल तेवढी त्याने घ्यावी. थोडी मस्ती चालेल, पण किती थोडी? झोपाळ्यावर झोका देताघेता होते तेवढीच! पाण्यात जमीन दिसत राहाते आणि जमिनीवर पाणी!

म्हणून तर खाडीत दिसणाऱ्या कपारी-खडकांना सेतूचे अवशेष मानायला दिक्कत वाटत नाही!

पामबनात पोचल्यावर आपल्याला एक निर्णय घ्यायचा असतो. आधी कोठे जायचे? रामेश्वराला की धनुष्कोडीला? नकाशावर देश पाहाणाऱ्या मनाला हा प्रश्न हास्यास्पद वाटतो; कारण या दोन्ही नावांची स्थाने एकमेकांना चिकटून असलेली त्यात दिसतात. पण प्रत्यक्षात आहे तो बारा कोसांचा फेरा. धनुष्कोडी म्हणजे धनुष्याचे एक टोक, तर रामेश्वर दुसऱ्या टोकाला; पामबनम्वर मूठ ठेवावी लागते! पामबनम्हून सोळा मैलांवर धनुष्कोडी आहे. हे सोळा मैल तुडवताना आगगाडीदेखील तशी थकूनच जाते. हे पूर्वी 'येम्मेस्सेम' नावाने ओळखल्या जाणाऱ्या रेल्वेचे दक्षिण टोक. इथून निघणारी 'बोट ट्रेन' सरळ लंकेत पोचवते आपल्याला. भारताला आणि लंकेला विलग करणारी सामुद्रधुनी पंधरावीस मैल रुंद असेल नसेल! या सामुद्रधुनीच्या

तीरावरचे अंतिम भारतीय अग्र धनुष्कोडी. या अग्राकडे जाताना झाडी विरळ होत जाते, वस्ती विरळ होत जाते, आणि हवादेखील तापून विरळ झाल्यासारखी वाटते. पशुपक्षी तर पार हरवतात. गाईबैलमेंढरे तर सोडाच, कुत्रीमांजरेदेखील दिसेनाशी होतात. रेल्वेस्टेशनपासून दोन मैल पायी रपेट केली तर अगदी सीमान्त गाठल्याचा अनुभव घेतल्यासारखे वाटेल. कोणती सीमा संपते येथे? भारताची? आशियाची? उत्तरगोलार्धातल्या जमिनीची? कोणास ठाऊक! पण जमीन संपली आणि समुद्राचे राज्य सुरू झाले याचे चमत्कारिक भान इथे होते खरे. वास्तविक हा मान कन्याकुमारीचा. पण ती बिचारी भाबडी गुपचूप बसली. धनुष्कोडीने तो मान हिरावून घेतला—केवळ लंकेची वाट तेथून जाते म्हणून!

नद्यांचा संगम नित्याचा. समुद्रांचा संगम अपूर्वाईचा. बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर यांची भरतभेट इथे होते असे मानतात. का? कोण जाणे! उपसागर काय आणि महासागर काय! सगळे पाणीच ना? खूप आणि खारे. तसेच हिंदोळणारे, उचंबळणारे. त्यात कसल्या मानीव सीमारेखा आखायच्या? पण त्या आखलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर दोन्ही समुद्रांच्या पाण्याचे रंग वेगळे आहेत (असे म्हणतात.). दोघांच्या स्वभावातही फरक आहे (म्हणे!). उपसागर उच्छृंखल आहे, घोषबाज आहे; तर दक्षिण समुद्र दाक्षिण्ययुक्त आणि शांत आहे (खरेच का!)...थोडा वेळ थांबून, रणरणत्या उन्हात, रखरखत्या वाळूत उभे राहिले आणि पाण्याकडे एकटक पाहिले तर वेगवेगळे रंग दिसल्याचा भास होतो खरा! भरतीच्या वेळी दोन वेगवेगळ्या दिशांनी लाटा येतात आणि त्यांची सुरेख जळकात्री तयार होते. स्नानासाठी उतरणाऱ्या तीर्थकरूला या कात्रीत सापडावेसे वाटते. बाकी काही असो नसो, पुण्य मिळो न मिळो, स्वच्छ समुद्रजळांत आंघोळीचे सुख येथे बऱ्यापैकी मिळते. मात्र डुंबण्याला जरा रंग भरतो तेवढ्यात कोणीतरी पहारेकरी येऊन चमकावतो. जास्त पुढे जाऊ नका, कात्रीत सापडाल आणि नाहीसे व्हाल! ही वाटही बहुधा कँडी किंवा कोलंबोपर्यंत

जात असावी. पण ही पाणभुयारी वाट टाळावी; त्यापेक्षा बोटट्रेन बरी!

भरती पूर्ण झाली की दोन समुद्रांच्या मिलनरेषा एकमेकांना सुंदर छेद देतात. त्या जागी जमिनीच्या टोकावर उभे राहून, एकदा समुद्राला आणि एकदा भूमीला रुमाल हलवून बायबाय म्हणावे, म्हणजे धनुष्कोडीची यात्रा पुरे होते. पण एवढ्यावर ज्यांचे समाधान होत नाही त्यांनी काय करावे? धनुष्कोडीचे वैशिष्ट्य असे की या समुद्रसंगमाच्या क्षेत्री एकही देऊळ नाही! शेंदूर थापलेला दगडही तिरावर दिसणार नाही. हे अद्भुत कसे घडले कोण जाणे! आम्हा भारतीयांची कर्मकुशलता इथे कमी पडली! भाविकांची केवढी ही गैरसोय! पण देवाचे देऊळ असो नसो, भक्ताला भाव असतोच ना! त्यामुळे कुठेच नाही तर समुद्राला एक पावली दान करून माणसे परततात. प्रसाद नाही मिळत तर रुपयाभराचे शंखशिंपले पदरी घेतात. ओल्या वाळूवर आपली क्षणजीवी पावले उमटवून परत फिरायचे येथून.

कोठून कोठून येतात हे यात्रिक? पंजाबपासून, बंगालकडून, गुजरातेतून...आणि लाडक्या रांगड्या महाराष्ट्रामधूनही. अशीच आली होती एक यात्रापार्टी थेट औरंगाबाद-अहमदनगराहून. धनुष्कोडीच्या स्वच्छ सरळ क्षितिजरेषेवर मुंडाशी-पागोटी आणि गडदगहिरी लुगडी मी लगेच ओळखली. लहानमोठी, गरीबश्रीमंत माणसे, पोरे आणि म्हातारे...सगळेच. का आली ही माणसे! माझ्याकडे शिल्लक नसलेली श्रद्धा त्यांच्या संचितांत विपुल साठलेली आहे. आपल्या गावची पांढरी न ओलांडणारी ही माणसे बदरीकेदारला, द्वारकेला, पुरीला आणि रामेश्वरला कशासाठी येतात? कशी येतात? हा अनाद्यंत देश धर्माने, संस्कृतीने एक आहे म्हणून. काशी आणि रामेश्वर या नावांना स्थळकाळातीत असा संदर्भ आहे म्हणून. इतिहासाचा ग्रंथ हरवून बसलेली, तंत्रज्ञानाच्या बिगरीत नापास होणारी ही भारतमातेची लेकरे निदान आध्यात्मिक श्रद्धा जिवंत व ज्वलंत ठेवतात...असा उच्चउदात्त विचार मी मनात आणतो न आणतो तोच त्याला तडा

जायचा असतो! गंमत म्हणून यात्रेकरूंपैकी काही आजीबाईंशी मी बोलू लागतो. फारा दिवसांनी मराठी शब्दात विचारपूस झाल्याने आजीबाईंची मुद्रा सहजीच उजळते. यात्रेचा बेत ठरल्यापासून घडलेल्या सगळ्या घटना त्या मला सांगू लागतात. काही तपशील राहिला तर सोबतिणी अधेमधे भर घालतात. त्यातल्या एक ब्राह्मण बाई म्हणतात..."पाह्यलंत ना? यात्रा म्हटल्यावर काय काय सोसावं लागतं ते? सोबत असल्या सगळ्या खालच्या थरांतली माणसं. पण देवासाठी सगळं सहन करायचं!..." माझ्या मनावर चर्रकन एक ओरखडा निघतो. हे अध्यात्म! डोंबल! ज्या ठिकाणी 'जाति-व्यक्तीचे पडे बिंदुले' असा संत ज्ञानेश्वरांचा अभिप्राय त्याही ठिकाणी आपल्या जातिगोत्रांचे कुजके सोवळे स्वतःभोवती बांधणारी आम्ही क्षुद्र माणसे. कसली आमची भक्ती, आमची श्रद्धा आणि आमची सांस्कृतिक एकता!

वैराण वाळवंटातून विषण्ण मनाने परतताना कुठेच काही हिरवे दिसत नाही की मनाला कसल्याच गारव्याचा स्पर्श होत नाही. बारा कोसांचा प्रवास संपवून गाडी रामेश्वराला येते तेव्हा 'स्वप्नीचे धन' आठवून उगीचच हुरूप येतो!

स्टेशनपासून मंदिर दूर असले तरी वळणाची वाट तशी आवडण्यासारखी आहे. आग्नेय टोकाला अवतरलेले छोटेसे कोकणच हे. फारा दिवसांनी शेवगा आणि पांढरा चाफा या दोन्ही जुन्या मित्रांची इथे गाटभेट होते. त्यांचा मंदसा सपकारा मनात वागवीतच देवळाजवळ यावे. आजूबाजूला समुद्राची दौलत स्वस्तात ओपणारी दुकाने आहेत. कुठल्याकुठल्या राजामहाराजांनी अनर्घ्य रत्ने आणि मोलाचे मोती लुटून नेल्यामुळे समुद्राजवळ फक्त शंखशिंपले राहिले आहेत याची प्रचिती इथे मिळते. शंखांचा व्यवहार अक्कलहुशारीने चालतो! शून्यातून हजार कमावण्याचा धंदा हा. कवडीकवडी विकून रेवडी मिळविण्याची करामत ही. सराईत फसवेकऱ्यांच्या हातात सापडू नये आणि सापडल्यास फार अटीतटीची घासाघीस करू नये. कुंकू, करंडे, देवदेवतांचे फोटो वा मूर्ती इत्यादी 'प्रसाद' पाचसातशे मैल वाहून नेण्यापेक्षा तो आपल्याच गावात घ्यायला काय हरकत आहे? नाहीतरी प्रसाद खरेदीच करायचा ना! मग पुण्याच्या किंवा

मुंबईच्या मंडईत न मिळण्यासारखे काय असणार त्यात? केवळ स्थानमाहात्म्य!

देव झोपतो इथे. म्हणजे आपली दुपारची वामकुक्षी! इकडे देव माणसांसारखेच आळशी असतात, स्वस्थपणे आंघोळी करतात, देहोपचार करून घेतात, भोजन करतात, झोपतात, चहाच्या वेळेला उठतात (मात्र दूध पितात), भक्तमंडळींना सायंकाळी भेटतात, रात्री वेळेवर शहाण्या माणसांसारखे गुडुप होतात. साहजिकच इकडे देवांना संपत्ती आणि आरोग्य झकास लाभते. देवाच्या मुलाखतीची वेळ येईपर्यंत क्षेत्री हिंडावे, खरेदी आटोपावी, पोटाची पूजा करावी, असा विवेकशील खाक्या असतो. पण होते काय, मन चौकस असले, अंतर्यामीचा वस्तीकर शंकासुर असला म्हणजे दिसू नये ते दिसू लागते. रामेश्वरालाच पाहा. मंदिरात पाऊल ठेवताक्षणी देवाजीपर्यंत जाता येते तर कितीतरी दुःख कमी होते! कुष्ठरोग्यांचा गराडा ही तर आपल्या देवस्थानांची कायम आरास असतेच; पण त्यापेक्षाही इथे मुंडितमुंड भाविकांच्या झुंडीच्या झुंडी अधिक किळसवाण्या वाटतात. ही कसली ओंगळ प्रथा पडली आहे कुणास ठाऊक. अल्पवयीन बालके, तरण्याताठ्या स्त्रिया आणि कातडी सर्वांगी लोंबू लागलेल्या वृद्धा यांनी तुळतुळीत हजामत केल्याशिवाय त्यांच्या धार्मिकतेची सांगताच इथे होत नाही! आधीच ओंगळ रूप, त्यांत क्षेत्रीचे बुचकळीस्नान, वणवणयात्रेचा कोरडा राप आणि वर ही हिडीस मुंडणे! हरे राम रामेश्वरा! भक्तांची आणि भक्तांचे दर्शन घेणाऱ्यांची का रे अशी छळणा आरंभली आहेस?

रामेश्वरम्! प्रचंड मंदिराच्या विस्तीर्ण आवारात एक फेरी मारतानाच दमछाक होते. मंदिराभोवतालच्या भव्य प्रदक्षिणामार्गाची लांबी बाराशेवीस मीटर्स म्हणजे चारहजार फूट आहे. प्रत्येक ओवरीची राजेशाही भव्यता, विलक्षण दीर्घता आणि नेत्रवेधी कलाकुसर न भूतो न भविष्यति या तोलाची. पण सध्या या कलासौंदर्याचा पद्धतशीर विनाश चालू आहे. कोणातरी विश्वस्ताच्या मनात एक पापमय पुण्य उगवले! देवळाची डागडुजी करण्याचे! डागडुजीच्या नावावर मंडळींनी काय

काय अनाचार करावे ? खांबखांबावर चक्क चुन्याचे प्लास्टर मारून त्यांना आखीवरेखीव करण्यात येत आहे. म्हणजे सगळ्या सुंदर मूर्तींना अक्षरशः चुन्यात चिणले जात आहे. भूमितीतल्या आकृतींची प्रमाणबद्ध सरलता हवी आहे विश्वस्तांना. याशिवाय ठिकठिकाणी नको ते व नको तेवढे रंग माखून सौंदर्य वाढवण्याचे काम वेगळेच. 'द्राविड स्थापत्याचा सर्वोत्कृष्ट नमुना' अशी या मंदिराची फर्ग्युसनने स्तुती केली होती. आता ती विसरायला हवी. मंदिराची मशीद करणाऱ्या असहिष्णूंपेक्षा या भक्तांचा हा धुमाकूळ अश्लाघ्य आहे. लाखो रुपये उधळून ही बीभत्सता फुलवण्यात येत आहे. बिचारा प्रभुरामचंद्र! रावणाचा नाश केल्यावर त्या 'ब्रह्महत्ये'चे प्रायश्चित्त घेण्यासाठी रामाने इथे शंकराची पूजा केली म्हणे. तो हा रामेश्वर. तसल्या अस्थानी प्रायश्चित्ताबद्दल त्याला आता हे प्रायश्चित्त भोगायला लागते आहे, तेही भक्तांहाती!


या मंदिराचे पुजारी महाराष्ट्रीय आहेत. सगळे म्हणजे बाराच्या बारा जण महाराष्ट्रातले ब्राह्मण आहेत. त्यांपैकी एकाला सहज म्हटले, "पेशवाईत आली का ही मंडळी?" त्यांनी ब्रह्मतेज प्रज्वलित करून म्हटले, "हुंः! पेशवे कालचे पोर! आमची घराणी सहाशे वर्षे तरी इथे नांदत आहेत. मंदिराच्या दप्तरात पुरावा आहे तसा!" मी पुरावा कशाला पाहायला जातो? पण असणारच ही मंडळी पूर्वापार. सरकारी गॅझेटप्रमाणे मात्र मंदिराच्या रचनेला चारशे वर्षेच झाली! ते काही का असेना—माझ्या मराठी मनाला पुन्हा जरा बरे वाटले! शेकडो कोसांवरून येणारे हे ब्राह्मण, माझ्या मुलखातले, ब्रह्मस्वी मनःस्वी असले पाहिजेत. एरवी यांनाच पूजाधिकार का मिळावा? नेपाळमध्ये पशुपतेश्वराची पूजाही दक्षिणी ब्राह्मणांकडे मुद्दाम सोपविली आहे—ते शाकाहारी म्हणून! तेव्हा आमच्या ब्राह्मण्याचा हा उत्तर-दक्षिण दिग्विजय विलक्षण म्हणायचा! थोड्या वेळाने बाजारात मराठी ब्राह्मणांच्या पाट्या दिसू लागल्या. इथेही कोकणस्थ, कऱ्हाडे, देशस्थ इत्यादी कोंड्या आहेतच! म्हणजे पुन्हा धनुष्कोडीच्या कहाणीची पुनरावृत्ती! ज्या ब्रह्ममूर्तींच्या कट्ट्यावर मी विसावलो त्यांनी माझे आगतस्वागत चांगले केले. पण बरोबरच्या सारस्वत मित्राचे नाव

‘दामले’ असे सांगण्याची मला बुद्धी झाली या अधःपाताला काय म्हणावे!

घाणेरडी हॉटेले, निरुंद गल्ल्या, अभद्र दिसणारे स्त्री-पुरुष यांच्या कोंडाळ्यातून जरा समुद्राकडे फिरकावे तर तेथेही बुचकळ्या मारणाऱ्या अगणित गलिच्छांची गर्दी आहेच. जवळच शंकराचार्यांचे उपासना-स्थान आहे. ते दुरूनच पाहावे. जवळ गेल्यास बेंगरूळ बुटबैंगण पुतळे आणि अशुद्ध वचने हैराण करतात. या साऱ्या अक्षरशः दुष्टचक्रातून बाहेर पडल्यावर ‘हेचि फळ काय मम तपाला’ असे म्हणत कपाळाला हात लावून मान खाली घालून जावे. वर पाहू नये. पाहिले तर काय होते? एका चांगल्या तिठ्यावर महात्मा गांधींचा (!) एक भीषण पुतळा दिसतो. हा पुतळाही रंगवलेला आहे! रुपेरी माशासारखी बापूजींची ती अंगकांती, लिपस्टिक लावल्यासारखे किंवा झकास तमाखू जमल्यासारखे लाल ओठ, पिंगट मिशा, एकाद्या खेड्यातल्या लुच्च्या शेठजींसारखी बेरकी नजर...हे पाहायला मर्द मराठी छातीच हवी! आता हे खरे की हा आपल्या देशातला एकमेव वाईट पुतळा नव्हे. दक्षिणेत प्रत्येक छोट्या शहरात असा एकेक पुतळा असतोच. महाराष्ट्रातदेखील असा किंवा याहून वाईट पुतळा आहे. (कोपरगावच्या बागेत चक्कर मारून पाहाता येईल!) पण रामेश्वरी हे विडंबन विशेष कौशल्याने जीव घेते. देशोदेशींची माणसे तेथे द्राविड कलेचा परमोत्कर्ष पाहायला येणार आणि हे असले रूप पाहून जाणार?

हे सगळे जेथे आहे तेथे रामेश्वर वसतीला असेल का? शक्य नाही. माझ्या कल्पनेप्रमाणे त्याने रामाप्रमाणेच पाण्यात बुडी घेतली आहे. समुद्रसंगमात तो अंतर्धान पावला. आता पाण्याच्या अगदी तळाशी उसळत्या पाण्याचेच शिवलिंग कोणा मोतीवेच्याला दिसले तर त्याने हातातली मुक्तांजली त्याला वाहावी अशी विनंती आहे.

रामेश्वरा! तू कोठे रे गेला असशील!


कन्या कुमारी

भल्याभल्या विद्वानांना भूगोलात नापास करावयाचे असेल तर त्यांना जे प्रश्न विचारायचे त्यात, 'कन्याकुमारी कोणत्या राज्यात आहे?' हा प्रश्न विचारावा. बहुतेकांचे उत्तर 'केरळात' असे येईल. पण कन्याकुमारी आहे तामिळनाडमधे. गंमत अशी की कन्याकुमारीच्या भेटीला जाणारे बहुतेक लोक केरळ-यात्रेच्या कार्यक्रमांत ती भेट चपखल बसवतात. त्रिवेंद्रमहून हे स्थान केवळ पंचवीस कोसांवर असल्यामुळे तेथे गेलेला कोणीही सुजाण माणूस कन्याकुमारीपर्यंतचा सुंदर प्रवास केल्यावाचून राहात नाही. कन्याकुमारीच्या अलीकडे बाराव्या मैलापासून तामीळनाड राज्य सुरू होते. पूर्वी ही समजूत पटायला अडचण होती; पण आता ती दूर झाली आहे. केरळमधील देवळे रंगवलेली नाहीत; आणि तामीळनाडमधली मात्र बटबटीत रंगाने माखलेली आहेत! तेव्हा रंगी-बेरंगी देऊळ दिसले की ती भूमी तामिळनाडची म्हणून सांगावयास हरकत नाही!!

नकाशात अणकुचीदार दिसणारी भूशिरे प्रत्यक्षात चांगली रुंद असतात असा आपला नेहमीचा अनुभव असतो. कन्याकुमारीची गोष्ट

वेगळी आहे. तेथे जाईतो पूर्वपश्चिम बाजूंनी जमीन निरुंद होत चालल्याची गमतीची जाणीव होत राहाते. डोंगरटेकड्या मैलागणीक खुज्या होत जातात; शेवटीशेवटी तर त्यांची उंची झपाट्याने उतरत जाते. झाडझाडोरा पार मावळतो. दोन्ही बाजूंनी समुद्राची गाज निःपक्षपातीपणाने कानावर आदळू लागते. मग आपले मन उगीचच उचंबळून येते. आपल्या मातृभूमीचे चरण धुणारा दक्षिण समुद्र दोन्ही बाजूला पारिपार्श्वक घेऊन आपल्या स्वागतासाठी हाकेवर उभा आहे याचे भान होते. 'काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत' या जादूच्या शब्दांचा अर्थ येथे उत्कटपणे प्रत्ययाला येतो. हिमालयाच्या शिखरापासून आपले मन गंगेसारखे धावत खाली उतरते. सगळा आर्यावर्त कवेत घेऊन, नर्मदेच्या अंकावर बागडून, कृष्णाकावेरींच्या वेण्यांशी चाळा करून हे मन आता कन्याकुमारीच्या समुद्रात पाय सोडून बसणार असते. पायपिटी पुष्कळ झाली; आटपाट नगरे पाहात पुष्कळ हिंडलो; नद्यानाले ओलांडले; शेतराने तुडविली; आता मात्र सगळे रस्ते एका बिंदूला मिळणार आहेत, तेथे वाटचालीने तापलेली-शिणलेली पावले पाण्यात सोडून शांत बसावे, सर्व तीर्थांची सांगता येथे झाली असे म्हणून मनातला कोलाहल निववावा...हीच इच्छा या देशावर प्रेम करणाऱ्या कुणाच्याही मनात येईल.

कन्याकुमारी गाव अगदी छोटे आहे. देवीचे देऊळ येथे नसते तर ते अगदीच बिचारे वाटले असते. पण देवीने गावाला बऱ्यापैकी बरकत आणली आहे. निदान दोनतीन चांगली हॉटेले आणि नावापुरती बाजारपेठ एवढा तरी गावाचा लाभ झाला आहे. ज्याला 'काळ' नावाचा ससेमिरा नसेल आणि पोटापाण्याची विवंचना नसेल त्याचे दिवस येथे फार फार सुखात जातील. दुसऱ्या कोणत्याही समुद्रकिनाऱ्यावर बसलो की 'काही योजनांपलीकडे जमीन आहे, तिथेही माणसांची गडबड आहे, या पाण्याच्या गालिच्यावरून चालत गेले की आपण ब्रह्मी किंवा स्वाहिली शब्दांच्या गजबजीत पोचू,' असे उगीचच वाटत राहाते. कन्याकुमारीच्या समुद्राची गोष्ट वेगळी! तो न संपणारा समुद्र आहे. दक्षिणेचा मार्ग कितीही कापला तरी दक्षिण ध्रुवावर शीर्षासन घालीपर्यंत

जमीन लागणार नाही या चमत्कारिक भावनेमुळे हा महासमुद्र अगाध आणि अनंत वाटतो. सर्व नद्यांचे पाणी वाहात वाहात, समुद्र आणि उपसागर यांतून अंतःस्थ झऱ्यासारखे झिरपत झिरपत, इथे महासागराला मिळाले असेच वाटत राहाते. सर्व देवांना केलेला नमस्कार केशवाला पोचतो तो इथे !

भारताची दक्षिण सीमा सुईच्या अग्राएवढी, पण आमच्या क्षुद्र मनात न सामावण्याइतकी मोठी. अथांग समुद्रातून जाणारी कितीतरी जहाजे, एखाद्या लोहचुंबकाच्या अग्राला लोहकण चिकटावे तशी, या चिंचोळ्या किनाऱ्याकडे खेचली गेली. पश्चिमेकडून पूर्व समुद्रात शिरकाव करू पाहाणाऱ्या साहसी दर्यावर्दींना जीवदान दिले कन्याकुमारीने. भोवतालच्या समुद्रात खडकच खडक. त्यावर तारवे आदळली की सौदागरांच्या घरी हाहाःकार होणार. त्यांच्या सौभाग्याची काळजी कन्याकुमारीला ! तिने नाविकांना इशारा करावा. पण तो ही कसा ? तिच्या देवळासमोर दीपमाळ नाही की तिच्या अंगणाच्या पंचक्रोशीत दीपस्तंभ नाही. आणि तरीही कन्याकुमारी जहाजांना इशारा देई. हा इशारा तिने कसा द्यावा ? तिच्या नासिकेतील अलंकारात तिने एक इतका तेजस्वी हिरा धारण केला की त्याच्या लखलखत्या तेजाची तिरीप दूरस्थ नौकांना सावध करी ! इतका सूक्ष्म दीपस्तंभ जगात कुठे असेल काय ? हा दीपस्तंभ आजही नाविकांना नाही तरी भाविकांना प्रकाश देतोच आहे !

कन्याकुमारीच्या समुद्रावर देशविदेशांतील माणसे गोळा होतात ती आणखी एका ओढीने. समुद्रात उगवून समुद्रातच मावळणारे सूर्य-चंद्र पाहायचे तर कन्याकुमारीलाच यायला पाहिजे. त्यात पौर्णिमेच्या दिवशी विशेष नेत्रसुख. एका बाजूने चंद्र उगवत आहे तर दुसऱ्या बाजूला सूर्य मावळत आहे असे दृश्य कोणाला पाहायला आवडणार नाही ? रैवतक पर्वतावरून असे दृश्य माघकवीला दिसले होते असे दिसते ! पर्वताच्या एका बाजूला सूर्य व दुसऱ्या बाजूला चंद्र दिसताच त्याला तो पर्वत दोन्ही कुशींवर सुवर्णघंटा मिरवणाऱ्या गजराजासारखा दिसला म्हणे ! बहुधा हे सारे कल्पनेतच घडले. पण त्याच्या वाचकांना कल्पना इतकी पसंत पडली की त्यांनी त्याला 'घंटामाघ' अशी पदवी दिली ! माघ कन्याकुमारीला आला असता आणि हेलावणाऱ्या

सागराच्या दोन्ही क्षितिजांवर दोन सुवर्णबिंबे त्याने पाहिली असती तर त्याच्या उत्प्रेक्षेला तेजस्वी पंख फुटले असते. माघाच्या नशिबात जे नव्हते ते आपल्या नशिबात आहे अशा भ्रमाने मी पौर्णिमेच्या दिवशी उन्हे उतरत आहेत तो वेळेवर समुद्राच्या वेळेवर पोचलो. माझ्यापेक्षा फारच चलाख असलेली शेकडो माणसे तिथे आधीच जमली होती! एखाद्या सम्राटाच्या मिरवणुकीसाठी गवाक्षातून आणि सज्जातून लोकांनी गर्दी करावी तशी गर्दी या बड्या दोघांच्या दर्शनासाठी झाली होती. कट्ट्यावर, खडकांवर, शिखरांवर जेथे जागा सापडेल तेथे माणसे बसली होती. अघटित पाहाण्यासाठी सर्वांच्या नजरा उत्सुक झाल्या होत्या. पण माझा पायगूण असा की मी पोचल्या-पासून अर्ध्या तासाच्या आत दोन्ही क्षितिजांवर मला पाहाण्यासाठी ढगांची प्रचंड दाटी झाली! हा सूर्य आणि हा चंद्र असा उद्‌गार काढीत दोघांचे कौतुक करण्याची सुवर्णघटिका केव्हाच पाण्यात बुडाली होती!! सरसावलेले कॅमेरे आणि रुंदावलेले डोळे मिटून माणसे हळूहळू पांगली. आता राहिले पर्वकाळचे समुद्रस्नान. समुद्रस्नान म्हणायचे, पण ते आपले नावापुरते. काय गंमत आहे पाहा: एक सोडून दोन समुद्र जेथे तिसऱ्या समुद्राला मिळतात त्या त्रिवेणी संगमात स्नान करायला माणसे कचरतात! इकडून तिकडून लाटांच्या थपडा बसतील, संगनमत करणारे समुद्र एखाद्या चोरधारेने आपल्याला पाताळलोकात नेतील, या भयाने त्यांच्या अंगचटीला कुणी जात नाही; पण समुद्रस्नानाचे पुण्यही सोडवत नाही! डोकेबाज माणसाने यातून मार्ग काढला. भर समुद्रात भिंती बांधून तेथेही कुंड करण्याचे कसब त्याने दाखवले. चुळकाचुळका पाणी बुडुकबुडुक तांब्याने घेत खुडुकपणाने स्नान करणारी माणसे धन्य होत. हे आधीच तीर्थाचे तीर्थ! आणि त्यात कुंडात नहाणाऱ्या माणसांचे तीर्थ! एवढ्या पुण्याला माझ्या मनात जागा नसल्यामुळे म्या पाप्याने तेथून माघार घेतली! बाकी त्यावेळी तेथे स्नान केल्यास हिंदुस्थानातील नाना प्रांतातल्या माणसांच्या अति-निकट सान्निध्यात येण्याची संधी होती!!

सूर्य-चंद्रांनी फसवले तरी कन्याकुमारी फसवणार नव्हती. मुख्य म्हणजे आपण मंदिरात जावे अशी क्वचितच होणारी प्रेरणा मला

झाली होती. कन्याव्रताने राहाणाऱ्या पार्वतीची मूर्ती मला पाहायची होती. हिमालयाची कन्या घरापासून इतक्या दूरावर अक्षरशः घराकडे पाठ फिरवून अगस्तीच्या राज्याच्या सीमान्तावर का बरे आली? केवढी ही तपश्चर्या! अनंत काळासाठी यौवनाच्या उंबऱ्यावरच ओठंगून उभी असणारी, आपला बालभाव जपणारी चिमुरडी देवी मला पाहायची होती. तिच्या प्रतिमा मी पाहिल्या होत्या. त्या मला आवडल्या होत्या. आपल्या पाषाणमूर्तींचा नेहमीचा बटबटीतपणा त्या चित्रदर्शनात तरी मला दिसला नव्हता. संध्याकाळच्या वाढत्या अंधारात दूरावरून झांज-घंटांचा ध्वनी आला. धुपाची चक्री तान कुठे तरी भिरभिरली. भाविकांच्या हातातील केळी-नारळांचे वास हवेत मिसळले. एका अनामिक ओढीने मंदिराच्या दाराशी मी गेलो. तिथे कळले की फक्त 'मुंडू' नेसलेल्या माणसांनाच मंदिरात प्रवेश आहे. 'मुंडू' म्हणजे गोल धोतर! अंगांत बंडी, सदरा काहीही असता कामा नये. अशा वेषात कोठल्याही कन्याकुमारीकडे जायला मला संकोच वाटतो! पण इथे तिचीच इच्छा तशी पडली तेव्हा 'मुंडू' गुंडाळून आत गेलो. आरतीची वेळ झाली होती. फुलांनी आणि जरतारी वस्त्रांनी झाकून गेलेल्या देवीच्या मुखाचे तेवढे दर्शन घडत होते. पुजाऱ्यांच्या हातांतले निरांजन वर गेले की देवीच्या चेहऱ्यावर विलक्षण उजाळा येऊन जाई. तिची मुद्रा विलक्षण आहे खरी. आहे-नाही एवढे स्मित करणारा तो निरागस चेहरा पाहात राहावे असे वाटते. झाकलेल्या मूर्तीची जी चण ध्यानात येत होती तीही तिच्या बालभावाला पोषक अशीच होती. देवीच्या नेत्रांतही बहुमोल हिरे जडवले होते, पण कोणा भक्ताने एक हिरा नेला असे म्हणतात. खरेखोटे देवीला माहीत!

देवळातून बाहेर पडलो त्या वेळी ही लक्ष्मी किंवा पार्वती किंवा सरस्वती किंवा अमूकच नाव धारण करणारी मूर्ती मी पाहिली असे मनातही येईना. इतकेच नव्हे तर, ही माया, ही शक्ती असलाही विचार ठरेना. माझे, तुमचे, आपणा सर्वांचे शैशव एकत्र साठवून घडवलेली कोणा कल्पकाची एक कल्पना हेच या देवीचे रूप. अशी बालभावाची देवता आणखी कुठे असेल असे वाटत नाही.

'आधी देवी, मग जेवी' असे मनाला सांगितले होते; म्हणून देवळातून निघाल्यावर हॉटेल गाठले...या वेळीं मात्र ढगांच्या गर्दीतून चंद्रगोल चांगलाच वर आला होता. वातावरणात भुताटकी भरत चालली होती. या भुताटकीनेच मलाही झपाटले असावे. म्हणून रात्री अकरा वाजून गेल्यावर माझी पावले पुन्हा समुद्राकडे वळली. त्यांचे ठसे बहुधा उलटेच उमटले असतील! आता कुंडातल्या बुचकळ्या संपल्या होत्या. माणसे वस्तीला गेली होती आणि तिन्ही समुद्रांवर चांदण्याचा क्षीरसागर वरून झेपावला होता. मध्यरात्री कन्याकुमारीच्या समुद्रापाशी उभा राहिलो मात्र, उगीचच डोळे भरून आले. असे वाटले, समुद्रस्नान न करणारे आपण मूर्ख आहोत. आपल्या अंगाला खोट्या सभ्यतेची घाण येत आहे. आपण नास्तिकतेचे ढोंग करीत आहो. निदान या देशावर तरी आपली अपार निष्ठा आहे हे जर खरे तर इथल्या समुद्रात प्रवेश केल्याशिवाय ही जागा सोडणे पाप नाही का? मी पाहिलेले डोंगर, तरलेल्या नद्या, ज्यांच्यांत मिसळलो ते सगळे नानापंथी लोक या सर्वांची आपल्याला शपथ आहे असेच वाटत राहिले. इथे मुलापेक्षा मूल व्हायला, कणातला कण व्हायला, अहंकाराचे ओवळे बाजूला ठेवायला काय हरकत आहे? ब्रह्मपुत्रेने, गंगेने, यमुनेने माझ्यावर आपली पुण्यशील मोहिनी घातली नाही; पण या समुद्राने माझा सगळा पीळ उलगडून टाकला. रात्री बारा वाजता केलेल्या त्या समुद्रस्नानाची आठवण विसरणे अशक्य आहे. सायंकाळी आपण खोट्या अभिमानाने तीर्थस्नान टाळले, या अनुतापाने, प्रायश्चित्तबुद्धीने, देशाचे स्मरण रामनामासारखे करीत स्वतःला खुशाल भावनावश होऊ देत केलेले हे स्नान माझ्याकडून पुन्हा घडेल असे वाटत नाही.

कन्याकुमारीला आता एक नवे तीर्थ तयार झाले आहे. गांधीजींची रक्षा समुद्रास्तृप्यन्तु करण्यापूर्वी ज्या ठिकाणी काही काळ विसावली त्या ठिकाणी एक गांधीमंदिर निर्माण करण्यात आले आहे. हे आधुनिक तीर्थ असल्यामुळे याचे स्थापत्य खूपच बाईट आहे. ते धड भारतीय नाही की विदेशी नाही. प्राचीन नाही की अर्वाचीन नाही. एका घंटाकार मंदिराला पुढे प्रचंड नळ जोडलेला आहे! बाजूने तो भाग अक्षरशः निस्सेन झोपडीसारखा दिसतो. आत गांधींचा वेंगरूळ पुतळा

नाही हे मात्र भाग्य होय. मंदिराच्या सौधांचा उपयोग निसर्गदर्शनासाठी होतो हाच त्याचा फायदा. पण जेथे रक्षा-करंडक ठेवलेला होता तेथे वृंदावनासारखा एक ओटा बांधला आहे, त्या ओट्याजवळ भाविकांची गर्दी होतीच. एक दाक्षिणात्य कुटुंब आपल्या पाचसहा वर्षांच्या पोरासह मंदिरात आले होते. ओट्याला आईवडिलांनी का नमस्कार केला हे पोराला कसे उमगणार? ते तसेच उभे राहिले. नमस्कार करेना की वाकेना. आईवडिलांनी शिकवले तरीही तसेच हुप्प उभे राहिले. शेवटी बापाने त्याची मुंडी धरून त्याच्या रडण्याकडे दुर्लक्ष करून त्याचे नाक जमिनीवर घासले आणि मग वृंदावनावरील धूळ भस्मासारखी बोटावर घेऊन ती त्याच्या कपाळी फासली! मुळात मूल होणाऱ्या बापूजींच्या आत्म्याला काय वाटले असेल कुणास ठाऊक! माणसे देव कशी बनवतात त्याची प्रक्रियाच आज आपण आपल्या देशात पाहू शकतो. बिचारे पोर आणि त्याहूनही बिचारे गांधीजी!!


आणखी एक तीर्थस्थान कन्याकुमारीच्या समुद्रात उभे राहायचे होते. पण त्याला मुहूर्त लागत नाही. स्वामी विवेकानंद यांनी ज्या खडकावर समाधी लावली होती त्यावर त्यांचे भव्य स्मारक करण्याची योजना आजही मूर्त होऊ शकत नाही. हा खडक किनाऱ्यापासून दोन-तीनशे यार्डांवर असेलनसेल. होडीने तिथवर जाऊन येता येते. पण सध्या सरकारी हुकुमानुसार तिथे प्रवेशबंदी आहे. खडक कसला, रणभूमीच आहे ती. हिंदुख्रिश्चनांत खडकावरून बेबनाव झाला म्हणे. स्वामी विवेकानंदांचे स्मारक त्या खडकावर होऊ नये असे ख्रिश्चनांना का वाटावे कोण जाणे. स्मारकसमितीने तिथे भव्य पुतळा उभारायचे ठरविले, जागेची पुनःपुन्हा पाहाणी झाली, शिल्पकाराने योजना केली, ती समितीने पसंत केली. हातात दंड धारण करणाऱ्या विवेकानंदांची संदेशदायी मूर्ती दक्षिण समुद्रात उंच पीठावर उभी करण्याची योजना होती ती. एक दिवस अचानक खडकावर क्रूस उगवला! सर्वधर्मपरिषदेच्या त्या धीरोदात्त नायकाचे रूप विशिष्ट धर्मीयांना नको असल्याचा देखावा उभा राहिला. धार्मिक तेढ वाढू नये म्हणून तामीळनाडच्या सरकारने स्मारकाला परवानगी नाकारली. झाले, प्रकरण पेटले! दिल्लीला साडेतीनशे खासदारांनी नेहरूंकडे अर्ज केला, स्मारक झालेच पाहिजे.

नेहरूंनी राज्य सरकारला फेरविचार करण्याची सूचना केली. होता होता मुख्य मंत्री पुन्हा त्या ठायी जेहेत्ते उपस्थित झाले! आणि त्यांनी तोडगा सुचवला तो इतका उत्तम की स्मारकसमितीने त्याचा विचार करण्याचीही त्याची योग्यता नाही! मंत्रिवर्य म्हणाले, खडकावर ख्रिश्चनांचा काही ताबा नाही हे खरे. पण भव्य पुतळा उभारून त्या प्रेमधर्मी समाजाला का चिडवा! त्याच्यापेक्षा मारुतीच्या देवळासारखे एक छोटे बंदिस्त मंदिर उभारून त्यात विवेकानंदांची मूर्ती ठेवा. स्मारक झाल्याशी कारण! यंव! आहे की नाही समन्वय! देवळात स्पृश्य आणि अस्पृश्य दोघांनाही विशिष्ट मर्यादेपुढे जाता येऊ नये म्हणून मधे आडवा दांडा घालण्याची सूचना करणारा केळकरी मवाळपणा मद्रासच्या मुख्य मंत्र्यांनी दाखवावा, हा नेमस्त पक्षाचा वैचारिक विजयच नाही का? 'यत्र विश्वं भवति एकनीडम्' म्हणणाऱ्या पुरुषाला 'यत्र नीडं भवति निखिलविश्वम्' असा हिसका दाखविणाऱ्यांची हिंमत खरी! समुद्रात उभ्या असलेल्या एका उत्तुंग मूर्तीचे दर्शन दहावीस कोसांवरून जाणाऱ्या जहाजांना होत राहावे अशी शिल्पकाराची कल्पना; गवाळ्यात चोरून हात घालून देवाला गंध लावणाऱ्या हुषार मंत्र्याला ती कशी समजणार! स्थानिक आमदार तरी कसा! कन्याकुमारी मतदानक्षेत्रात ख्रिश्चन मतदारांची बहुसंख्या असल्यामुळे त्याने झकास गुळणा धरलेला आहे. एकूण आनंद आहे.

कन्याकुमारीला या वादाचे काही नाही. तिची चंदनचर्चित कृष्ण पाषाणाची मुद्रा स्मितसुंदर आहे. तिचा भाव भाबडेपणाचा. ती अनंतकाळ अशीच उभी राहाणार आहे. तिच्या माथ्यावरून रवि-चंद्रांची आकाशयाने अशीच जाणार आहेत. त्यांचे समुद्रातले उदयास्त पाहाण्यासाठी चाळिसाव्या शतकातही गर्दी होणार आहे. तोपर्यंत गांधींच्या देवळात बडव्यांच्या वेचाळीस पिढ्या नांदलेल्या असणार. शूल आणि क्रूस यांच्यासकट तो उंच खडक कदाचित पाण्याने गिळलेलाही असेल. हे आणखी असले पुष्कळ काही काही होईल. पण कुमारीव्रताची देवी हसतच राहील. तिन्ही समुद्रांच्या संगमात भाविक उतरोत न उतरोत, चांदण्या रात्रीने झपाटलेले कवी ओल्या डोळ्यांनी जरूर उतरतील.



# भुताटकीचा मांडव



इंदूरच्या अलीकडे साधारण पंचवीसएक मैलांवर राजरस्ता सोडावा. डावीकडची जरा अरुंद असलेली वाट धरावी. त्या बाजूला मांडवगड उर्फ मांडव उर्फ माझा मित्र मांडू राहातो!

वाट जरा घाटदार आहे म्हणून आपण डोंगरमाथ्यावर चालल्याचे थोडे थोडे भान होईल; एरवी डोंगरी किल्ल्यावर आपण जात आहो हे लक्षात देखील येणार नाही. चढण आहे पण तिला बिकटपणा कसा तो नाही. उंची आहे पण तिच्याहून रुंदी फार मोठी असल्याने ती तशी झाकलेलीच राहाते. किल्ला एवढ्या मोठ्या जागेवर पसरलेला आहे की त्याच्या पोटात नगर वसणे क्रमप्राप्तच होते. त्यामुळे त्याचे किल्लेपण संपलेले आहे. शिल्लक आहेत त्या एका श्रीविशाल नगरीच्या भग्न अवशेषांच्या राशी.

मांडूला जाण्यापूर्वी त्याच्याबद्दल खूप खूप ऐकलेले असावे लागते! मांडू म्हणजे एक रहस्य, एक तिळाबंद असलेली गुहा, भुताटकीने झपाटलेली एक वास्तु...हे नीट माहीत असावे लागते. नाना कथांनी, अतिशयोक्त कल्पनांनी, मादक काव्यात्मतेने मन भारलेले असावे लागते.

त्याशिवाय मांडूला जाण्यात अर्थ नाही. आपले निघाले एक दिवस आणि गेले मांडूला, खाली पठारावरची हवा आणि आले परत बाजारात— असल्या सफरीचा काही उपयोग नाही. ज्याला 'धोंड्यामधूनीहि' दिसू शकते, ज्याची दृष्टी 'दिक्कालांतुन आरपार' पाहू शकते त्यानेच मांडूला जावे. मुख्य म्हणजे, तेथे जाणाऱ्या माणसाचे मन प्रेमावर प्रेम करणारे, मरणावर बलि जाणारे, पराक्रमावर पतंग होणारे असले तरच मांडवगड आपले अंतरंग त्याला दाखवील. एरवी माणसाला दिसतील दगडविटांचे प्रचंड ढिगारे.

पाच मैल लांब आणि चार मैल रुंद—वीस चौरस मैलांच्या प्रचंड पठारावर पसरलेला प्रचंड मांडव! उभ्या आग्नेय आशियात एवढा मोठा किल्ला नाही. ज्यांना केवळ आजचा राजरस्ता कळतो त्यांना मांडू आडवळणाला आहे असे वाटेल. पण ज्यांना एकएका दिशेचा विस्तार ध्यानात घेता येतो त्यांना मांडू कुठे दिसेल? उत्तर आणि दक्षिण यांच्यामध्ये उभा असलेला हा मारगिरीचा बुरूज आहे. उत्तरेच्या विध्वंसी फौजा मी येथे रोखीन असा बाजीरावाला विश्वास वाटला; दक्षिणेकडून उसळणारे शौर्याचे दर्ये या तटावर आदळून माघार घेतील असे दिल्लीश्वरांना वाटत राहिले. बेसावध सेना-सागराला अचानक कोंडीत धरील अशा या स्थानाचे महत्त्व प्रत्येक महत्त्वाकांक्षी महाराजाला आणि सुल्तानाला समजत असे. म्हणून तर मांडवगडच्या मांडवात इतिहासाची विचित्र वाद्ये शतकानुशतके झडत राहिली. गुर्जर प्रतिहार राजे इथे नांदले त्यावेळी एक लाख घरे किल्ल्यावर होती असे सांगतात. ही एक लाख घरे एकजात संपन्न! इतकी की नगरात याचक नावाचा प्राणी शोभेपुरतादेखील नसे. कोणी दरिद्री झाला तर घरटी एकेक सुवर्णमुद्रा जमवून त्याला लक्षाधीश करून टाकीत! पुढे हा गड घेतला परमारांनी. त्या पराक्रमी आणि दानशूर मालवेश्वरांनी मांडूला मंदिरे बांधली, तलाव खोदले, प्रासाद उभवले. परमारांच्या वैभवाची कथा आक्रमक पठाणांना पुसता आली नाही; मांडूच्या हृदयात असलेल्या सरोवराला आजही राजा मुंज याचे नाव आहे. पराक्रमी मुंज आणि दानशूर रसिक भोजराजा ज्या वंशाचे कीर्तिदीप आहेत त्या परमारवंशीय

राजांच्या हत्येनंतर मांडू मुसलमानांच्या ताब्यात गेले. पहिल्या बाजीरावाने ते फिरून जिंकून घेतले असले तरी आज मांडूच्या किल्ल्यात नांदते आहे ते मुसलमानी स्थापत्य, पठाण वास्तुशिल्प. मोगल साम्राज्यात उभे राहिलेले घुमट आणि मिनार जन्माला येण्यापूर्वीची मुसलमानी कला पाहायची तर मांडवगडलाच गेले पाहिजे. या कलेचा आरंभ झाला चौदाव्या शतकात खिलजींच्या कारकिर्दीत. तिची वाढ केली आणि तिच्यात रंग भरला गुजरातच्या सुल्तानांनी. तिची शान वाढवली जहांगीर-अकबरांनी. मांडवगड जिंकल्यावर तो ज्यांना सहज उध्वस्त करता आला असता त्या मराठ्यांनी मांडवगड राखला हेही उपकार कमी नव्हत!

आठ शतकांच्या ज्ञात इतिहासात मांडूला किती आणि काय काय घडले! रक्तलांछित सिंहासने गडगडली. खुनी खंजीर दगा करून गेले. अंधारात अनन्वित कृष्णकृत्ये झाली. हजारो किंकाळ्या पडद्यात गुदमरल्या. नरबळींनी बुरुजमहालांना बळकटी आणली! बुभुक्षित सुलतानांची पिशाचे आशाळभूतपणे हिंडत राहिली. मंदिरांच्या छाताडावर मशिदी नाचल्या. असहाय शहाजाद्यांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या दाया गूढ हालचाली करून गेल्या. गियासुद्दीन सुलतानाचा पंधरा हजार स्त्रियांचा जनाना याच ठिकाणी होता. बहादुरशहाला तटावरून घोडा खाली फेकावा लागला तो मांडूलाच. होशंगची महत्त्वाकांक्षा इथेच उगवली आणि मावळली. मोगलांच्या रेट्याखाली मोडून गेलेल्या गुजरातच्या पातशाहीची औलाद मरायला मांडूलाच आली. बाज बहादुराच्या रूपाने त्यांची रसिक मस्ती इथेच मोहोरली आणि इथेच धुळीला मिळाली. अकबर येथे चार वेळा येऊन गेला. जहांगीर आणि नूरजहान यांचा लाडका प्रदेश वास्तविक काश्मीरचा; पण ऐषआरामाचा कंटाळा आल्यावर का होईना, नर्मदा खोऱ्यातल्या या चित्रदुर्गावर येऊन राहाण्याची स्फूर्ती त्या दोघा मिजासखोरांनाही झाली. नीलकंठाच्या मंदिराची विलासशाळा केली ती जहांगिराने. तिथे पुन्हा शिवलिंग स्थापन करण्याची बहादुरी रणमर्द दुसऱ्या पेशव्याने — बाजीरावाने दाखवली. धारच्या पोवारांची (परमारांची?) पुन्हा स्थापना करून मराठ्यांनी मांडवगड अखेरपर्यंत सांभाळला.

मांडूला गेल्यावर आधी काय पाहावे? काहीही पाहू नये! आधी तेथे राहावे! कालिदासाच्या शहाण्या यक्षाप्रमाणे मी मांडूला जाणाऱ्या मेघाला सांगेन, बाबा रे, संध्याकाळ झाल्यावरच तेथे प्रवेश कर. भिल्लांच्या रानातून, उदी करड्या डोंगरातून, पळसांच्या झाडीतून येता येता...माणसाने मांडूच्या दारात तिन्ही सांजा पोचावे. प्रचंड वर्तुळाकार क्षितिजाच्या सर्व बाजूंनी अंधाराचा पंजा हळूहळू आवळत असतांना 'तवेलि महाला'जवळ यावे. सरकारने — कसे कुणास ठाऊक — डोके वापरून मुशाफिरांची राहाण्याची सोय या जीर्ण वास्तूतच उत्तम केली आहे. तवेलि महालातल्या खोलीत खुशाल राहावे, मात्र वाऱ्यावर भरकटणाऱ्या मनाला थोडे आवरावे! खोली उंचच उंच, खिडक्या निरुंद कमानीच्या, छत अष्टकोनी, बाहेर मोठा सज्जा, समोर जहाज महालाची अंधारात बुडणारी दगडी शिडे, त्याच्या मागे काळोखलेले पाणी, त्या पाण्यात बुडी घेताना डुचमळणारे बेडूक आणि साप यांचे चुबुककन् येणारे आवाज, दूरावर घूत्कारणारी घुबडे, वळचणीला घुमणारी कबूतरे, छतात अडमडणाऱ्या फडफड-णाऱ्या पाकोळ्या, निद्राशून्य रात्री अर्ध-मिटल्या डोळ्यांना होणारे आभास — हे सर्व अनुभवायला हवे मांडूला! न भिता अनुभवणे शक्य नाही. पण थोडेफार भ्यायला काय हरकत आहे! धडधडत्या छातीने हे सारे अनुभवावे, झपाटणाऱ्या वातावरणाला खुशाल झपाटू द्यावे, सुरस आणि चमत्कारिक अरबी रात्रीच्या कोड्यामध्ये गुरफटावे. हा अनुभव वाटतो तितका नित्याचा नाही. हा अपूर्वाईचाच आहे. एकदा तरी घ्यावाच तो! शिवाय याहूनही नशीब बलवत्तर असले तर, समोरच्या अंगणातून एखादा वाघदेखील जातो इथे! त्याला भिऊ नये. इथले वाघ तसे सुस्वभावी मानवप्रेमी आहेत म्हणे. उघड्यावर चौपाई घालून झोपलेल्या माणसाला ते नखही लावीत नाहीत; मात्र त्या चौपाईखाली झोपलेल्या कुत्र्याला ते सफाई पळवून नेतात! इतक्या सफाईने की माणूस जागादेखील होत नाही! वाघाच्या दर्शनमात्रेच कुत्र्याचे अवसान खचते, आवाज फुटत नाही, ते निमूटपणे मरणाच्या स्वाधीन होते. खोटे नाही. इंग्रजांचा पहिला वकील सर टॉमस रो जहांगिराबरोबर मांडूला राहिला होता. त्याच्या

खाटेखालचे कुत्रे थेट असे खाल्ले वाघाने, साहेब सलामत ठेवून! वाघ असावा तर असा! प्रेमळ आणि चोखंदळ!!

अर्धजागृत अवस्थेत मांडवगड अनुभवल्यावर सकाळी, तेही भल्या सकाळी, निघावे गड पाहायला. जहाजमहाल तर प्रथमच अगदी नाकासमोर दिसेल. नावासारखाच प्रचंड. बादशाही आकारमानाचा. त्यातही लांबीला थेट जहाजासारखा. साध्या, अनलंकृत कमानी, किंचित् कोन साधणारे घुमट, उंचच उंच दीर्घ सोपानपरंपरा यामुळे ही नर्हिदुर्नयवनी इमारती कशी वजनदार वाटते. तिच्या पिछाडीला प्रचंड मुंज तलाव आहे. त्या तलावाच्या मधेच एक महाल दिसतो. तिथे औरंगजेबाची झेबुन्निसा जन्मली म्हणतात. तलावाच्या पलीकडे एका मागे एक सात दालनांचा जुना राजवाडा आहे. त्या बाजूने पाहिले तर जहाजमहालाचे प्रतिबिंब मुंज तलावात दिसेल. रात्रीच्या भ्रमाचा अजूनही प्रभाव शिल्लक राहिला असेल तर सहजच वाटेल—ते प्रतिबिंब वाटते आहे—तो खरा जहाजमहाल! जमिनीवर दिसते आहे ते त्याचे प्रतिबिंब! मूळ जहाजमहाल पाण्यात असावा—सगळा तळघरांचा केलेला! उलट्या घुमटांचा!!

जहाजमहाल ओलांडून पुढे जावे तर हिंदोळामहाल भेटेल. या हिंदोळ्याच्या भिंतीच अशा खुबीने तिरक्या बांधलेल्या आहेत की सारी वास्तु झूल्यावर झुलल्यासारखी दिसावी! हा होता दरबारचा महाल! वरच्या मजल्यावर राणीवशासाठी झरोक्यांच्या माड्या आहेत. तिथे जाणाऱ्या पालख्या आणि घोडे यांच्यासाठी जिना इतका प्रशस्त बांधून ठेवला की हत्तीदेखील वरपर्यंत जाऊ येऊ लागले. मग त्या मार्गाला नाव पडले 'हत्ती चढाव'!

जहाजमहाल उभा आहे मुंज तलाव आणि कपूर तलाव यांच्या मधल्या चिंचोळ्या जमिनीच्या पट्टीवर. हिंदोळामहालही या तलावांपासून फार दूर नाही. तरीही या दोन महालांच्या आसपास चंपा बावडी, उजाळा बावडी, अंधेरी बावडी इत्यादी विहिरी खणण्याचे कारण उघड आहे! या विहिरी खऱ्या, पण त्यांच्या पाण्याच्या पातळीच्या खाली शीतगृहे निर्माण करून आपल्या विलासी देहाची काहिली शांत करण्याची योजना येथे मुख्य आहे! विहीर हा आपला गौण प्रकार!

या सगळ्या परिसराला म्हणायचे शाहीप्रदेश. पण मांडूचे वैभव इथेच परिसमाप्त होत नाही. आता दक्षिणेकडे तोंड करून पर्यटनाला निघावे.

पंधराव्या शतकात बांधलेली जामी मशीद प्रचंड आहेच, पण ती दमास्कसच्या मशिदीच्या नमुन्यावर बांधली असल्याने 'मुलखावेगळी' ही आहे. या मशिदीचा आरंभ ज्याने केला त्या होशंग शहाची कबर जवळच आहे. ही कबर त्याने स्वतःच बांधायला घेतली होती! ती त्याच्या मुलाने व नातवाने आनंदाने पुरी केली असावी! तिचे सौंदर्य, तिची प्रमाणबद्धता, तिचा घाट...म्हणजे पठाण स्थापत्याचा उत्कर्षबिंदु मानतात. ताजमहाल बांधणारे स्थपती ही कबर पाहाण्यासाठी मुद्दाम मांडूला आले होते. १६५९ साली आपण ही कबर पाहिली हे त्यांनी एका शिळेवर लिहून ठेवले आहे. पुढे अश्रफी महाल, मोठ्या दाईचा महाल, छोट्या दाईचा महाल हे पाहात पाहात, किंवा न पाहाता, रेवाकुंडाची वाट धरायला प्रत्यवाय नाही!

रेवाकुंड आहे छोटेसे पण छानदार. नर्मदेचे पाणीच त्या कुंडात आहे अशी भाविकांची धारणा असल्याने नर्मदेची परिक्रमा करणारे यात्रिक रेवाकुंडावर येऊन जातात! बाजबहादुराने आपल्या लाडक्या राणीच्या—रूपमतीच्या धर्मश्रद्धेचा आदर करून नर्मदेचे पाणी तिला मिळवून दिले अशी कथा आहे. पण कथाच ती! त्यापेक्षा बाजीराव-साहेबांची एक साधीच कहाणी मराठी माणसाला चटका लावणारी आहे. उत्तरेच्या स्वारीत फत्ते झाल्यावर बाजीराव आपल्या जयशाली सैन्यासह दख्खनेत परत जात होता. वाटेत त्याने मांडवगडावर तळ ठोकला. त्याचा उल्लेख कागदोपत्री आहे. पण या अतुल पराक्रमी पुरुषाने मांडूच्या विलासनगरीत काय ऐष केला असेल? 'रेवा कुंडावर स्वामींनी दशम्या खाल्या', एवढाच उल्लेख आहे! आमचा सेनापति घोड्यावर बसलेला असतांना कच्चा हुरडा आणि हिरवी मिरची खातो. तसेच दिल्लीश्वराला धसका बसवून परत जाताना मांडूच्या रेवाकुंडावर दशम्याचे गाठोडे सोडतो, ही गोष्ट मन हलवून सोडणारी आहे.

नीलकंठ हे नाव शिवमंदिराचे. पण प्रत्यक्षात ते आहे एक विलासगृह. गडावरच्या बाकी सर्व महालांकडे पाठ फिरवून बसलेले, रणांगणापासून दूर दूर, एका दरीच्या तोंडाशी, दरीकडेच तोंड केलेले,

हे विलासगृह. मूळ ते स्थान शिवाचे हे जाणून बाजीरावाने तिथे महादेवाची पुन्हा स्थापना केली. पण मशिदीच्या अर्ध्या फाकेसारखी दिसणारी वास्तु त्याने जशीच्या तशी ठेवली. सूड आणि सहिष्णुता यांचा हा संगम विचित्र खरा!

रेवाकुंडाच्या परिसरातच आहे बाजबहादुराचा महाल. बाजबहादुर हा रणांगणावर पराभूत झालेला पण उमदेपणात उणा नसलेला, हिंस्र पशूंची आणि काम्य कामिनींची सहज शिकार करणारा, समशेर आणि संगीत यावर फिदा असणारा एक धीरललित नायक होता. एका लढाईत त्याने पाठ दाखवली मग पुन्हा तो लढलाच नाही! त्याने ललितकलांमध्ये मन बुडवले. नर्मदेच्या तीरावर असलेल्या रानात कोणा हिंदु टोळीवाल्याची मुलगी रूपमती त्याच्या नजरेला पडली. नावासारखीच रूपमती, तेजस्वी, विभ्रमसंपन्न, नृत्यगायनात तरबेज अशी ही वेताची छडी आपल्या मुठीत हवीच या ईर्ष्येने बाजबहादुराने तिच्यावर ससाण्यासारखी झडप घातली. तिला घेऊन तो मांडवगडात शिरला. पण घडले ते सारे अघटित! रूपमती त्याच्यावर निहायत खूष झाली. मुख्य म्हणजे तिने त्याला साफ जिंकले. तिच्या हिंदुत्वाची त्याने कदर केली. त्याच्या रसिकतेची तिने बाजू राखली. नर्मदेचे दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करणार नाही ही तिची शपथ होती. दक्षिण टोकाजवळ असलेल्या एका टेहेळणीच्या बुरुजाचा बाजबहादराने रंगमहाल करून टाकला. हा रूपमतीचा महाल. त्याच्या गवाक्षातून दक्षिणेकडे पाहिले की क्षितिजरेषेच्या जरा अलीकडे, सापाच्या कातीसारखे जे विचित्र पात्र दिसते ते नर्मदेचे, रेवेचे. पण दिशा प्रसन्न नसल्या तर? नर्मदेचे हे दूरदर्शन कसे घडावे! लाडकी रूमपती एवढ्यासाठी उपवासी राहू नये म्हणून बाजने रेवेचे पाणी भुयारी मार्गाने किल्ल्यावर आणले म्हणे! एक गोष्ट खरी. रूपमती हेच नर्मदेचे पाणी! बंडखोर, उद्दाम, विचित्र सौंदर्याने नटलेले. माजलेल्या हत्तींच्या गंडस्थळातून वाहाणाऱ्या मदाच्या मिश्रणाने मादक झालेले पाणी. या पाण्याने बाजबहादुराला झिंग आली. तिच्या पैंजणांच्या मागे तो हंसासारखा चालू लागला. तिच्या गीतवितानात हरणासारखा सापडला. तिच्या कटाक्षाने कतल झाला. मैनेने ससाण्याच्या उरात तीर खोचला. ससाण्याचा गळा बुलबुलाचा


झाला. तिने भूपकल्याण आळवावा आणि याने तांबरल्या डोळ्यात रागचित्र साठवावे. तिने जोगिया तेवत ठेवावा, याने संथ जळावे. कोण जित? कोण जेता? कोणाचे गीत? श्रोता कोण? स्वर कोणाचा? लय कोणाच्या नाडीत? काही कळेनासे झाले. शेवटी जेव्हा हा कामी रसिक राजा अकबराच्या कैदेत पडला, तेव्हा एका उमलत्या पहाटे त्याच्या गळयातून भूपालीचे स्वर थरथरताना अकबराने ऐकले आणि म्हणून त्याला त्याने जीवदान दिले म्हणे. पण इकडे बंदिनी झालेल्या रूपमतीने हिरकणी खाऊन जोहार केला होता. ही वार्ता कळल्यावर मुक्त झालेल्या बाजबहादुराच्या कंठातला स्वर कायम थिजला नसेल का? त्याने तिचे रूप रेखीत, तिचा स्वर आठवत नर्मदेकडे एकटक नजर लावली असेल? मध्यरात्री कालंगडा छेडला असेल? भैरवीने पहाट भिजवली असेल? विभासमधे तिचा आभास पाहिला असेल! गडाखाली पसरलेल्या वैराण नेमाडच्या माळावर त्याचे अश्रू टपटपले असतील? भर मध्यान्ही त्या सारंगनयनेचे तेज आठवीत त्याने हृदयदहनी सारंग म्हटला असेल? कोण जाणे. आज रूपमतीचा महाल पहाताना राहून राहून मनात येते — हे उध्वस्त बुरुज, हे फुटलेले घुमट म्हणजे बाजबहादुराचे भग्न हृदयच आहे.

असा हा मांडवगड. रणचंडीचा आवास आणि कामी जनांचा विलास. म्हणून तर दक्षिण तटावर एकीकडे रूपमतीच्या दर्दभरी कहाणीने डोळे पाणावतात तर दुसरीकडे दिसत राहाते ते नेमाडचे अफाट मैदान, थेट नर्मदेपर्यंत. दूरावर महेश्वराचे दर्शन घडवणारे, जवळ पाहिले तर गपकन् हृदय खाली पडेल अशा उभ्या कड्याखाली असलेले. मांडवगडच्या दक्षिण तटाखाली बाराशे फुटांचा सरळ पहाड आहे. असे सांगतात की महमदखान बंगश या दक्षिण तटावरून खाली मैदानात नजर लावून उभा होता. मैदानात मराठ्यांचा सेनासागर शाही फौजांवर कोसळत होता. त्याच्या अग्रभागी होता शुभ्र घोड्यावर स्वार बाजीराव बल्लाळ पंतप्रधान. त्याची ऐट, त्याचे तेज, त्याची चपळाई, त्याची डौलदार हालचाल पाहून, त्याच्या तलवारीचे ते तांडव पाहून बंगश म्हणाला – 'लाहोल कुवत! बिरहमन होते भी क्या समशीर चलाता है!' हे खरे का खोटे इतिहास जाणे. पण आज त्या मैदानाकडे पाहाताना

आपल्याला जाणवते की उत्तर आणि दक्षिण यांच्या मध्यरेषेवर आपण मोर्चाच्या जागी उभे आहोत; बाजबहादुराच्या आणि रूपमतीच्या विलासाचे स्वर आपल्या भोवती रेंगाळत आहेत; पण दक्षिणच्या मैदानावरून उत्तरेकडे सरकत आहे मराठी पराक्रमाची धगधगती आग. परमार-पवारांच्या या चित्रदुर्गावरून ही आग, तिच्या ज्वालेचे ते शुभ्र शिखर पाहाणे हा एक अनुभव आहे. यासाठी तरी मांडवगडला गेलेच पाहिजे.



उदे उदे उदेपूर



उदयपूर आणि जयपूर! दोहोमधे केवढा फरक—उदय आणि अस्ताएवढा! जयपूर म्हणजे सोनूबाईच्या हातातला कथलाचा वाळा!! म्हणायचे जयपूर पण ते होते पराजयपूर. मोगलांना जे सहजी वश झाले त्या रजपुतांना मिळालेल्या कलंकित वैभवाच्या खुणा जयपूरच्या विशाल महालांच्या रूपामधे पाहाव्या. जयपूरच्या जरताराला मिंधेपणाचा गंध आहे. राजवाड्यांच्या पायामधे स्वाभिमान पुरलेला आहे. आश्रितांनी, मांडलिकांनी मिरवलेली मेहेरबानी कितीही झळझळीत असली, शानदार असली, तरी तिला येणारी कुबट घाण लपत नाही. उलट स्वाभिमानी खांद्यावरच्या घोंगडीवर पांच चांदांची झळाळी आपोआपच आलेली असते!

उदयपूरचा अस्त कधी झालाच नव्हता. म्हणजे मोगलांनी उदेपूर गिळंकृत केले नव्हते असे नाही. पण गिळंकृत केलेली प्रत्येक वस्तू पचतेच असे थोडेच आहे? उदयपूरचे माणिक मोगलांना कधीच पचले नाही. पोटात गेल्यावरही आतड्याला खुपत राहिले; आतडे चिरता आले नाही तरी जखम चरत राहिली. शिसोदे रजपुतांचा

आणि गाडी–लोहारांचा पराभव कधी झालाच नाही. त्यांचे देह रणांगणी पडले. त्यांच्या पिढ्या जळून गेल्या. पण त्यांचा पीळ कधी ढिलावला नाही. रणांगणावरचे यशापयश संख्येवर, शस्त्रबळावर, दैवावर आणि असल्या अनेक कारणांवर ठरत असते. पण अपयशा-नंतरही ज्यांची जिद्द जिरत नाही, ज्यांचा हट्ट पेटून उठतो, ज्यांचे अंकुरही विद्रोहाच्या खतपाण्यावर फोफावतात त्यांचा, म्हणजे त्यांच्या तेजाचा पराजय कसा होणार ? उदयपूरच्या रजपुतांचा पराजय झाला नाही. वास्तविक उदयपूर, कोटा, बुंदी...इथले रजपूत तेच खरे रजपूत. हाडा आणि शिसोदे. मेवाडचे महावीर. जयपूर–जोधपूरचे ते राजस्थानी, संस्थानी, कारस्थानी ! ज्याला रजपुतांच्या इतिहासात प्रवेश करण्यासाठी राजस्थानात जावयाचे असेल त्याने दिल्ली-अलवार-जयपूरमार्गे जाऊ नये; त्याने मंदसोरचा गुप्त वंशाचा विजयस्तंभ पाहावा आणि चितोडचा रस्ता धरावा. चितोडचे दर्शन घ्यावे, पद्मिनीचा महाल आणि मीराबाईचे मंदिर पाहाण्यासाठी. जयस्तंभ आणि कीर्तिस्तंभ यांच्या पुढे मान वाकवण्यासाठी. हजार रजपूत रमणींचा जिथे जोहार झाला तिथे क्षणैक शांत उभे राहाण्यासाठी. किल्ला पाहून झाला की तटाजवळ थांबून अरवली पहाडांची कातरनक्षी पाहावी. सह्याद्रीने मरहट्ट्यांना कडेखांदी खेळवले; अरवलीच्या आश्रयाने रजपुतांची युयुत्सा वाढली.

चितोडच्या दर्शनाने चित्तवृत्ती चांगल्याच उल्हसित होतात. तशा त्या झाल्या म्हणजे मगच उदेपूरची वाट धरावी. तसे पाहिले तर सगळेच भूभाग असतात : माती, धोंडे आणि दगड ! शोभेपुरती झाडे झुडपे, पाणवठे, गावठाणे, कौलारातून निघणारे धुरांचे फरांडे, भाकरीचा वास, माणसे, गाईगुरे, कुत्री-मांजरे...अनोळखी देशात गेले की माणसाला रंग-रेषांनी निर्माण केलेली चित्रे तेवढी दिसतात. पण त्या चित्रांमागचे चैतन्य दर वेळी जाणवतेच असे नाही. रजपुतांच्या भूमीचे तसे नाही. आपण चितोडगडला पोचण्यापूर्वीच तो पाहिलेला असतो ! उदयपूरला जाण्यापूर्वीच त्याचा इतिहास झोकलेला असतो. आजन्म सुखत्याग केलेल्या राणा प्रतापाच्या शुभ्र यशाने दिपलेल्या डोळ्यांनी माणूस मेवाडातली धारातीर्थे पाहतो. जोहाराचा केशरिया मनावर माखून माणूस चितोडवर पाऊल ठेवतो. या स्थळांना दिलेली भेट ही

नेहमी दुसरी भेट असते! पहिली भेट देताच येत नाही कधी आपल्याला. ती इतिहासात, देशप्रेमात, पराक्रमपूजेत कधीच घडून गेलेली असते. दुसरी भेट असते प्रत्ययासाठी, पुनःप्रत्ययासाठी म्हणा हवे तर. मनोमन जन्मलेल्या प्रेमाला जसा शरीराकडून उद्‌गार, हुंकार, होकार हवा असतो तसा, संस्कारांनी आधीच संपन्न केलेल्या जाणिवेला रूपरंगांच्या अनुभवांचा प्रतिसाद हवा असतो एवढेच!

असा प्रतिसाद चितोडगडावर मिळतो. मग सहजच गाडी-लोहारांची आठवण होते. रजपुतांचा जयशाली प्रवेश चितोडगडात होईपर्यंत घरात राहाणार नाही, अशी त्यांची प्रतिज्ञा होती. तीन शतकाहून अधिक काळ हे लोहार भटकत राहिले. त्यांनी घरकुल कधी थाटलेच नाही. सुखोपभोग घेतलेच नाहीत. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरूंच्या साक्षीने त्यांनी चितोडवर पाऊल ठेवले. कदाचित् हे वेडेपण असेल. पण शहाण्या शेळपटांच्या घोळक्यात असले बहादुर वेडे विशेष उठून दिसतात.

उदयपूरच्या वाटेवर कैलाशपुरी हे स्थान आहे. तिथे राहातो भगवान एकलिंगजी. हर हर महादेव आणि जय सत् श्री अकाल या घोषणांइतकीच आणखी एक रोमांचकारक घोषणा इतिहासाच्या पडक्या घुमटात दुमदुमते आहे. ती आहे: भगवान एकलिंगजीकी जय. उदयपूरच्या इतक्या जवळ गेल्यावर नंतर केवळ प्रेक्षणीय नाही म्हणून हे स्थान टाळू नये. हा प्रश्न धार्मिक भाविकतेचा नाही. राष्ट्रीय भाविकतेचा आहे! रजपुतांचे हे देवस्थान मराठमोळ्या देवस्थाना-सारखेच आहे...साधे, अनाकर्षक, रांगडे.

उदेपूर! सरोवरांचे शहर! मरुभूमीवरील सरोवरांचे शहर!! केवढा विरोधाभास. जवळ जवळ वदतो व्याघातच! पण गोष्ट खरी आहे. राजस्थान म्हणजे वाळू. रणरण. उजाड, भकास मुलूख. पिवळट रेताडे आणि धुळकट वरूया. फारफार तर लाल दगड. काटेरी झुडुपांची काय ती हिरवी माया. पण तीहि क्वचितच. या दिशेपासून त्या दिशेपर्यंत वाळूच वाळू. क्षितिजापर्यंत वाळू, क्षितिजापलीकडे वाळू. तळपता सूर्य, मृगजळ...या आणि अशा तऱ्हेच्या कल्पना करणाऱ्या भूगोल पढिकांना सुखद आश्चर्यांचे धक्के देण्याची शक्ती राजस्थानमध्ये आहे. त्यात

सर्वांत नवलाईची गोष्ट म्हणजे प्रचंड सरोवरे! होय होय, राजस्थानातली सरोवरे! खऱ्याखुऱ्या पाण्याची. गोड पाण्याची. मयसभेतली नव्हेत, मृगजळाची नव्हेत! हिंदुस्थानात इतरत्र क्वचितच आढळतील एवढी प्रचंड सरोवरे राजस्थानात आहेत. अजमेरचा अनासागर, पुष्करचे 'पुष्कर' आणि मुख्य म्हणजे उदेपूरच्या अंतरंगात आणि आसमंतात पसरलेली ती सुंदर सुंदर सरोवरे. उदेपूरच्या वैभवाचे निम्मे श्रेय तरी या सरोवरांना आहे. उदेपूरपासून अवघ्या तीस मैलांवर अरवली पहाडाच्या कुशीत 'जयसमंद' हे वनशोभित सरोवर अक्षरशः अफाट विस्ताराचे आहे. आणि उत्तरेला सरकावे तर राजशाही 'राजसमंद' सरोवर पसरले आहेच. समंद म्हणजे समंदर, समुद्र, पण गोड! 'पिचोला' सरोवर म्हणजे तर उदेपूरचे हृदय, उदेपूरचे रूप, उदेपूरचा आरसा...सब कुछ! दुसरे सरोवर फत्तेहसागर. नगराच्या जरा बाहेर, उदेपूरच्या सळसळत्या शेल्यासारखे. पण आत एक आणि बाहेर एक असे नकोच काही, या बुद्धीने दोन्ही सरोवरे एका कालव्याने जोडून टाकण्यात आली आहेत! या दोन सरोवरांनी उदेपूरला गारवा दिला आहे, ओलावा दिला आहे, रूप दिले आहे. एवढे थोरले पाणी पाहिले की उदेपूरची व्युत्पत्ती उदयपूरऐवजी उदकपूरवरून लावण्याचा मोह होतो!

उदयपूर उदयसिंहाने वसविले. चितोडवर वारंवार हल्ले होऊ लागल्यामुळे रजपुतांना पश्चिमेकडे सरकणे भागच होते. सन १५६७ मध्ये अकबराने चितोडला तिसऱ्यांदा वेढा दिला; तेव्हा उदयसिंहाने सरळ अरवलीचा आश्रय घेतला आणि कालांतराने ही नवी राजधानी वसवली. इथेच का वसवली? कारण इथे पिचोला तलाव होता ना! म्हणजे सरोवर आधी, शहर नंतर!! चौदाव्या शतकात लाखा बनजारा हा वंजारी (व्यापारी) इथे आला. त्याने चार चौरस मैलांचा हा प्रचंड तलाव खोदला. कोणाला कसली बुद्धी होईल ते सांगता का येते? भटक्या लमाणांच्या या पुढाऱ्याला इथे तलाव खोदायची बुद्धी झाली. मला वाटते त्यानंतर त्याचे भटकणेच खुंटले असेल! तो मुळी इथे खिळलाच असेल. या पाण्यात आपला मुखडा न्याहाळत बसला असेल! निदान आज उदेपूर तसे बसले आहे! पश्चिम तीरावरचा

तो महाराणा राजवाडा, जगतनिवास प्रासाद, दक्षिण टोकाला असलेला जगमंदिर महाल, संगमरवरी घाट (ही शहाजहानची देणगी!) या सगळ्या सुंदर वास्तूंसह उदेपूर पिचोला तलावाच्या तीरावर स्वतःचे रूप पाहात स्थिरावले आहे. केवळ पाषाणाच्या इमल्यांनी पाण्यात पाहू नये म्हणून वृक्षराई आणि उदी रंगाचे बोडके डोंगर यांनीही पिचोला सरोवराचा आरसा केलाच आहे. म्हणून सगळे स्थानच दुप्पट झाले आहे. ऊर्ध्वमूल अधःशाख जगासारखे उदेपूर पाण्यात आणि पाण्यावर पसरले आहे. उत्तरेकडे असलेल्या कालव्याच्या रूपाने पिचोला सरोवराने आपली भुजा आपल्या धाकट्या भावाच्या—फत्तेसागराच्या खांद्यावर टाकली आहे. फत्तेसागर नावावरून मोठा वाटतो. पण पिचोलाचे महाप्रमाण त्याला नाही. फत्तेसागराच्या भोवती गोल चक्कर मारण्यासारखा रस्ता आणि पाण्याकडे पाहात बसण्यासाठी मेघडंबरी आहे, आज काही नवीन इमारती त्याच्या आसमंतात उभ्या राहात आहेत, हे खरे. पण पिचोला आणि उदेपूर एकजीव आहेत. फत्तेसागर तसा फटकून आहे. म्हणून संध्याकाळी माणसे फत्तेसागरकडे फिरायला जातात, जरा दूर गेल्याचे समाधान मिळावे म्हणून. दीड चौरस मैल विस्ताराचा हा कृत्रिम तलाव महाराणा फत्तेसिंगाने निर्माण केला म्हणून त्याचे नाव त्याला मिळाले आहे.

तसे उदेपूरचे महाराणे इमल्यांचे शौकीन. सतराव्या शतकात अमरसिंग, करणसिंग आणि जगतसिंग या तीन महाराण्यांचे उदयास्त भराभर झाले. या तीघांनी मिळून जगमंदिर राजवाडा पुरा केला. तो तर साक्षात पाण्यातच आहे. शहाजहान बादशहा (त्यावेळी युवराज) मोगल रिवाजाप्रमाणे बापाविरुद्ध बंड करून उठला तेव्हा त्याच्या बापाने वंशपरंपरागत निर्दयतेने त्याला ठार करायचा निर्णय घेतला. शहाजहानने म्हणजे त्यावेळच्या राजपुत्र खुर्रमने उदेपूरच्या राजघराण्याकडे आसरा मागितला. रजपुतांनी औदार्याने म्हणा की मुत्सद्देगिरीने, त्याला आसरा दिला. त्यावेळी शहाजहान जगमंदिर राजवाड्यात राहिला होता. आश्चर्य म्हणजे या उपकारांचे स्मरण शहाजहानने ठेवले! त्याने उदेपूरच्या राजवंशाला त्रास तर दिला नाहीच, उलट पिचोला सरोवराला एक संगमरवरी घाट बांधून दिला.

अठराव्या शतकात तर काय, उदेपूरचा लढाईशी फारसा संबंध उरलाच नाही. मग महाराणा मंडळींनी काय करावे? प्लासीच्या लढाईत इंग्रजांच्या बाजूने नियतीचा कौल पडत असता, पानपतावर मराठे व अब्दाली यांची निकराची झुंज लागली असता, दूर मेवाडात, अरवली पर्वताच्या आडोशाला निवांत बांधकाम सुरू होते! या सुमारास, दुसऱ्या जगतसिंगाने बांधलेला जगतनिवास हा संगमरवरी राजप्रासाद या उद्योगाचे प्रतीक आहे. या देखण्या राजवाड्यात त्याने आपला मोठा परिवार–(म्हणजे राण्या आणि नृत्यांगना) ठेवला होता.

मात्र उदेपूरचा मुख्य राजप्रासाद हा नव्हे. पिचोलाच्या पश्चिम किनाऱ्यावर उभी असलेली प्रचंड चुनेगच्ची इमारत–जुन्या राजवाड्याची–हीच मुख्य. सन १५७१ पासून आजतागायत हा प्रासाद वाढत गेला, बदलत गेला, पडला झडला, पुन्हा वाढला. त्यामुळे त्याच्या एकजिनसीपणाला थोडाफार बाध आला आहे. मूळच्या चुनेगच्ची साधेपणाला आणि वाळूच्या दगडांच्या भक्कमपणाला संगमरवरी झालरी लागल्या आणि काचतुकड्यांची आरासही इथे तिथे करण्यात आली. माणिक महाल, मोती महाल असले महाल सजले, चित्रशाळा निर्माण झाल्या. पण आश्चर्य असे की आजही राजवाड्याचे रूप खूप भव्य पण नितांत साधे वाटते. दुरून हा राजवाडा अधिक सुंदर दिसला असता. पण तो दूरावरून पाहाताच येत नाही इतकी त्याच्या आसपास दाट वस्ती झाली आहे. तो एका टेकाडावर उभा आहे म्हणूनच थोडा तरी अलिप्त आहे. एरवी भोवतालच्या 'पोळ' (म्हणजे बोळ) आणि देवड्यात तो गुरफटून गेला असता. फार तर सगळ्या पसाऱ्यात जरा वेगळा–ठायकात पुरुष लांबोडा तसा दिसला असता एवढेच. पण टेकाडाने त्याला वाचवले. म्हणून उदेपूरच्या अध्यक्षासारखा तो दिसतो. या वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या जरा अलीकडे जगदीश मंदिर आहे. त्याची ख्याती खूप असली तरी रूप यथातथाच आहे.

या मंदिरापासून राजवाड्याच्या दारापर्यंत प्रवाशांना छळणाऱ्या प्राण्यांना वाटाडे, गाइड, असे नाव आहे. असल्याच एका प्राण्याने माझ्याशी मैत्री करण्यासाठी संभाषण सुरू केले. "चला सरकार, मी सगळी माहिती सांगेन आपल्याला."

"पण, मला नको आहे माहिती."
"फार जुना राजवाडा आहे हा."
"असू दे बिचारा."
"गाइडशिवाय आपल्याला काही समजणार नाही."
(मी मौन पाळतो.)
"हे उदेपूरचे राजे सूर्यवंशी आहेत, साहेब."
"असं का! थेट सूर्याच्या वंशातले?"
"जी!"
"सूर्याचा मुलगा कोण होता बरं?"
(आता गाइडचे मौन!)
"अहो, सूर्यवंशाची तुम्हाला माहिती नाही, मग तुम्ही मला काय सांगणार!"
"सर्व माहिती आहे सरकार."
"मग सांगा ना, सूर्याचा पुत्र कोण?"
"हनुमान!"
"असं! हनुमानाला किती पुत्र होते?"
(चूक ध्यानात येऊन गाइडसाहेब ओशाळतात.)
'कां हो! सूर्यपुत्र हनुमानाचा पुत्र कोण?"
"साहेब, तुम्ही फार पुरातन माहिती विचारता! आम्हाला एवढंच माहीत आहे की महाराणाजी प्रभु रामचंद्राच्या वंशातले आहेत."
"बरं तर! रामचंद्राचा आजा कोण? किंवा त्याचा नातू कोण?"
"एवढं कशाला ध्यानात ठेवायचं सरकार!"
"मग तुम्ही कसले वाटाडे! मीच बरा तुमच्यापेक्षा." मी त्याला कटवून पुढें सटकलो. एवढ्यात त्याचे आणि माझे भांडण झाले असावे असे गृहीत धरून चार सहा वाटाडे आपल्या व्यवसायबंधूजवळ जाऊन त्याला म्हणाले, "क्यों क्या बात है?"
"कुछ नही जी!"
"क्या गाइड होना जी?"
"अरी, साब खुद ही गाइड है!"
थोडा हशा. पांगापांग. मला निवांतपणा मिळाला. तेव्हापासून कोणी

गाइड आला की मी विचारी–'आधी सूर्याचा पुत्र कोण ते सांगा.' हा मंत्र रामबाण ठरला आहे! गरजूंनी ध्यानात ठेवावा.

राजवाड्याच्या समोरच्या मोकळ्या ओवरीला उत्तुंग कमानी आहेत. तिथून उदेपूरचे विहंगम दर्शन घेणे आवश्यक असते. राजवाड्यात जाऊन काय पाहायचे? राजवाड्याबाहेरचे दृश्य! उंचीचा फायदा घ्यायचा. एरवी काय पाहाणार! शिळेपाके कोच आणि मंचक? अलाणा राजा आणि फलाणा राजकुमार यांच्या छब्या? राज्ये गेली तरी राजवाडे अडवून बसण्याचा प्रघात सुटलेला नसल्यामुळे प्रवाशाने इथे जाऊ नये आणि तिथेच जावे हे प्रकार असतातच. ऐतिहासिक वास्तु पाहाणाऱ्याचा मग विरस होतो. तरीही जुन्या राजवाड्याची एक चक्कर करावी. तो बाहेरून पाहावा; त्याच्या बाहेर पाहावे. आत पाहायचे ते फक्त मोर, काचेच्या इवल्या इवल्या तुकड्यांनी बनवलेले, काचापाणी मोर. या बिल्लोर मोरांचे प्रतीक आपण चित्रात, भारत सरकारच्या कुठल्या तरी प्रकाशनात पाहिलेले असतेच. ते एकदा मुळात पाहून टाकावे!

पिचोला तलावाच्या पाण्यात उभ्या असलेल्या राजवाड्याला म्हणायचे 'लेक पॅलेस.' या लेक पॅलेसचे आता होटेल झाले आहे. म्हणजे प्रत्यक्ष महाराज सरकारनीच त्याचे होटेल करून टाकले आहे! फक्त अमेरिकन पाहुण्यांनाच राहाता यावे या बेताने त्याचे दर ठेवण्यात आले आहेत! आपणासारख्या दरिद्री भारतीयांना होटेलमध्ये दृष्टिक्षेप करण्यासाठी केवळ पाच रुपये तिकिट आहे!! 'हुडुत' हा सहजोद्गार निघतो तो अशा वेळी!

लेक पॅलेस होटेलमधील खुर्च्यापलंग पाहाण्याचा आंबटशोक करण्यापेक्षां फत्ते सागराची वाट धरावी आणि जवळच असलेल्या 'सहेलियोंकी बारी' नावाच्या उद्यानात जावे. उद्यान छोटेसेच आहे आणि वृक्षवैभव सामान्यच आहे. पण थुइथुइ नाचणाऱ्या शेकडो कारंज्यांनी त्याचे वैभव वाढवले आहे. सहेलियोंकी बारी पूर्वी राजघराण्याच्या विलासासाठीच निर्माण झाली होती हे स्पष्टच आहे. मोगली ऐषआरामाचा परिचय झाल्यानंतर हे उद्योग सुचले असावे हेही स्पष्टच आहे. पण राजस्थानी उन्हाळ्यात होणारी काहिली–(अंगाची आणि अनंगाची!)–शांत करण्यासाठी महाराणा सरकारनी मोठी झक्क युगत काढली होती.

'सहेलियों की बारी'च्या आराममहालात बसावे आणि चौफेर कारंजी चालू करावी. एकधारेपासून सहस्रधारांची कारंजी. नाना आकारांची. वेगवेगळ्या उंचीची. काही सरळ वृक्षासारखी आभाळाकडे धावणारी. काही शालीनतेने मधेच वाकणारी. फुलझाडे भिजवणारी. काही स्वतःच फुलझाडे होणारी! हे सारे पाहाण्यासाठी चामचंचीतून एक रुपया काढून द्यावा लागतो; पण तो द्यावा!

मरुभूमीवरची ही पाण्याची लयलूट पाहून आश्चर्य वाटते. ते द्विगुणित करायचे तर व्हिक्टोरिया म्यूझिअमकडे जावे म्हणजे, म्यूझिअमच्या बागेकडे मरुभूमीमध्ये हिरवेहिरवेगार गालिचे दिसू शकतात हे तेथे कळते. या हिरव्याकंच तृणशय्यांवर लोळणारी असंख्य रंगीबेरंगी फुले पाहून डोळे निवतात. (की पेटतात?) एखाद्या बंगलोरी बंगल्यात तर आपण आलो नाही ना याची खात्रीच करून घ्यावी लागते. या रंगदार आसमंतामुळे म्यूझिअमचा दगडही लाल भासू लागतो. म्यूझिअम म्यूझिअमसारखीच होती. त्याची व्यवस्था पाहाणारे अधिकारी शालीन होते, आदबशीर होते हेही अजायब नाही का! या म्यूझिअममध्ये शहाजहानची टोपी ठेवलेली आहे. एखाद्या 'मोरू'ला शोभण्याजोगी आहे ती. फॅशन बदलली, दुसरे काय!

राजस्थानचे उत्कट दर्शन म्यूझिअममध्ये घडावे अशी आज तरी तिची आखणी नाही. पुढेमागे होईल म्हणतात. ही दृष्टी नसल्यामुळे आपल्या सगळ्या म्यूझिअम्सना 'अजबखान्याचे'च रूप येते. राष्ट्रीय अजबखान्याच्या छोट्यामोठ्या आवृत्त्या होतात त्या. पण उदेपूरला ही उणीव भरून काढायची सोय आहे. 'लोककला मंडळ' ही एक अद्‌भुत संस्था तिथे उभी राहाते आहे. राज्यसरकार आणि केंद्रसरकार— दोघांकडून संस्थेला मदत मिळाली आहे हे जरी खरे असले, तरी संस्थेची खरी ताकद तिच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या उमक्रमशीलतेत आहे. देवीलाल सामर या लोककलांच्या उपासकाला आणि त्याच्या सहकाऱ्यांना संस्था उभी राहिल्याचे श्रेय दिले पाहिजे. आजच संस्थेची स्वतंत्र इमारत आहे, मोठे थिएटर आहे. इमारतीत छोटी पण वेधक म्यूझिअम आहे. राजस्थानी वेषभूषेचे, गृहभूषेचे, हत्यारांचे, वाद्यांचे वेचक नमुने तिथे ठेवलेले आहेत. आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचे


अद्‌भुतदर्शन घडविण्याची सोय आहे. 'बाहुल्यांचा खेळ' दाखविणारा रंगमंच (पपेट थिएटर) आहे, तेथे प्रयोगांना उत्तेजन मिळत असते. ध्वनिपट्टांचा (टेपरेकॉर्डस्) संग्रह करून लोकसंगीताचे असंख्य नमुने सुरक्षित ठेवण्यात येत आहेत. संस्था स्वतः खेळ बसवते, दौरे करते. संशोधन हाती घेते. संस्थेने उपयुक्त ग्रंथही तयार करवून घेतलेले असून तिनेच ते प्रकाशितही केलेले आहेत. एवढे आपले पुढारलेले महाराष्ट्र राज्य. मुंबईसारखी हुन्नरी लोकांची आपली राजधानी. पण उत्कृष्ट प्रादेशिक म्यूझिअम इथे नाही, ही आपल्याला शरमेची गोष्ट आहे. मला उदेपूरचा हेवा वाटला तो इथे!


जुना तट. पाच प्रचंड दरवाजे. तीन राजवाडे. दोन प्रचंड सरोवरे. पण या साऱ्या पसाऱ्यात न मावणारे उदेपूर तट फाडून पसरत चालले आहे. कृषि विद्यापीठाच्या मिषाने, नवीन रेल्वेच्या नावाखाली ते पसरत जाणार आहे. 'हाथी पोळ' सारखा बोळकंडीचा बाजार त्याला पुरणार नाही आता. लाकडी बेंगरूळ खेळणी तयार करण्याचा धंदा लवकरच मागे पडेल. 'क्यूरिओ शॉप' सारखे फसवे धंदे अंग चोरूनच वावरतील. नव्या अस्मिता तेथे फुलत आहेत. विशाल 'हिंदी' मुलखापेक्षा फार भिन्न संस्कृतिधन आपल्याजवळ आहे अशी जाणीव राजस्थानांत झपाट्याने वाढते आहे. इथल्या भाटचारणांनी निर्माण केलेल्या गीतपरंपरांचे पुनरुज्जीवन होते आहे. राजस्थानी बोलीत साहित्याची मधुमोहळे बांधली जात आहेत. दुसरीकडे, नव्या भारतात आपण मागे पडू नये अशीही धडपड आहे. विद्यापीठे निघत आहेत. विमानतळ, रेल्वे यांची भर पडते आहे. उदेपूरची झोप उडालेली आहे. मात्र पूर्णतः जाग आलेली नाही. मेवाडी हाडपेर मोठे आहे. हृदयांत जिद्द आहे; लवकरच नव्या पराक्रमाच्या आकांक्षेने ते स्फुरण पावेल. कदाचित पिचोला तलावाकाठचे आखमिचोली खेळणारे स्वप्निल उदेपूर पुढल्या अर्ध शतकात मावळूनही जाईल. पण त्याहून वाईट गोष्ट अशी आहे की अजून दहा वर्षांनंतर मेवाडी रजपूतच दिसेनासा होईल. त्याला नीट पाहून ठेवा. त्याची उंची आणि रुंदी भली भक्कम असते. त्याच्या पाठीला वृद्धपणीही बाक नसतो. त्याच्या अंगरख्याचे बंद केव्हाही तुटतील असे वाटते. त्याचा चुणीदार पैजामा

गच्च असतो. त्याचा साफा ऐटबाज असतो. त्याचा चेहरा ऊन-वारा खाऊन पक्का भाजलेला दिसतो. त्याच्या गालांचे दर्शन होत नाही, तेथे झुबकेदार दाढी असते. हनुवटीवर ती दाढी केळीच्या पानाच्या दोन फाळक्यांसारखी दुभंग विंचरलेली असते. असा रजपूत आजही क्वचितच दिसतो. त्याला पाहून घ्या, लवकर पाहून घ्या.



# जनानी जयपुरी





राजा जयसिंगाला सन सत्राशेसत्ताविसात एक स्वप्न पडले. खूप दीर्घ स्वप्न. प्रशस्त स्वप्न! त्याचा आरंभ झाला तेव्हा आकाशात नक्षत्रांचा खच पडला होता. ते संपले तेव्हा अरुणाची झळाळी आभाळभर पसरली होती. जयसिंग जागा झाला आणि कामाला लागला. एका सुंदर स्वप्नाला कायम चिरेबंद करणे हे काम सोपे नव्हे, लहानसहान नव्हे. पण जयसिंगाने ते करून टाकले. काम संपले, त्या वेळीं जयपूर नांवाचे एक नाजूक महानगर अवतरले.

वाळूच्याच रंगाचा एक मोठा कागद जयसिंगासमोर होता. तो वाऱ्याने फडफडू नये म्हणून त्याने चौतर्फा कंकर ठेवले. मग हलक्या हाताने त्याने एक चौकोन रेखला; त्या चौकोनाच्या रेषांना आठ ठिकाणी व्यवस्थित छेद दिला. मग या आठ ठिकाणांहून निघणाऱ्या आडव्या उभ्या पट्टयांचा एक पटच त्याने तयार केला. त्याच्यावर इथे आणि तिथे रत्ने मांडून झाल्यावर त्याने आपल्या प्रधानाला, पुरोहिताला, सेनापतीला, खजिनदाराला बोलावून घेतले. आपल्या पुढे पसरलेला तो सौम्य पिवळसर पट, त्याच्यावरची हिरे-माणके...हा सारा पसारा

दाखवून तो म्हणाला—"हे माझे स्वप्न. अशी आणि एवढी राजधानी मला हवी आहे. बोला, हे काम कोणकोण करायला तयार आहे?" थक्क होऊन पाहात राहिलेल्या मानकऱ्यांना काही केल्या कोडे सुटेना. आपण हरल्याची कबुली त्यांनी लगेच देऊन टाकली. राजा निराश झाला. आपल्या साहाय्याला कोणीच येणार नाही या विचाराने खट्टू झाला. तोच त्याच्या महालातील चिकाचे पडदे थरथरले. काकणे किणकिणली. आणि मानकऱ्यांना स्तिमित करीत एक मंजुळ स्वर म्हणाला, "हे काम मी करीन." या मंजुळ स्वराचा पडसाद पुनःपुन्हा येत राहिला...'हे काम मी करीन, मी करीन, आम्ही करू! राजाचे वैभवशाली स्वप्न साकार करू. दुःख नको करूस माझ्या राजा, खंत नको करूस.'

हे असे खरोखरच घडले का? घडले असलेच पाहिजे! त्याशिवाय हा नाजूकपणा शहराला येईल कसा? महाराणीनेच या नगराची जडण-घडण निश्चित केली असेल. राणीवशानेच नेमून दिली सगळी कामे. केवळ स्त्रियांनीच फोडले इथले पाषाण; त्यांच्या हातांच्या स्पर्शाने हे पाषाण लाल झाले! त्यांना सांधणारा जो लोण्याहून मऊ आणि वज्राहून कठोर चुना, तोही मळला कंकणदार मनगटांनी. इथले रस्ते घडवताना हजार हजार सुंदरींनी मंगल कलश कटिखांद्यांवरून आणून रिते केले. मेंदीलावल्या पायांनी गारा तुडवला. गिलाव्यामध्ये किती तरी कुंकू, किती तरी काकणचुरा आणि थोडेसे काजळ मिसळले. 'चला ग, घुमर नाचू या' असे म्हणतच सगळे काम केलेले असल्याने नाचाला लागणाऱ्या विशाल प्रांगणासारखे इथले रस्ते झाले. इथे काम करणाऱ्या गडणी डोली-पालखींतून यायच्या आणि देखरेख करणाऱ्या राजकुमारी हत्तींवरून! म्हणून इथे निरुंदपणाला, खुजेपणाला, वावच नाही. मोठ्या आणि उंच कमानी, विशाल आणि प्रदीर्घ राजमार्ग, आखीव-रेखीव चौक, लाल पाषाणांचे महाल, महिरपींच्या तोरणांवर उभी असलेली कळसदार सोनेरी छपरे, मनसोक्त सैर करण्यासारख्या विस्तीर्ण बागा, मुख्य कोणता ते ओळखता येऊ नये असे सगळे शाही दरवाजे, राजधानीत येणाऱ्या पांथस्थांना, सौदागरांना सुखेनैव देवाणघेवाण करता यावी यासाठी रचलेल्या धनंतर पेठा...

या सर्व वास्तूवर सतत फिरत राहिलेले हात पुरुषाचे असणे शक्य नाही. ज्या हातांनी जयपूर घडवले ते हात कमळाच्या देठासारखे कोमल, पाकळ्यांसारखे तांबूस आणि मधासारखे गोड होते. ज्यांच्या तळव्यांवर घट्टे पडलेले होते त्यांना इथे कामच मिळत नसे! ज्या कछवा राजपूतांच्या बळकट हातांनी 'आंबेर' ही भव्य राजधानी वसवली होती त्या कछवांना कोठेतरी कामगिरीवर पिटाळून मगच रजपूत रमणींनी हे नगर-रचनेचे काम केले असावे. या इमारतींचे कंगोरे पाहाणारे डोळे अलंकारपारखी होते; या पाषाणांचा पोत तपासणारे हात, एरवी तलम पण जरतारी वस्त्रेच हाताळीत असत. आणि त्यात पुन्हा हा गारवा... उबदार गारवा! हा दुसऱ्या कोणी अर्पण करावा! "गोरे गोरे केळीचे स्तंभ...सदाचेच थंड! डौलदार मांसल अशा गजशुंडा...पण कातडी कसली खडबडीत! छट् तिच्या त्या सुंदर मांड्यांना उपमाच नाही", असे म्हणणाऱ्या कविकुलगुरूलाच या उबदार गारव्याचे कोडे सोडवायला दिले पाहिजे!

अशी ही जनानी राजधानी. मात्र तिच्या जनानी नजाकतीत खानदानी आब आहे. तिचा लिबास गुलबशी रंगाचा आहे. तिचे अलंकार टसटशीत आहेत. 'हे बाई फार नजरेत खुपेल लोकांच्या' असे म्हणून लफ्फ्याचे वस्त्र बाजूला ठेवण्याचा आधुनिक शिष्टपणा या नगरीजवळ नाही.

आपल्या अंगावर काय खुलते ते ओळखणारी आणि ओळखल्यावर कुणाच्या मताची पर्वा न करता ते पेहेनणारी धिटकामिना आहे ही जयपुरी! हिच्या कपाळावर बिंदी आहे, हातात हातभर सोनचुडे आहेत, हिचा घुंगट घुमटाकार आहे पण तो नित्य ढळतो! हिचा घागरा अर्थातच मोठा आहे! घोळाचा आहे! हिला मोत्याचे अलंकार आवडत नाहीत, हिऱ्यामाणकांचे आवडतात. ही अटकर बांध्याची नाही, तशी न आटोपणाऱ्या अंगाचीही नाही. ही गुलछडीसारखी नाही! पण फुलकोबीसारखीही नाही! कशी घरंदाज, जाणती, सोज्ज्वळ असून विभ्रमशील आहे.

राजाच्या स्वप्नाचे रूप तिला मिळाले, पण ते राण्यांनी दिले! केवळ यक्षिणींनी निर्माण केलेली अलका आहे ही! या अलकेच्या रक्षणासाठी अरवली पर्वताचे दूर पसरलेले हात सज्ज आहेत. एक

अगदी जवळ उभा आहे, त्याचे नाव नहरगड. राजघराण्यातील दिवंगतांच्या छत्र्या त्याच्या पायथ्याशी आहेत. मोठ्यांचे सगळेच मोठे आणि सुंदरांचे सगळेच सुंदर. त्यामुळे राजवंशीय मृतांनादेखील देखणी घरें मिळतात. नहरगड किल्ल्याच्या पायथ्याशी—गायतोर या ठिकाणी जयपूरच्या राजाराण्यांना निवांत आणि सुखाची चिरनिद्रा मिळाली आहे खरी; पण आपल्या छत्रीचे सौंदर्य पाहण्याकरिता कोणाला मधेच क्षणभर जाग आली तर! असला विचार मनात येण्यापूर्वी इथून काढता पाय घ्यावा तो अरवली पर्वताच्या दुसऱ्या हातावर, 'गाल्ता' इथे ठेवावा! गालव ऋषी तपस्येसाठी इथे राहिले होते (म्हणतात.) पण त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट अशी की इथून जयपूर नगरीच्या सांगोपांग दर्शनाची सोय आहे! उन्हात पाहिले तर खाली लाल गुलाबांच्या लांबरुंद ताटव्यासारखे जयपूर दिसेल. चांदण्याचा फिका हात फिरल्यावर याच ताटव्याला धुक्यावर तरंगणाऱ्या प्रवाळाच्या बेटाचे रूप येईल.

जयपूरला गुलाबी नगरी (pink city) म्हणण्याची फॅशन आहे. फार चांगली फॅशन आहे ही! कारण खरोखरच, अक्राळविक्राळ पसरलेल्या थरच्या वाळवंटाच्या किनाऱ्यावर जादूने उभी केलेली ही एक फत्तरांची बागशाही आहे. या गुलाबी नगरीमध्ये गुलाबी समता आहे! म्हणजे असे की वाडा राजाचा असो, सावकाराचा असो की आणखी कोणा सामान्याचा असो, त्याचा चौथरा, खांब, कमानी आणि मुख्य म्हणजे गवाक्षांची जाळी लाल पाषाणांचीच असेल. रईस आणि रयत सर्वांच्या घरांवर गुलाबी हात फिरलेला आहे. निवास आणि बाजारपेठ, पुरद्वार की मंदिरमार्ग—सर्वत्र लालिमा आहेच. आणि रंग कसा तो जराहि डोळ्यात खुपत नाही. या रंगाला 'जयपुरी लाल' असे खास नाव द्यायलाही हरकत नाही. अकबर बादशहाने फत्तेपूर शिक्रीला वापरलेला हाच रंग; पण जयपूरसारखा तो सामान्य रयतेच्या वाट्याला आला नाही. राजवाड्याला व किल्ल्याला लाल पाषाण आणि प्रजेला चुना अशी मोगली वाटणी जयपुरात दिसायची नाही. ही एक खुषीची लाल समता नाही का! चुनेगच्चीच्या पांढऱ्याफेक किंवा पिवडीच्या पिवळ्याधमक घरांची आपली गावे; अशा लाखो गावांचा आपला देश. ही जयपुरी कशी [illegible] एक दिसते.

नवराबायकांत देवाणघेवाण ही व्हायचीच. सम्राट व सम्राज्ञी झाली तरी नवराबायकोच! मोगल सम्राटांनी जोधपूर-जयपूरचा कब्जा केला, राजांना मांडलिक केले आणि राजकन्या जनान्यात नेल्या. पण एवढ्यामुळे, जय झाला तो मोगलांचाच असे काही म्हणता येणार नाही. त्यांच्या हिंदू राण्यांनी आपल्या परंपरा मोगलांना स्वीकारायला लावल्याच. जयपूर पाहाताना शिक्रीची आठवण, किंवा शिक्री पाहाताना जयपूरची आठवण अपरिहार्य आहे. म्हणजे या दोन्ही वास्तु एकरूप आहेत असे नाही. त्यांच्यात वैधर्म्यच फार सापडेल. तरीही दोहोंतील नाते डोळ्यांत भरल्याशिवाय राहाणार नाही. एकमेकांपासून खूप भिन्न दिसणाऱ्या भावंडांत काही आनुवंशिक साम्य असतेच आणि एखाद्या क्षणी हे साम्य एकदम जाणवते. चुलत किंवा चुलत चुलत अंतर पडले तरी अनेकदा असे गोत्र-विशिष्ट साधर्म्य प्रकटते. अनौरस संततीमध्ये जनक-जननींचा एखादा पडताळा लोक घेतच असतात. ज्याला आपण संस्कृती असे नाव देतो ती व्यापक व उदार अर्थाने अक्करमाशीच असते!

तरीही तुलनेने असे म्हणावयाचा मोह होतो की मोगलांकडून रजपुतांनी जेवढी वास्तुकला उचलली, त्यापेक्षा रजपुतांकडून मोगलांनी उचललेली वास्तुकला कितीतरी मोठ्या प्रमाणात आहे.

उंच उंच प्रवेशद्वारावरील नगारखान्याची देवडी, तिची ऐसपैस गवाक्षे, वरच्या पसरट कमानी, माथ्यावरची किंचित वक्र सोनेरी छपरे—रुंदीहून लांबी डोळ्यांत भरणारी, छोटेसे कळस...हा खास जयपुरी बाज आहे. नागमोडी महिरपीचे तोरण हाही खास राजस्थानी प्रकार, तिथल्या देवळांतून तलावांवरून सर्रास दिसणारा आहे. ते तोरण शिक्रीच्या चेहऱ्यावर उमटते आणि मोगलांची उसनवारी जाहीर करते. तशाच त्या मजल्यागणिक अनुक्रमे कमी होत जाणाऱ्या महालांच्या पाच मजली इमारती—त्यांच्या छपरावरचा छाप हिंदू आहे, राजपूत आहे. जयपूरचे दर्शन घेताना अंतश्चक्षू शिक्रीही पाहातात, नाटकस्थ नाटक पाहातात ते त्यामुळेच.

गुलाबी जयपूरचे गुलाबीपण विशेषच नजरेत भरावे म्हणूनच की काय जयपूरच्या नगरप्रासादांत एक सात मजली पांढराशुभ्र महाल

ठेवलेला आहे. त्याला चंद्रमहाल हे शोभणारे नाव मिळाले आहे. त्याच्या सर्वोच्च मजल्यावरून – मुकुटमंदिरांतून – सारे जयपूर डोळ्यांत साठवायची सोय आहे. राम-निवास उद्यानात असलेली हिरवी गर्दीदेखील रंगाचा एकसुरीपणा नाहीसा करायला उपयोगी ठरली आहे. पण रंगाप्रमाणे आकारही एकसुरी होता कामा नये म्हणून की काय सवाई जयसिंगाने एक प्रचंड वेधशाळा उभी केली आहे. तिला म्हणायचे यंत्र. यंत्रचे रूप जंतर. त्याला जोडले मंतर! अशा तऱ्हेने शहाण्यांनी केलेल्या ज्ञानोपार्जनेची अडाणीपणाने जंतरमंतर, 'जादू' करण्यात येते. दिल्लीपेक्षा हे जंतरमंतर आकाराने मोठे, अधिक सुसज्ज, सुरेख आखणीचे आहे. आकाशातील मंडळींच्या सर्व हालचाली निरखणाऱ्या महाराजाला धन्यवाद द्यायला हवेत. कुडमुडे ज्योतिष पुजणाऱ्यांच्या देशात, ज्ञानदृष्ट्या अंधाऱ्या युगांत ही विज्ञानपूजा विरळा.

जयसिंगाचे जयपूर. पण त्याच्या पूर्वजांचे आंबेर. जयपूरच्या ईशान्येला अवघ्या तीन कोसांवर. एका डोंगरावर राहणाऱ्या कछवा राजांची ही राजधानी. पुढे डोंगराचा आसरा घेण्यापेक्षा सुलतानाचा आसरा घेणे परवडू लागले, तेव्हा कछवा मैदानात जयपुराला आले. पण आंबेरचा तो डोंगरी प्रासाद आजही वेगळ्या दिमाखात उभा आहे. मात्र त्याही ठिकाणी, मोगली सुखांना सरावलेल्या उत्तरकालीन राजांचे हात लागल्याने 'सिंह दरवाजा'शेजारी दिवाण-इ-आम उभा आहे! महाराष्ट्राला माहीत असलेल्या मिर्झाराजे जयसिंगाचा हा दरबार महाल. गणेश दरवाजाजवळ दिवाण-इ-खास! याशिवाय राजांच्या विलासी हौसा पुरवण्यासाठी आरसेमहाल, सोहागमंदिर, सुखमंदिर याही गोष्टी तेथे आहेतच. शीशमहालाची दारे बंद करून आत एक मेणबत्ती लावली की चार भिंतींच्या आत नक्षत्रतारांनी भरलेल्या अवसेच्या आभाळाचा आभास होतो. कुणी ऐना दावला तरच ऐन्यात पाहाणाऱ्या मऱ्हाटी मनाला इथे स्वाभाविकच चक्कर येते! आंबेरची मंदिरे आणि महाल पाहाताना, जयपूरचे राजवाडे पाहाताना, संगमरवर आणि हस्तिदंत असल्या मूल्यवान चिजांचा वापर पाहाताना, तलम वस्त्रे आणि झकपक अलंकार पाहाताना एक विचार मनात येतो : महाराष्ट्रापासून, जसजसे उत्तरेला जावे तसतशी विलासप्रियता वाढतच जाते! लढवय्ये

रजपूतही याला अपवाद नाहीत! काहीं बांधावे, कारागिरी करावी, मिन्याचे पच्चीकाम करावे, कलाबतू-जर यांनी वस्त्रे नटवावी ही हौस आम्हांला कमीच! हे वैराग्य? की करंटेपण? की साधेपणा?

असले विचार मनात येत असताना नको ती दृश्ये दिसू लागतात :

हत्तीवर बसण्याचा षोक करणारे अमेरिकन जोडपे—म्हातारा-म्हातारी आंबेरचा डोंगर चढून येते. हत्तीपुढे वाद्ये वाजवीत वाजंत्री चालतात! आपण एक मुलुखावेगळा 'औटलँडिश' अनुभव घेतला, खास इंडियन असे काही अनुभवले या धुंदीत दांपत्य कसे प्रसन्न असते. वाटेल ती किंमत देऊन 'क्यूरिओ' घ्यायला ते तयार असते. आंबेरच्या राजवाड्याच्या ओवरीत दुकान थाटणारा कारागीर मऱ्हाटी गिऱ्हाइकाला टाळून साहेबाला आपली करामत दाखवू लागतो. मऱ्हाटी माणसाने काय करावे? डोंगर उतरू लागावे. माओता तलावात राजवाड्याचे प्रतिबिंब पाहावे, पायथ्याशी दिलाराम बागेत जावे. झाडाखाली झोपावे. म्यूझिअम पाहून पाहिजे तर ज्ञान गोळवावे. तेथून परतल्यावर बाजारात फिरावे. चूडीघरात बांगड्या पाहाव्या, बांधणीची साडी पाहावी. घेऊ मात्र काहीच नये! हो! हा आपला मराठी बाणा!

हवामहाल नावाची फसवी इमारत रस्त्यावरूनच पाहावी. ही नेहमी जयपूरची निशाणी म्हणून जाहिरातीत असते! टूरिस्ट डिपार्टमेंटचे निमंत्रण नेहमी हवामहाल—छाप असते! प्रत्यक्षात ही एक दर्शनी भिंत तेवढी मुलुखावेगळी असणारी वास्तु आहे. भिंतीमागे अक्षरशः काही नाही. अष्टकोन कापल्यासारखी मजेदार गवाक्षे, नक्षीचे खांब आणि छपरी सज्जे असलेली उंचच उंच पण संपूर्ण पोकळ, निकामी इमारत! सगळ्याच शाही डामडौलासारखी निव्वळ दिखाऊ. शुद्ध दिखाऊपणा म्हणजे काय याचे जर प्रत्ययकारी चित्र हवे असेल, तर हवामहालचा हा मुखवटा पाहावा.


वास्तविक जयपुरात पाहायची गोष्ट एकच : जयपूर! एकशेदहा फुटी रुंदीचे रस्ते मध्ययुगीन जगात तरी इतरत्र खासच नसतील. नगररचना हा शब्द कशाशी खातात याचे विस्मरण झालेल्या राष्ट्रात, अठराव्या शतकात, जयपूर कसे जन्माला आले कोण जाणे! हाही

एक भारतीय चमत्कारच. एक जंतरमंतरच! एवढे जुने जयपूर टिकले आहे ते रजपुतांनी मोगलांशी जोडलेल्या सलोख्यामुळे हे खरे. पण नंतर त्याच्यावर कमी का आघात झाले? अर्धे कच्चे संस्थानिक होऊन गेले. त्यांनी काही भलेबुरे बांधले, काही ओरखडे काढले. स्वराज्यात लोकशाहीने (!) काही इंगा दाखवलाच. वाईटसाईट इमारती सतत बांधल्या जात आहेतच. तरीही जयपूर अजून जयपूरच आहे, हे विशेष. काही आंतरिक शक्तीमुळेच हे घडले आहे. म्हणूनच जगभरच्या प्रवाशांची येथे रीघ आहे. अक्षरशः हजारो रुपये किंमत असलेले जवाहीर तेथे आजही विकले जात आहे. जुन्या जिद्दीने कलेची आणि कारागिरीची उपासना करणारी माणसे तेथे आहेत. परंपरेने शिकवले तशी भांडी घडवणारी, साड्या-शेले विणणारी, जूते बांधणारी, रंगकाम करणारी हुन्नरी माणसे अजून शाबूत आहेत. त्रिपोलियावरील बाजार अजूनही खास जयपुरी बाजार आहे. साफे बांधणारी रंगीन मंडळी अजूनही—तुरळक का होईना—आहेतच. पण या सर्वांवर ताण म्हणजे जयपुरची नाजूक शान अजून अभंग आहे. मोठे पण मुलायम, भव्य पण मऊसूत, चवदार पण अरुवार, पराभूत पण दिमाखी, असे हे जयपूर! हे जयपूर कसले? ही जयपुरीच! गोंडस, गुलाबी, फैनेबाज, लाडेलाडे करणारी, सुखावलेली आणि सुखवणारी, रंगीत आणि रंगेल, महागडी पण हवीहवीशी, खानदानी, जनानी जयपुरी!



# सौंदर्यतीर्थ कोणारक





सूर्योदय आणि सूर्यास्त! नेमेचि घडणाऱ्या दोन घटना! पण किती विलक्षण, किती रोमांचकारक! केवढी जादू, हळूहळू बदलणाऱ्या रंगांची, एकमेकांत विरघळणाऱ्या अनोख्या छटांची. ढगांच्या निःशब्द हालचाली, वाऱ्याला नकळत मिळणारा झोका, अंधारातून प्रकाशात येणाऱ्या जगावर हळुवार फिरणारा चैतन्याचा हात.

सूर्यबिंब, माणसाच्या नागड्या डोळयाला दिसू शकणारे सर्वांत प्रखर तेज! ईश्वराचे दर्शन जर सर्वथैव अशक्य असेल तर मग या तेजोनिधीलाच ईश्वर का न मानावे? आस्तिकांनाच नव्हे, नास्तिकांनादेखील सूर्यापुढे नमावेसे वाटते ते त्याच्या या विलक्षण शक्तीमुळे, रोजरोज घडणाऱ्या त्याच्या नाट्यमय प्रवेशामुळे. त्यातही एखादी गहनघोर रात्र उदास मनाने घालवली असेल, चार भिंतींच्या उबाऱ्याला कंटाळून पावले दूर निघाली असतील, पहाटेच्या वाऱ्याने वृत्ती थोड्या खुलत चालल्या असतील आणि अशा वेळी रंगांची उधळण करीत, प्रकाशाचा केशरगुलाल खेळत सूर्य उगवत असेल तर...तर त्याला धन्यवाद देणारे शब्द धन्यताच पावतील. त्यांतून उषःसूक्त जन्माला येईल.

सहा महिन्यांची दीर्घ हिवाळी रात्र फोडून सूर्याची तीक्ष्ण किरणे निळ्या पोलादी छतात घुसली तेव्हा उषेचा जो जयजयकार झाला, त्याला वेदमंत्राची शक्ती आली.

सूर्याने कुठून उगवावे? कुठूनही उगवला तरी तो राजबिंडाच! झोपडीमागून, झाडामागून, डोंगराआडून, चाळींच्या गर्दीतून, गिरणीच्या चिमणीजवळून – प्रत्येक ठिकाणी त्याचे रुपडे सुंदरच दिसेल! पण निळ्याकाळ्या समुद्राच्या अफाट विस्तारातून, क्षितिजावरच्या नागमोडी पाणरेषेवरून उगवणारा सूर्य...त्याचे काही निराळे वैभव आहेच की! अधेमधे काही नाही. काठापासून आभाळाच्या बुडापर्यंत पाणी आणि पाणी; चुबुकचुबुक उचंबळणारे पाणी; अगाध पाणी; काळे पाणी; अंधारात अडमडणारे, लाटा होऊन एकमेकांना वेढणारे, नागनागिणींच्या असंख्य मिथुनांसारखे पाणी! अशा पाण्याचा कानोसा घेत किनाऱ्यावर एक उदासी उभा आहे, शून्यात नजर लावून. कुठे काही होत नाही, घडत नाही असे त्याला वाटते आहे...तो समोर अंधार हलतो. आभाळ जरा चाळवते. अंधार जरा करडा झाला का? हे दीर्घबाहू ढग कुठून आले एकदम? पाहाता पाहाता हे रंगीत होऊ लागले; जर्द जांभळे, नारिंगी, गुलाबी, केशरी, सोनसळे, रुपेरी... जादुगाराने मुठीतून रंगीबेरंगी रुमाल काढावे तसे आले हे. आणि या झळझळीत पताकांच्या मागून, मूक सुवर्णघंटिकांच्या निनादात, अदृश्य रथावर आरूढ होऊन, प्रकाशाचे असंख्य बाण फेकीत, केवळ मुखमात्र दर्शन देत येतो आहे तोच तो तेजोनारायण...हा ईश्वर असलाच पाहिजे! पाण्यावरून माणसाला चालता येत असते तर अशा वेळी समुद्रावरून चालत गेल्याशिवाय तो राहिला नसता. पसरलेल्या मऊ मऊ निळ्या पाणघड्यांवरून आदित्याच्या भेटीला गेला असता. त्याला नकळत ओढला गेला असता, दिव्यावर जळणाऱ्या पतंगासारखा. पण माणूस दुबळा, पंगू! सूर्याचा सारथी अरुण हा पांगळा आहे म्हणतात. खरे म्हणजे सूर्याचा सारथी माणूस आहे! पांगळ्या माणसाला म्हणूनच म्हणावे लागते – तेजोनिधे, तुला दुरून वंदन!

तेराव्या शतकात नरसिंहदेव नावाचा एक राजा अंग-वंग-कलिंग देशांत राज्य करीत होता. एक दिवस असाच फिरत फिरत तो पूर्व

सूर्योदय आणि सूर्यास्त! नेमेचि घडणाऱ्या दोन घटना! पण किती विलक्षण, किती रोमांचकारक! केवढी जादू, हळूहळू बदलणाऱ्या रंगांची, एकमेकांत विरघळणाऱ्या अनोख्या छटांची. ढगांच्या निःशब्द हालचाली, वाऱ्याला नकळत मिळणारा झोका, अंधारातून प्रकाशात येणाऱ्या जगावर हळुवार फिरणारा चैतन्याचा हात.

सूर्यबिंब, माणसाच्या नागड्या डोळ्याला दिसू शकणारे सर्वांत प्रखर तेज! ईश्वराचे दर्शन जर सर्वथैव अशक्य असेल तर मग या तेजोनिधीलाच ईश्वर का न मानावे? आस्तिकांनाच नव्हे, नास्तिकांनादेखील सूर्यापुढे नमावेसे वाटते ते त्याच्या या विलक्षण शक्तीमुळे, रोजरोज घडणाऱ्या त्याच्या नाट्यमय प्रवेशामुळे. त्यातही एखादी गहनघोर रात्र उदास मनाने घालवली असेल, चार भिंतींच्या डबाऱ्याला कंटाळून पावले दूर निघाली असतील, पहाटेच्या वाऱ्याने वृत्ती थोड्या खुलत चालल्या असतील आणि अशा वेळी रंगांची उधळण करीत, प्रकाशाचा केशरगुलाल खेळत सूर्य उगवत असेल तर...तर त्याला धन्यवाद देणारे शब्द धन्यताच पावतील. त्यांतून उषःसूक्त जन्माला येईल.

सहा महिन्यांची दीर्घ हिवाळी रात्र फोडून सूर्याची तीक्ष्ण किरणे निळ्या पोलादी छतात घुसली तेव्हा उषेचा जो जयजयकार झाला, त्याला वेदमंत्राची शक्ती आली.

सूर्याने कुठून उगवावे? कुठूनही उगवला तरी तो राजबिंडाच! झोपडीमागून, झाडामागून, डोंगराआडून, चाळींच्या गर्दीतून, गिरणीच्या चिमणीजवळून – प्रत्येक ठिकाणी त्याचे रुपडे सुंदरच दिसेल! पण निळ्याकाळ्या समुद्राच्या अफाट विस्तारातून, क्षितिजावरच्या नागमोडी पाणरेषेवरून उगवणारा सूर्य...त्याचे काही निराळे वैभव आहेच की! अधेमधे काही नाही. काठापासून आभाळाच्या बुडापर्यंत पाणी आणि पाणी; चुबुकचुबुक उचंबळणारे पाणी; अगाध पाणी; काळे पाणी; अंधारात अडमडणारे, लाटा होऊन एकमेकांना वेढणारे, नागनागिणींच्या असंख्य मिथुनांसारखे पाणी! अशा पाण्याचा कानोसा घेत किनाऱ्यावर एक उदासी उभा आहे, शून्यात नजर लावून. कुठे काही होत नाही, घडत नाही असे त्याला वाटते आहे...तो समोर अंधार हलतो. आभाळ जरा चाळवते. अंधार जरा करडा झाला का? हे दीर्घबाहू ढग कुठून आले एकदम? पाहाता पाहाता हे रंगीत होऊ लागले; जर्द जांभळे, नारिंगी, गुलाबी, केशरी, सोनसळे, रुपेरी... जादुगाराने मुठीतून रंगीबेरंगी रुमाल काढावे तसे आले हे. आणि या झळझळीत पताकांच्या मागून, मूक सुवर्णघंटिकांच्या निनादात, अदृश्य रथावर आरूढ होऊन, प्रकाशाचे असंख्य बाण फेकीत, केवळ मुखमात्र दर्शन देत येतो आहे तोच तो तेजोनारायण...हा ईश्वर असलाच पाहिजे! पाण्यावरून माणसाला चालता येत असते तर अशा वेळी समुद्रावरून चालत गेल्याशिवाय तो राहिला नसता. पसरलेल्या मऊ मऊ निळ्या पाणघड्यांवरून आदित्याच्या भेटीला गेला असता. त्याला नकळत ओढला गेला असता, दिव्यावर जळणाऱ्या पतंगासारखा. पण माणूस दुबळा, पंगू! सूर्याचा सारथी अरुण हा पांगळा आहे म्हणतात. खरे म्हणजे सूर्याचा सारथी माणूस आहे! पांगळ्या माणसाला म्हणूनच म्हणावे लागते – तेजोनिधे, तुला दुरून वंदन!

तेराव्या शतकात नरसिंहदेव नावाचा एक राजा अंग-वंग-कलिंग देशांत राज्य करीत होता. एक दिवस असाच फिरत फिरत तो पूर्व

समुद्राच्या वेळेवर पोहोचला, तो रात्र झाली. थकलेल्या राजाने समुद्राच्या किनाऱ्यावरच विसावा घ्यायचे ठरवले. आभाळ स्वच्छ होते. समुद्र मंद्र होता. बऱ्यापैकी वारा होता. पहाटेपहाटेला राजाला जाग आली. दूरच्या वडावर पक्षी कुजबुजत असावे. राजा उठून बसला. पूर्वक्षितिजावर काहीतरी हलले. राजा टक्क बघत राहिला. नेहमीचेच नाटक! रोजचेच चेटुक!! ढगांचे, रंगांचे, छायाप्रकाशांचे मुक्याने विरघळणे, मिसळणे, दूर होणे; आणि मग सुवर्णाची, रत्नांची भूषणे घालून, कवच-कुंडले धारण करून सम्राट सूर्यनारायणाचे प्रकट होणे! समुद्राची लाट अन् लाट लकाकली. राजाच्या कण्यामधेही एक लाट चमकली. असा सूर्योदय नरसिंहदेवाने पाहिला नव्हता! त्याच्या तोंडून शब्द फुटेना. त्याला बोलायचे होते. सांगायचे होते. गायचे होते. सूक्त म्हणायचे होते. पण शब्द कसा तो फुटेना. तो परत फिरला. त्याने प्रधान-अमात्यांना बोलावले. त्यांना म्हणाला, "करा रे हाकारे, पिटा रे डांगोरे! पूर्वसमुद्राच्या किनाऱ्यावर पाषाणाची कविता रचायची आहे! भगवान् सूर्यनारायणाच्या सामर्थ्यांचे सूक्त गाण्यासाठी माणसाची वाणी अपुरी आहे. अबोल पाषाणांवर सौंदर्याचा साज चढवून आपले मुके स्तोत्र आपण गाऊ या. करा रे हाकारे, पिटा रे डांगोरे. मूर्तिकार हो, कलाकार हो, या आणि घडवा. छिन्नीच्या तालावर रचा एकेक ऋचा, रचा एक सूर्यसूक्त." मूर्तिकार, शिल्पी बारा वर्षे रचीत राहिल. तेव्हा कोनारकचे सूर्यमंदिर उभे राहिले. एक रेखीव, कोरीव, प्रचंड, उत्तुंग पाषाणकाव्य.

हिरवी भाते, पिवळी शेते, उंच उंच माडांची बने, केळीच्या बागा ही सगळी सृष्टी मागे टाकून समुद्राच्या ओढीने गेले की प्रथम पाहावा एक मऊसूत वाळूचा रेशमी किनारा. पलीकडे सळसळणारा समुद्र. पहाटेपहाटे पोचण्याइतकी तडफ दाखवावी, म्हणजे समुद्रोद्भव रत्नासारखा सूर्य वर येताना दिसेल. सूर्यदर्शन हा कोनारकचा प्रथम आचार. मग मंदिराकडे वळावे हा दुसरा.

चौरसचौरस विशाल प्रांगणात, सर्व बाजूंनी प्रमाणशीर जागा सोडून, मधोमध सूर्यदेवाचा रथ उभा राहावा अशी नरसिंहदेवाची योजना होती. सूर्यमंदिर सूर्यासारखेच असायला हवे—म्हणजे स्थिर आहे की

चालते आहे ते कळू नये! म्हणून मंदिराला रथाचे रूप प्राप्त झाले. असा तसा रथ नव्हे तो. एक घोडयाचा टांगा किंवा दोन घोड्यांचा शिग्राम नव्हे! सात घोडे आणि चोवीस चाके! केवळ वेदोपनिषदात शोभते असे हे रहस्य. सात दिवस जेथे अश्वरूप धारण करतात, असा हा रथ. आणि चोवीस चाके? चांद्रमासांचे चोवीस पक्ष? की बारा राशींच्या या जोडया? की घटकाप्रहरांची ही आवर्तने? की ही चोवीस आकाशे? की विश्वचक्रे? दिशोपदिशांच्या अरींनी शोभणारी चोवीस चाके! व्यासांच्या प्रतिभेला या कोडयाचे उत्तर सुटले तर सुटेल. पण हा रथ आधी दूरावरून नीट न्याहाळावा. या कोनातून आणि मग त्या कोनातून. तटाच्या चहू अंगांनी हा रथ पाहावा. हा चौकोनी आहे; पण कंगोरे काढून त्याची रूपसंपदा अशा खुबीने वाढविण्यात आली आहे की चौकोनाची सगळी रूक्षता, बोच नाहीशी व्हावी. चार दिशा असूनही क्षितिज चौरस नसते, तसेच हे मंदिर.

आपल्यासाठी स्थिरावलेला हा सूर्यदेवाचा रथ एकदा सम्यक् रूपामध्ये पाहिला, अनुभवला की मगच त्याचे तपशील पाहाण्यासाठी प्रांगणात उतरावे. आता लक्षात येते की, जरा बाजूला उभे असलेले 'नटमंदिर' या रथाचा तसा भाग नव्हे. राजाची ही सौंदर्यपूजा आहे. गायक-वादक-नर्तक यांच्या असंख्य भावमुद्रा व आकृतिबंध यांनी हे नटमंदिर नटलेले आहे. त्याचे छप्पर आता पार कोसळलेले आहे. पण आतल्या प्रचंड चौकोनी खांबांवर आडोसा घेणाऱ्या नर्तिका शाबूत आहेत. या सुंदरी खऱ्या, पण मनात आणले तर पुरुषांना खाऊन टाकतील हे सुचवणाऱ्या 'याळीं'च्या उग्र मूर्ती शेजारी आहेतच. 'याळी' हा शिल्पकारांच्या कल्पनासृष्टीतला हिंस्र प्राणी. हत्तीहून बळकट, सिंहाहून पराक्रमी, वाघाहून चपळ, रागावला तरी हसतो आहे असे वाटणारा! नटमंदिराप्रमाणेच आणखीही किरकोळ मंदिरे प्रांगणांत आहेत. पण ती दिसतील कशी? सूर्यापुढे इतर नक्षत्रे मावळावीत तसे या मंदिरकांचे होते.

सुंदर शिल्पांनी नटलेला सभामंडप पुढ्यात घेऊन उभे असलेले मुख्य 'देऊळ' २२७ फूट उंच होते! होते म्हणायचे कारण, आता ते शिखर हयात नाही. ते कोसळले. जगमोहन नावाचा सभामंडप बराच

शाबूत आहे; मुख्य देवळाची फार पडझड झाली. बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नर बहादुरांना सुबुद्धी झाली म्हणून १९०३ साली सूर्यदेवाचा हा रथ पुनरुज्जीवित झाला. कलिंगांच्याच नव्हे, तर अवघ्या भारतवर्षाच्या मंदिरस्थापत्यकलेचा जो परमोत्कर्ष तो आमच्याच अडाणीपणामुळे आम्ही अंधारात बुडवला होता. आकाशमध्यावर गेलेल्या सूर्याला बुडवून टाकणारा हा अंधार. पण साहेबाने करुणा केली, त्याने या सूर्यरथाचा उद्धार केला. कोसळणाऱ्या जगमोहन मंडपाच्या आत त्याने दगडमातीचा भराव केला आणि त्या वास्तूचा बाह्य घाट तरी शाबूत राहील अशी व्यवस्था केली. उत्खनन करून मंदिर शोधावे लागले इतके दैन्य आलेले होते. जमले तेवढे वाचवले म्हणून आज सौंदर्याच्या यात्रिकांची पावले कोनारककडे खेचली जात आहेत. रथाच्या सात घोड्यांपैकी फक्त एक जिवंत आहे, पाच घोड्यांचे अवशेष मात्र आहेत. चोवीस चक्रांतली सात आठ धड आहेत; ती महाप्रमाण आहेत आणि सूक्ष्मपणे पाहिल्यास सुंदर आकृतींनी खच्चून भरलेली आहेत. सोळा चाके हरवली, सहा घोडे उधळले...पण जे उरले आहे तेही कमी नाही!

जगमोहन सभामंडप हेच आता खरे आकर्षण आहे; त्यातही मंडपाचे छप्पर. या पिरामिडाकार छपराचे तीन मजले अक्षरशः एकाहून एक वरचढ आहेत. त्याच्या आधारासाठी प्रभावी पुतळ्यांचीच टेकणे आहेत आणि त्यांच्या अंगाखांद्यावर, नाचऱ्या, गाणाऱ्या, वाजवणाऱ्या रम्याकृती आहेत. जगमोहनच्या चारी अंगांस प्रचंड कोरीव तोरणे आहेत. दरवाजांच्या दुतर्फा मूर्ती आहेतच—अप्सरांच्या, प्रेमिकांच्या, पशुपक्ष्यांच्या, लतावृक्षांच्या! या मंदिरात देवदेवतांना आणि पुराणातल्या प्रसिद्ध स्त्रीपुरुषांना फारसे स्थान नाही. मुख्य सूर्याची मूर्तीही आता दिल्लीला स्थायिक झाली आहे. (१९५० साली पंडित नेहरूंच्या सूचनेवरून ती राष्ट्रीय संग्रहालयात नेण्यात आली आहे.) मूर्ती आहेत स्त्रीपुरुषांच्या. हे स्त्रीपुरुष अमक्या देशातले, तमक्या प्रदेशातले नाहीत. या किंवा त्या काळातले नाहीत. खरे म्हणजे या प्रतिकृतीदेखील नाहीत. ही शिल्पकारांची अपत्ये आहेत. यांचा जन्म कलाकारांच्या मनांत झाला. ही माणसे, अतिमानुषच

आहेत! ती अपार्थिव आहेत! सौंदर्याबद्दलच्या आदर्शांनी त्यांना रूप दिलेले आहे. अपरिहार्यपणे अपूर्ण राहाणाऱ्या भोगवासनांची पूर्ती करणे, हे त्यांचे जीवितकार्य आहे.

कोनारकच्या भिंतींवर नृत्यांगना नाचत आहेत. कोणी मृदंगी मृदंग वाजवीत आहेत. कोणी मदनमंजिरी मंजरीवर ताल धरीत आहेत. कोणी वेतसतनु वेणु वाजवीत आहेत. कोणी सौंदर्याच्या दर्पामध्ये दर्पणात पाहात आहेत. कोणी विवस्त्र असून दिमाखात ताठ उभ्या आहेत. कोणी सवस्त्र असून लाजेने चूर आहेत. पण सर्वांत कहर आहे कामोन्मत्तांचा. कामवासनेने पेटलेल्या मनाला न कसली लज्जा, न संकोच हे जरी खरे असले तरी, कोनारकच्या भिंतींवरचा अनिर्बंध निर्लज्जपणा एकप्रकारे उबगच आणतो. दोन जिवांच्या मिलनाची प्रतिमा जरी कोणी चित्रित केली तरी त्यांत अश्लील काहीच नाही; पण इथे सामूहिक समागम, विकृत अंगसंग, विचित्र आसनबंध, एक ना दोन उग्र व उत्तान प्रकार कशासाठी चित्रित व्हावेत हे समजत नाही. निकोप आणि सुविहित प्रणय उद्वेग आणीत नाही. कामी जनांची उत्सुकता, ईर्ष्या, असूया, परस्परांवर जय मिळवण्याची इच्छा, परस्परांना पिळून टाकण्याची असोशी, रसरशीत सौंदर्याचे रसरसून केलेले आस्वादन या गोष्टींनी रसिकाच्या मनाचा आनंद वाढेलच यात काय संशय? मानवी विकारही सौंदर्यालाच जन्म देतात. पण विकार व विकृती, वासना व लिंगपिसाटपणा यांत फरक नाही काय? आंतरिक आकर्षणाशिवाय जसा शरीरसंग गलिच्छ आहे, तसे सौंदर्यग्रहणाशिवाय अन्य हेतूने केलेले मैथुनचित्रणही सुसंस्कृत मनाला तिरस्करणीय वाटते. पण योग असा होता की, मूर्तिशिल्पाचा उत्कर्ष झाला त्याच काळी प्राचीन भारतीय सामाजिक सभ्यतेचा अपकर्ष झालेला होता. शाक्त पंथ, तंत्रपूजक, पंच मकारांनी ईश्वरोपासना साधू पाहाणारे ढोंगी साधू यांचा समाजावर फार पगडा होता. कोनारकच्या सौंदर्याला हे गालबोट लावण्याचे काम याच विकृत मनाच्या पंथांनी केलेले असावे. कोणी म्हणतात, माणसाला वासनांपासून परावृत्त करण्यासाठी ही उद्वेगकर शिल्पे मंदिरात निर्माण करीत; कोणी म्हणतात, सूर्यदेवाच्या साम्राज्यात अखंड व अनंत सुखोपभोग मिळतील याची ही ग्वाही

आहे! कोणाच्या मते मानवी देहाकृतींचे विचित्र बंध दाखविता यावे म्हणून कलाकारांनी या कल्पना केल्या आहेत. ते काही असो. यातला कोणताही दृष्टिकोण असला तरी तो असफल झालेला आहे, असे म्हटले पाहिजे. या अतिरंजित मिथुनशिल्पांमुळे न सौंदर्यकल्पना' तृप्त होते, न वैराग्य स्फुरते. हे विकृतीचे स्वैर प्रदर्शन आहे, एवढेच.


मौज अशी की यामुळेही कोनारकचे दर्शन आपल्या मनावर प्रतिकूल परिणाम करीत नाही. शहाणा माणूस ही शिल्पे पाहातो, दूर होतो, दुरून पाहातो आणि मग त्याच्या असे ध्यानात येते की या शिल्पांमुळे मंदिराचे दूरदर्शन बिघडलेले नाही; उलट हृद्य झाले आहे, तपशिलात विकृतिदर्शन घडवणारी ही कला सम्यक्-दर्शनात विशुद्ध वाटू लागते. चौरस असून चौरस न भासणारे हे मंदिर मग अधिकच भुरळ घालू लागते. नक्षीकामात लपलेल्या वृक्षवेली, मृगयेची दृश्ये, प्रणयी युगले, नृत्यगानात तल्लीन झालेले स्त्री-पुरुष, पशुपक्षी.. सारे एका महान प्रकल्पाचे अंश आहेत. यातले काही तपशील बीभत्स, काही सुंदर आहेत, पण सारे मिळून जे विश्व निर्माण झाले आहे तेच महत्त्वाचे.

सूर्यमंदिराच्या आवारात एक छायामंदिर आहे. ज्याला छायेचे मंदिर बांधावेसे वाटले त्याची कल्पनाशक्ती विलक्षणच म्हणावी लागेल. पण वेगळी करामत अशी त्याला काहीच करून दाखवता आलेली नाही. नवग्रहांचे एक प्रचंड शिल्प सूर्यमंदिराच्या प्रवेशद्वारातच होते. ते कोसळले तेव्हा त्याच्या वसतीसाठी पुरातत्त्व खात्याने एक दालन बांधले. हे दालन प्रांगणाबाहेर असल्याने तिथे संधिसाधू भिक्षुकांनी आपला बाजार मांडला आहे! कळकट भटजींकडून ग्रहशांती करवून घ्यायला अजागळ भाविकांची एकच गर्दी तिथे उसळते. प्रसादासाठी जी मेवामिठाई उपस्थित असते तिच्या बळावर शे-पाचशे माणसे आजारी पडायला काहीच हरकत नसावी!


हे सगळे टाळून पुन्हा प्रांगणातच यायला हवे. मोकळ्या जागेत मोकळेपणाने हवा-ऊन खाणारे दोन हत्ती आणि दोन घोडे पाहिल्या-शिवाय कोनारकची यात्रा पूर्ण होणार नाही. हत्ती देखणे आहेत, सोंडेत माणूस उचलण्याइतके कनवाळूही आहेत. पण हत्तीच आहेत

झाले! कोनारकचा घोडा मात्र केवळ घोडा नाही. काय ऐट, काय सामर्थ्य, काय सौंदर्य भरले आहे या घोड्यात! हा वासनेहून उद्दाम नि वादळाहून बंडखोर आहे. सम्राटासारखा जयिष्णु आहे. हा षड्यंत्रा-सारखा कावेबाज आहे, पण याच्या टापेखाली मरण्याचा मोह व्हावा असा याचा रुबाब आहे! हा प्रकृतीचा सगळा सगळा कस लुटून घेतलेला चैतन्याचा पुतळा आहे. हा सूर्याच्या रथालाच शोभेल. हा सूर्यतत्त्वच आहे...फळवणारे, जाळणारे, जगवणारे, मारणारे, अखंड गतिमान असणारे! हा वेदोक्त अश्वमेधातच शोभेल असा अश्व आहे, अश्वतत्त्व आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत



# ऐका काशीनगरीची कहाणी



वरुणा आणि आसी नद्यांच्या संगमावर वाराणसी नामे तीर्थ आहे हे फारसे कुणाच्या ऐकिवात नाही. पण गंगेच्या तीरावर काशी नामे नगरी असून, तेथे विश्वनाथाचे सनातन साम्राज्य आहे, ही गोष्ट माहीत नसलेला प्रौढ वयाचा भारतीय कोठे असू शकेल काय ?

रुद्राचा शिव झाला आणि शिवाचा विश्वनाथ. ही घटना तशी अतिप्राचीन नाही. विश्वनाथाला वस्तीसाठी वाडा मिळू लागला, दिगंबराला देवळाचा आडोसा लाभला, तो तर अगदी अलीकडे, फार तर दोन हजार वर्षांपूर्वी. म्हणजे ही घटना तशी ऐतिहासिकच आहे. इतिहासाच्या लेखी दोन हजार वर्षे म्हणजे दोन हजार दिवस. पण आपण भारतवासीय इतके चतुर आहोत की, काशीविश्वेश्वराला आपण जवळजवळ अनादित्व देऊन टाकले आहे. गंगेच्या काठावर काशी वसली नसून, काशीच्या मोहाने म्हणजे विश्वनाथाच्या सहवासासाठी आतुर होत्साती गंगाच काशीकडे वाहात गेली असा आभास आपण किती कौशल्याने निर्माण केला आहे !

राजकीय दृष्ट्या ज्याच्या एकराष्ट्रीयतेची जाणीव आजही पुसट आहे,

त्या देशाची धार्मिक दृष्ट्या एकसंधता साधणाऱ्या शक्तींत गंगा आणि काशी यांचा केवढा तरी वाटा आहे. काबूल, काश्मीर, कामरूप आणि कामोरिन यांच्या आद्याक्षरातला 'का' काशीतला आहे. काश्मीरी पंडितापासून केरळीय नंबुद्रीपर्यंत सर्वांचे हात काशीविश्वेश्वरापुढे जुळण्यासाठी उत्सुक असतात. आळस म्हणा की अध्यात्मम्हणा — विश्वेश्वर सर्वत्र आहेच या श्रद्धेमुळे, जो उठतो तो काशीला जातो, असा प्रकार हिंदू समाजात होत नसला तरी काशीविषयीची हिंदू समाजाची भावना मुसलमानांच्या मक्केविषयीच्या भावनेसारखीच आहे, होती, यात काय संशय? मनमे चंगा तो काथवटमे गंगा, हे खरेच. पण मग आपल्या तोळा-मासा प्रकृतीचा विचार न करता ऐन हिवाळ्यातही हरद्वारला, काशीला, प्रयागला गंगास्नान करण्याचे अगत्य म्हातारीकोतारी का दाखवतात? महाराष्ट्रात पंढरी आणि भारतात काशी. सर्व देवता जशा परमेश्वरात, तशी सर्व तीर्थे गंगेत आणि सर्व क्षेत्रे काशीत विलीन होतात. माझे मन किती नास्तिक! पण काशी आणि गंगा या नावाने जे विश्व विणलेले आहे, त्याच्याबद्दल एक चमत्कारिक ओढ मनाला होतीच, हे नाकारण्यात काय अर्थ आहे!

ओढ होती. ती संपली. मीच गंगार्पण केली. खरे म्हणजे गंगाच गंगार्पण करून टाकली. केवढे नुकसान हे! हा काशी पाहाण्याचा तोटा!! गेलोच नसतो कधी काशीला तर बिघडले असते? ब्रह्मदत्त राजाची ही नगरी. ब्रह्मदत्त नगरी. सदैव प्रकाशते ती काशी. मोठमोठी मंदिरे, माड्या यांनी प्रकाशणारी, घाटावर झालेल्या दीपदानाने प्रकाशणारी, बाजारपेठेतील वैभवाने प्रकाशणारी, विद्येने आणि धर्मनिष्ठेने, ब्रह्मतेजाने आणि भक्तीने प्रकाशणारी अशी जी काशी माझ्या मनात छपून होती, ती काशीला हरवली! भाष्यकारांना वेध लावणारी, संतांना आमंत्रिणारी, आपल्या रक्षणासाठी छत्रपती जन्माला घालणारी, सामान्य मनातल्या क्षीण लामणदिव्यात आपला स्नेह भरणारी, दरिद्री घरांतल्या उभार मनाच्या पोरांना विद्येचे वेड लावून आपल्याकडे खेचणारी हीच ती काशी? हे आमचे सर्वोच्च न्यायपीठ? आमच्या भक्तिसरितांची धाव या मुखाकडे? ही धर्माची भूमिका? हे दुबळ्यांचे शरणस्थान? काशीला जाणारे शेकडो वर्षांतले यात्रिक तिचे पुण्यपावित्र्य कणशः

बरोबर घेऊन परतले असावेत. त्याशिवाय ही भूमी अशी कळाहीन ओंगळ झालीच नसती !

आता हे खरे की, काशी हे भले पसरलेले नगर आहे. गंगेच्या तीरावर अनेक घोष आहेत; घाट आहेत; माड्या आणि मठ आहेत; वाडे आणि इमले आहेत; भरगच्च बाजार आहेत, सोने आणि रत्ने आहेत; सोनसळे पाटोळे आहेत; जरीबुंदी शालूशेले आहेत; इथे पाठशाळा आणि गुरुकुले आहेत—पण या सर्व पसाऱ्यातून माणूस प्रथम जाऊ पाहातो तो विश्वनाथाच्या मंदिराकडे. कारण काशी म्हणजे विश्वनाथ. समाजाने हे समीकरण करून ठेवलेले आहे. त्यामुळे काशीची परीक्षा करावयाची ती विश्वनाथाच्या वसतीवरूनच. बाकीच्या नव्या जुन्या वास्तु दुय्यम. मुख्य ते मंदिर. खरे म्हणजे सर्वच क्षेत्रांचे हे असे असते. त्यांचा केंद्रबिंदू मंदिर. मानबिंदू मंदिर. सारा बाजार मांडायचा तो मंदिराभोवती. साऱ्या वाटांना दिशा द्यायची मंदिराची. सगळ्या गावाच्या जीवनाचा गोफ गुंफायचा मंदिराला मध्य कल्पून. काशीचेही तसेच आहे. गंगा आणि लोकगंगा यांच्या तीरावर आधी विश्वनाथ उभा राहिला आणि मग त्याच्याभोवती काशी वाढत गेली. मोत्याच्या दाण्यावर लेप चढत राहावे तशी.

विश्वनाथाच्या मंदिराकडे जाताना ही जाणीव मनात असतेच. बाजारपेठेतून आणि मग गल्लीबोळातून प्रत्यक्ष मंदिराजवळ पोचेपर्यंत, आपण एका फार मोठ्या अनुभवाचे धनी होण्यासाठी चाललो आहोत, असेच वाटत राहाते. मग लागतात मंदिराच्या खुणा. आमच्या दुबळ्या लोकजीवनाच्या खुणा. आळस आणि अस्वच्छता, अज्ञान आणि रोगराई यांच्या खुणा. प्रत्येक दर्शनाबरोबर मनाला जळजळीत डाग देणाऱ्या, ओरबाडून काढणाऱ्या. कुष्ठरोगी, महारोगी, अनाथ आणि अपंग यांच्या न संपणाऱ्या रांगा. भीकमागे लाचार आणि लुबाडखोर पंडे. नाळ लोंबवीत फिरणाऱ्या, अंग बाहेर आलेल्या गाई. स्वतःच्या विष्ठेत बरबटलेल्या अंगाने, दुसऱ्यांच्या शेणामुतात बरबटलेला चारा खाणारे पोळ—देवाला सोडलेले ! हे असते आमचे गोरक्षण. आमची करुणा ! आमचा आत्मैक्यभाव. ही सर्वांभूती समभावना. याच गर्दीत गर्दी करायला उभे असतात विक्रेते आणि दलाल. पुण्यासकट सर्व काही

ओपू शकणारे. कोणी गंधलावे. निर्माल्यविके. देवदलाल. मग उसळणारी भारतीय जन-सामान्याची भरती—सर्व वासांसकट, व्यसनांसकट, वासनांसकट, याचनांसकट विश्वंभराकडे धाव घेणारी. प्रत्यक्ष ईश्वराच्या दर्शनासाठी येताना किती गजबज, बुजबुज, बेंबेंकार! मनःशांती सोडाच, कायिक वा वाचिक शांतीचाही पत्ता नाही. अंधाऱ्या, सदैव ओल्या, दर्प मारणाऱ्या कुजक्या-सडक्या अशा 'पत्रं-पुष्पं-फलं-तोयंच्या' वासाने कुंद झालेल्या या गल्लीत विश्वनाथ राहातो? तर मग त्याने भुलेश्वरी कबुतरखान्यात, दाणेबाजारात, नागपाड्यात, बडगादीत घर करायला काय हरकत आहे? वारांगनांच्या वस्तीत, मंडईमागच्या बोळात, बड्या बाजारातील पिछाड गल्लीत—याच्यापेक्षा निश्चितच अधिक घाण नसते. गंगेच्या तीरावरच काय ठेवले आहे विशेष? आंबील ओढा, गावगंगा, करंगळीएवढ्या धारेने वाहाणारी किंवा हिरव्या शेवाळसाईने झाकलेल्या डबक्यातच अंतर्धान पावणारी कोणतीही क्षुद्र झरी शेजारी असायला काय हरकत आहे? अक्षय पाण्याच्या अनाद्यनंत प्रवाहाच्या तीरावर, निळ्याभोर आकाशाखाली, सनातन अश्वत्थवृक्षाच्या साक्षीने, क्षितिजापर्यंत प्रकाश फाकवीत विश्वनाथाची मूर्ति उभी असावी. त्याऐवजी, विश्वनाथ-गल्लीत अवघा अपवित्र बाजार भरवून सगळ्या शेणखळ्याच्या ढिगाऱ्यात शिवाची स्थापना करणाऱ्या समाजाला काय म्हणावे?

मुळात काशी, म्हणजे विश्वनाथही, इतक्या गलिच्छ वातावरणात न नांदल्याचा पुरावा आहे. मुळात हे मंदिर खरोखरच प्रचंड असले पाहिजे. युवान त्संग या प्रसिद्ध चिनी मुशाफिराने त्याचे वर्णन करून ठेवलेले आहे. "शंभर फूट उंचीची ही महादेवाची भव्य आणि वैभवशाली मूर्ती पाहिली की, पाहाणाऱ्याचे मन भयाने आणि आदराने आकुल होते. ही मूर्ती? छट्, हा चैतन्याचा पुतळा आहे!" शंभर फुटी मूर्ती, मग देऊळ केवढे असेल? त्याचे शिखर खरोखर अभ्रंकष असेल. मंदिराचे स्थापत्य केवढे विशाल असेल. मूर्तीला साजेसे साजरे महाप्रमाण मंदिर, सहस्र खांबांचा सभामंडप असलेले.

काय झाले या मंदिराचे? शंभर फुटी शिवाचे? शंभर खंड! ते शेजारच्या विहिरीत पडले! तिचे नाव ज्ञानवापी! शेकडो दगड

पोटात रिचविणारी ज्ञानवापी. मंदिराच्या आणि मूर्तींच्या ठिकऱ्या उडविण्यासाठी अनेक मूर्तिभंजक मुसलमान आक्रमकांनी आपले हातोडे उगारले. पण औरंगजेबाजवळ विध्वंसाच्या भरीला विधायक कर्तृत्वही होते! त्याने मुळी मंदिराच्या छाताडावर एक भली मोठी मशीद बांधून ठेवली. त्या मशिदीच्या बांधकामासाठी मंदिराच्या प्राकाराचेच खंड त्याने वापरले. म्हणजे काय! मंदिराचे त्याने रूपांतर केले, झाले! बिचारा विश्वनाथ अनाथ झाला! पुढे अहल्याबाई होळकरणीने मशिदीशेजारी त्याला नवे मंदिर बांधून दिले. बाई दानशूर असली तरी तिची संपत्ती मर्यादित होती. त्या बेताने तिने एक छोटेखानी देऊळ बांधून दिले. शिखरासाठी सोन्याच्या गिलीटाचा पत्रा दिला महाराजा रणजितसिंगाने. आमचा अनादिअनंत अनाथ विश्वनाथ अठराव्या-एकोणिसाव्या शतकात या छोटेखानी देवडीत राहू लागला. याच्यापुढे शंभरफुटी मूर्तीचा अवतार घेणे त्याला पेलण्यासारखे नव्हते. म्हणून जमिनीसरपट पाण्याच्या कुंडात बुडी घेतलेले, लिंगरूप त्याने धारण केलेले आहे. भक्त काय! त्यांना काहीही चालते. त्या लिंगालाच गंगाभिषेक घालून शिळी फुले वाहून वर कुंडातल्या पाण्याचे तीर्थप्राशन करण्यात त्यांना धन्य वाटते. ईश्वराच्या त्या तीर्थात सर्व आधिव्याधींचे शमन करण्याची शक्ती असल्यामुळे, तीर्थात काय काय मिळू शकते हा विचार पाखंडीच! पण माणसाला नसली तरी नंदीला घडल्या प्रकाराची शरम वाटावी. मूळ मंदिरातला नंदी अजून आपल्या स्थानावर आहे तसा आहे. म्हणजे सध्याच्या देवाकडे त्याची चक्क पाठ आहे! त्याच्यापासून मीदेखील स्फूर्ती घेतली आणि पाठ फिरवली. एकादोघा पुजाऱ्यांनी साश्चर्य क्रोधाने पाहिलेही. पण 'शिवोऽस्मि बलवान् अहम्' हा मंत्र माझ्याजवळ होता.

मुख्य ते फसले! मग शेकडो मंदिरांकडे वळावेसे कसे वाटेल? विश्वेश्वराच्या शक्तीची, दुर्गेची नामांकित मंदिरे येथे आहेत. तेथे माकडांची गडबड असते. ती पाहायला लोक जातात. लालबुंद साहेबही तेथे जाऊन आपल्या पूर्वजांना भरवतात. त्यांचे फोटो घेतात. देवळाला नावच पडले आहे बंदरमंदर (Monkey Temple)! देऊळ गेल्या शतकातच बांधलेले असावे. हेच नव्हे तर काशीची जवळजवळ सगळी

देवळे अठराव्या शतकानंतरची आहेत, हे कळल्यावर सनातनत्वावर प्रेम करणाऱ्या भारतीय भाबडेपणाला कसेसेच वाटते! दुर्दैवाने अर्वाचीन तेवढे बेढब हा मंदिरस्थापत्यकलेचा इतिहास असल्यामुळे ही अर्वाचीनता अधिकच खुपते. बाराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत कितीतरी सुलतान काशी लुटून गेले. त्यांनी मंदिरे उध्वस्त केली. मूर्ती फोडल्या. तरी हिंदू मन मुर्दाड ते मुर्दाड राहिले! पण किती मुर्दाड असावे त्याने? मराठ्यांनी काशी केव्हाच आपल्या अमलाखाली आणली असती; पण काशीच्या पंडितांनी मराठ्यांना विनंती केली—काशी जिंकू नका! मुसलमान नाराज होऊन पुन्हा तुटून पडतील! तुम्ही आपले येत चला, यात्रेला आणि देवदर्शनाला. तुम्ही घाट बांधा, धर्मशाळा बांधा. पाठशाळांना वर्षासने द्या. पण राज्य करू नका! आमच्या मराठी मुंड्याही होकारार्थ हलल्या! शिंदे यांनी घाट बांधला. होळकरांनी देवळाचा उद्धार केला. पेशव्यांनी वर्षासने दिली. आमची काशी आपली परक्याची!

काशीतून विश्वनाथ उणे केला की उरते गंगा. नदीला इतके खेटून उभे राहिलेले शहर क्वचितच असेल. घाटाला लागून बांधलेले घाट, सारेच पवित्र! मनकर्णिका घाटावरच औरंगजेबाची मशीद आणि ज्ञानवापी. उभयविध पावित्र्य आहे! दशाश्वमेध घाटाला पौराणिक कथेचा घाट आहे. या घाटांवर आल्याशिवाय कोणत्याही हिंदूची 'पंचतीर्थ' यात्रा पुरी होत नाही. मानंदिर घाटावर राजा जयसिंगाची वेधशाळा आहे. शिंदाघाट शिंदेशाही आहे. साधा पण रेखीव. या शिवाय ब्रह्मघाट, दुर्गाघाट, एक ना दोन. हारीने बांधलेल्या या घाटांचे दर्शन घ्यावे नदीच्या पात्रातून. मात्र सावधान. या घाटाकडे तोंड करून नावेत बसावे आणि घाटच तेवढे पाहात जावे. तेथे 'अस्नान' करून 'अस्वच्छ' होणाऱ्या माणसांकडेही पाहू नये आणि गंगेच्या प्रवाहाकडेही! गंगेतून काय काय वाहात जाऊ शकते ते काशीलाच समजते! काशीतल्या सर्व गटारांचे प्रवाह तर गंगेलाच येऊन मिळतात. पशूंची प्रेते वहात जातात. त्यांच्या बरगड्या कुरतडत कावळे मजेत नौकाविहार करतात. हेही काहीच नव्हे. अर्धवट जाळलेली माणसांची प्रेतेही लोक खुशाल नदीत सोडून देतात. संपूर्ण

जाळण्याएवढे सर्पण कोण खर्च करणार ? त्यापेक्षा नावापुरता दहनविधी करून प्रेताला सरळ गंगेच्या हवाली करावे हे बरे! कधी कधी एवढेही करीत नाहीत. 'गंगे गोदे यमुने माझा नोहे तुझाचि हा बाळ' असे म्हणून 'स्वाधिन केला न लाविता जाळ' तर काय बिघडते! अशा तरंगत्या फुगलेल्या प्रेताला सोबत म्हणून, एखादे लाल आलवाणातले गाठोडे किंवा मडके लाटेवर हेलपटत जात असते. काशी आणि प्रयागच्या परिसरातील राष्ट्रीय हमरस्त्यावर एक विचित्र दृश्य केव्हाही दिसू शकेल. प्रेत सायकलीला बांधून किंवा सायकलरिक्षामध्ये आडवे टाकून गंगेवर नेले जाते. पवित्र गंगेवर. थेट स्वर्गात पोचवण्यासाठी. भलत्या मार्गाने प्रेत नेले, भलत्या ठिकाणी जाळले, टाकून दिले, पिण्याच्या पाण्यात टाकले तर त्याला जबर शासन करण्याची शिफारस करणाऱ्या चाणक्याला वंदन असो! आपल्या देशातल्या आधुनिक नगरपालिकांना हेही करता येऊ नये? गंगेत वाहात जाणाऱ्या प्रेतांची कोणी वास्तपुस्त करीत नाही. इथे खून करणे किती सोपे आहे! खून करावा आणि प्रेतासकट सगळा पुरावा गंगार्पण करून टाकावा. गंगेचे पात्र पाटण्याला सर्वांत रुंद, काशीला सर्वांत खोल आहे! तरी वेटी प्रेते तरंगत जातात! आपण त्यांच्याकडे पाहूच नये. कधीकधी वसकन् घाण येते. आपण नाक दाबून धरावे! नजर घाटांकडे लावावी... राजघाट, गायघाट, पंचतरणी घाट...सावकारांनी, दानशूरांनी बांधलेले हे स्वर्गसोपान...आणि हो! ईस्ट इंडिया कंपनीने पेन्शनीत काढलेल्या राजेरजवाड्यांनी बांधलेले घाट. या घाटांवर स्वातंत्र्याचे दहन झाले!

हे उत्तर प्रदेशीय संस्कृतीचे केंद्रस्थान. संस्कृत विद्येची उतारपेठ. इथे महामहोपाध्याय आणि कविराज, न्यायरत्न आणि अलंकारालंकार गल्लोगल्ली आहेत. आजही. ब्रह्मघाट-दुर्गाघाटावरून जाताना मराठी शब्द कानांवर येतील, दचकू नका. मराठी वस्ती भरपूर आहे इथे. इतकी की त्या वस्तीतले दूधवाले आणि धोबी-न्हावी आपल्या हिंदीला मराठी ठिगळे खुश्शाल लावतात. महाराष्ट्रीय शास्त्रीपंडितांनी गेली कित्येक शतके गुरुकुले चालविली आहेत इथे. बंगाली वस्तीही कमी नाही. पण ती भक्तांची, शाक्तांची. खरे म्हणजे सगळा हिंदुस्थानच येथे वानप्रस्थासाठी येतो. पण गंमत अशी की, इथेही भाषावार

राज्ये आहेतच. ज्याची त्याची वाडीवस्ती वेगवेगळ्या मोहोल्ल्यात! भारतमाता की जय! खरेच, या भारतमातेचेदेखील इथे एक मंदिर आहे, मंदिर बांधण्याचा उद्योग इथे भलताच लोकप्रिय आहे. बनारसला महामना मालवीयांचे भव्य स्मारक हिंदु युनिव्हर्सिटीच्या रूपाने प्रस्तुत आहेच. पण या सुव्यवस्थित विशाल विश्वविद्यालयाच्या केंद्रस्थानी विश्वनाथाचे नवे मंदिर उभे केलेले आहे. त्याचा खर्च मुख्यतः बिर्लांनी केलेला आहे. देऊळ अर्थातच भव्य आणि श्रीमंत आहे. संगमरवरी बांधकाम, त्यात रंगीत पाषाणांनी जुळवलेली चित्रे असा सगळा थाट आहे. "हिंदु-जैन-बौद्ध असे सत्तर कोटी आर्यधर्मी लोक जगात आहेत," अशी बिर्लाजींची श्रद्धा आहे, ती इथे पाषाणावर वज्रलेप केली आहे. पण इथे सर्व चित्रे इतकी बेंगरूळ आणि ओंगळ आहेत की ती सहन करणाऱ्या हिंदु विद्यापीठाच्या तितीक्षेचे कौतुक करावेसे वाटते! पुण्याच्या तुळशीबागेत भिंतीवर जी चित्रे चितारलेली असत ती बरी म्हणायची वेळ आहे! त्यांत कहर आहे गीतेचे महत्त्व पटवणाऱ्या चित्रांचा! भवसागरातून तारून नेणाऱ्या गीतारूपी नौकेत शंकराचार्य, रामानुज, टिळक, गांधी, मालवीय वगैरे मंडळी वल्ही मारीत आहेत आणि सुकाणू श्रीकृष्णाहाती आहे! कामक्रोधादी नक्र होडीवर हल्ला करीत आहेत इत्यादी! यातल्या टिळकांच्या प्रतिमेवर एखाद्या भिकार भटजीची कळा आहे तर गांधीजींवर लबाड शेटजीची! हेही पुरे न वाटल्यामुळे, या मंडळींची नावेही कोरून ठेवली आहेत त्यांच्या जवळपास! हरे राम! लक्षावधी रुपये खर्चून कुरूपता निर्माण करणाऱ्यांना शाप द्यावा की ती सहन करणाऱ्यांना!

काशी आणि वाराणसी एकच. पण 'बनारस' वेगळे. काशीतच वसलेले. बनारस म्हणजे पान. बनारस म्हणजे जर्दा, गुडगुडी आणि गुडाखू. मलमलीचा झब्बा. अत्तराचा फाया. जरीकाम आणि नक्षीकाम. बनारस म्हणजे मिठाई. पाकवलेली पकवलेली मलई. बनारस म्हणजे स्मरणातीत काळाचा क्षेत्रस्थ बाजार—पितळी भांड्यांचा, धूप आणि अगरबत्तीचा, संमिश्र गंधांचा, लस्सी-रबडीचा, खेळण्यांचा, गंडेदोरे-ताइतांचा, देवांच्या मूर्तींचा, गंगाजळाचा.

हा बाजार निरुंद गल्ल्यांतून, नागमोडी वळणांतून, फरसबंद वाटांतून,

सरावाच्या घाटांवरून भरलेला आहे. अडाणी आणि पंडित सगळ्यांनाच भूल घालणारा हा बाजार आहे. मंदिर फोडणाऱ्या मुसलमानांनाही हा उध्वस्त करता आलेला नाही. त्यांनी त्याला हातभारच लावला. किती जुना हा बाजार! ख्रिस्तजन्मापूर्वी, बुद्धजन्मापूर्वी हा बाजार होता. बनारसी शालू म्हणजे स्वदेशी मिंक कोटच! चंदनाची सुगंधी डूब देऊन बनारसी जरीचा शालू नेसण्याची थोरामोठयांची फॅशन होती एके काळी. राजपुत्र गौतमाने चाकरांना दान दिली ती वस्त्रे बनारसी होती. ही वासनेच भारतातल्या आणि परदेशातल्या बाजारात दिमाख दाखवीत असत. यूरोप खंडातल्या प्रासादांची शोभा त्यांनी वाढविली.

आजही या जरीकामाला तोड नाही. किनखापाचा जन्मच बनारसचा. देशातील धनवंतांनी यावे व उत्तमोत्तम वस्त्रें खरीदावी. अकबर बादशहा तर बनारसी कपड्यांवर निहायत खूष असे. इतका की, युरोपियन राजे-महाराजांसाठी तो बनारसी किनखापाच्याच भेटी पाठवी. आणि अगदी अलीकडेच एलिझाबेथ राणीला आपण कसली बरे भेट दिली? रेशीम आणि जर यांचा हा महाग संगम परवडला नाही तर यात्रेकरू तांब्या-पितळेच्या शानदार भांड्यांकडे वळतो. निदान एक लोटा तरी तो घेतोच. गंगाजळ पवित्र खरे, पण त्या पावित्र्याभोवती आवरण हवे बनारसी लोट्याचेच. त्यावरच्या नक्षीला, वेलपत्तीला, देवताप्रतिमांना जन्म देणारे मूळ कारागीर केव्हा जन्मलेले असतील? अनमान धपक्याने सांगायचे तर तीन हजार वर्षांपूर्वी! खरे म्हणजे हे नक्षीचे लोटेसुद्धा आपल्याला परवडत नाहीत. खैर! पण काय करावे? कुंजी गल्लीत वस्त्रांचे सौदे पाहावेत, नुसते पाहावेत! मुसलमान विणकर हातांत पेट्या घेऊन येतात. या जादूच्या पेट्यात नानावर्णी, झळझळीत सुवर्णमुद्रा मिरवणाऱ्या साड्या असतात.


ठठेरी बाजारातले चाणाक्ष हिंदू बनिये जाणकाराच्या चपळाईने मालाकडे दृष्टिक्षेप करतात आणि किंमत ठरवतात. 'बोलो जी, कितना दाम?' 'एकसो पचास जी.' 'सवासो?' 'नही जनाब.' 'उठाओ.' 'एकसो तीस देओ जी', 'अच्छा रखो!'–हे सारे गिऱ्हाइकाच्या देखत होते. मग रुपयावर एक आणा फायदा घेऊन बनियाने गिऱ्हाइकाला माल देऊन टाकायचा. हा सारा व्यवहार फक्त सायंकाळी

दोन तास होतो. पंचक्रोशीतले शेकडो विणकर रोज येतात आणि परततात. कधी माल विकून, कधी तसाच परत घेऊन जातात. आपण आपले नुसतेच बघायचे. डोळे पेटवायचे आणि निववायचे. कृशकटी सुंदरींनी आपल्या गौरहातावर घेतलेले सणंग न्याहाळायचे; त्यांचे हसणे, खिदळणे, ऐकायचे! मग त्याच धुंदीत निघायचे आणि थोडी निष्पाप थंडाई झोकायची. पकवलेली मलई खायची. मग एक नाजुक पान कडक तंबाकूबरोबर ठेवून घ्यायचे! किमामी मुखगंध अनुभवीत फुलबाजारात जायचे. फुले पाहायची — ठठेरी बाजारांत सणंग पाहिले तशीच. षोकच करायचा तर गजरा घ्यायचा. डोळ्यात सुरमा घालणे आपल्याला बापजन्मात जमणार नाही. पण अत्तराचा फाया निषिद्ध नाही. मग कबीर चौराह्याच्या दिशेने निघायचे. सिद्धेश्वरीबाई, बिस्मिल्ला इत्यादी मातब्बर बनारसचेच. तेथवर वगवशिल्याने जाता आले तर उत्तमच. इतके न जमले तरी जिथे तबला घुमत असेल, घुंगरू किणकिणत असतील, तेथे रेंगाळायला हरकत नाही.

किती जुने शहर हे! कसे मुरलेले. त्याला कशाची घाई नाही. संथ वाहाते आहे हे शहर, गंगेसारखे. हे वाढले आहे हवे तसे. इथल्या वाड्यामाड्यांची पडझड निसर्गक्रमानुसार होते आणि निसर्गक्रमानुसारच त्यांना नवे अवयव फुटत जातात. हे शहर एक जंगल आहे. पण याला हिंस्र रूप नाही. हे एक आळसाचे, सुस्तीचे, खुषीचे जंगल आहे. इथे प्राचीन आर्य झेपावले आणि स्थिरावले. इथे मंदिरे उभी राहिली. बुद्ध इथेच आला आणि निवाला. इथे बुतशिकन हातांनी मोडतोड केली. इथे ब्रह्मदत्तापासून चेतसिंगापर्यंत राजे मृगया करून गेले. इथे मुसलमानांच्या प्रमाथी रक्तावरूनही गंगेने शीतल हात फिरवला. इथे इंग्रजांची मिजासही मिरवली आणि थंड झाली. बिझांटबाईंनी इथे आश्रम उभारला. अजूनही किती वारे, किती वादळे येतील-जातील. घरे पडतील-झडतील उभी राहातील, पिढ्या नांदतील, गुढ्या वरखाली होतील. पण इथल्या संथपणाला, आळसाला, खानदानीला, खुशबूला, कथ्थकच्या झंकाराला, जरतारी वैभवाला, मलमली नजाकतीला, नक्षीच्या टोपीला, पान-किमामाला, वेदघोषाला आणि ठुमरीला खळ म्हणून पडणार नाही — गंगेच्या प्रवाहाला खळ नाही तसा!



# बारा गावचं पाणी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ दि: ..................
क्रमांक नों: दि: ..............

माझा जन्म कऱ्हाडला झाला. शिक्षण पुण्यात. घर तर चक्क सदाशिव-पेठेत. त्या मानाने मी बरेच देशाटन केले! या ना त्याप्रसंगाने इकडे तिकडे प्रवास घडला होता; पण 'रात्रंदीस आम्हा यात्रेचा प्रसंग' असे गतवर्षी झाले. शाळकरी वयात भूगोलदेखील काव्यात्म वाटे. हिमालय हा शब्द कानांवर पडला की मन थरारून जाई. काश्मीर ते कन्याकुमारी आणि अटक ते कटक, हे दोन मंत्र उच्चारताना भलतेच उदात्त काहीतरी वाटे! गंगायमुना या तर देशाच्या नीला-रोहिणीच. पण त्यांच्याहून लहानसहान नद्या-निर्झरिणीदेखील विराट पुरुषाच्या नसांसारख्या वाटत. शहरांच्या नामोच्चारासरशी मनामध्ये मुलुखावेगळे संगीत थरारून उठे. इतिहासाने गुंफलेली महावस्त्रे धारण करून, झाशी-दिल्ली-कानपूर-कलकत्ता असली नगरे रुद्राग्रात उभी राहात. सुजला सुफला मलयजशीतला अशी भूमी डोळे भरून पाहायची इच्छा उसळेच, पण कच्छचे रण, थरचे वाळवंट, नेपाळ-आसामची दलदल...सगळे सगळे अनुभवावेसे वाटे. आणि हे सारे मला एका घासात हवे होते. चिमटीने काही उचलणे मला जमत

नाही. मी घेतो तेव्हा बचकेने घेतो. देतो तेव्हाही ओंजळ ओसंडावी असे मला वाटते. पाचपन्नास मैलांचा प्रवास म्हणजे मला अगदीच पोरकट वाटतो. चारी खूर बांधून ठेवल्यावर त्या टाणबंद घोड्यावर स्वार होण्यात कसली आली आहे गंमत? आपल्या मागचे व्याप, आपल्या पुढचे व्यापारव्यवहार, आपल्या आतल्या चिंता यांची बोचकी घरात ठेवून, फुटेल त्या वाटेने दीर्घ दीर्घ प्रवास, दीर्घ दीर्घ काळ करावा हेच खरे.

हे मला लाभले. माझी यात्रा पूर्ण निष्काम होती. मला कसलाही अभ्यास करायचा नव्हता. वरकांती सोंग म्हणून मी साहित्यिकांच्या भेटी घेतल्या, लोककलांची पूसतपास केली, राजकारणाची चाहूल घेतली आणि सामाजिक संस्थांचा परिचय करून घेतला. पण अंतर्यामी इच्छा एकच होती. भिन्नाट फिरायचे, पटेल तसे. अंगाला हजार डोळे असल्यासारखे ह्या देशाकडे पाहायचे. ही सृष्टी साठवीत जायचे. माझा देश! याची गाणी मी म्हटली. याची गाणी मी रचली. ही माझी भूमी, निर्वेधपणे वहिवाटण्यासाठी मिळालेली.

मी खूप हिंडलो. वर्षभरात छत्तीस हजार मैल! दिवसाला शंभर मैल असा हिशेब झाला हा. हा हिशेबदेखील अलीकडे केला. यात्रेच्या वेळी फक्त यात्रा केली. देशाची यात्रा, दिशांची यात्रा, चारी धाम यात्रा! काश्मीर-लडाखचे पहिले तीर्थ. आसामचे दुसरे. तिसरे कन्याकुमारीचे. आणि शेवटी वेरावळ-पोरबंदरचे. भारतीय समाजाची ही नवी क्षेत्रे. या दिगन्त यात्रेत मी कृतार्थ झालो. डोळे उघडले, नवे फुटले. कानात आणि मनात खूप साठवले. धुळीने नित्यस्नान केले. वाऱ्यापावसाने झोडपून काढले. झेलम-सतलज यांचे तुषार मी अंगावर घेतले. यमुनेने सावळ्या रसवृत्ती जोपासल्या. मी कितीदा तरी गंगापार झालो! मी ब्रह्मपुत्रेशी सलगी केली. महानदी, सुवर्णरेखा, ब्राह्मणी, गोदा, कृष्णा, तुंगा, कावेरी, पेरियार – सारे प्रवाह माझ्यावरून वाहात गेले. मी किती जलाशयांत डोकावलो. मी किती धबधब्यांचा आवेश पाहिला, आक्रोश ऐकला. समुद्राच्या अखंड असून भिन्न वाटणाऱ्या पाण्यात डुंबलो. वने व उपवने, राजमार्ग तशा करडूवाटा, राई आणि तराई, माळ आणि वाळवंटे, उंच उंच डोंगर आणि

खोल खोल भोवळदऱ्या, मंदिरे, लेणी, शिलालेख, जयस्तंभ, वेधशाळा आणि नृत्यशाळा, इतिहासपूर्व मानवाच्या गुहा-गुंफा आणि उद्याच्या मानवाची गर्भागारे, महापुरुषांच्या पर्णकुट्या आणि क्षुद्र श्रीमंतांचे आरसेमहाल...कितीतरी विचित्रे मी पाहिली. काही आठवते. बरेच आठवत नाही. पण जे आठवत नाही तेही जवळ असतेच. कधी आज्ञा करताच ते कामी येईल. कधी दत्त म्हणून पुढे उभे राहील. काही काही कधीच आठवणार नाही. पण तेही कशात तरी, कसे तरी विरघळलेले असेल. मोत्याच्या मूलकणीवरचा प्रत्येक थर वेगळा थोडाच काढता येतो?

या प्रचंड चित्रात काही बिंदु पक्के ओळखीचे झाले आहेत. या भूमिरूपी सागरातली ती बेटे आहेत. वाटांच्या लाटांवर झुलता झुलता डोके गरगरू लागले की, या बेटांवर आसऱ्याला जावे. 'कुठेतरी दूर दूर' जाऊ पाहाणाऱ्या कविमनालादेखील, अज्ञात का होईना पण 'ठिकाण' लागतेच. चिमणे का होईना पण खोपट हे पाहिजे असतेच. विजनातून हिंडावे, वैराणात वणवण करावी, मनाचा ब्रेक तोडून वाटभर घरंगळावे, पण वसतीला वाडी हवीच! शेवटी जनात जावेसे वाटतेच आणि हे हवे तर जनपदे हवीत. खेडी आणि कुग्रामे, नगरे आणि महानगरे सगळी आसऱ्याची बेटे असतात. काही वावभर खडकाएवढी छोटी तर काही एकेका देशाची वसणूक करावी एवढी मोठी; काही खेडी काही महानगरे, पण सगळी आसऱ्याची बेटेच. काही बेटे निवांत, काही गजबजलेली. काही लख्ख, काही काळी. काही बरड, काही नित्य हिरवी. काही प्रवाळाची, काही शेवाळाची. पण सगळी अशी ना तशी, कधी ना कधी, कुणा ना कुणाला आसरा देतात. उपाशीतापाशी मुशाफराला उनउनीत घास घालतात. निदान त्याच्या एकाकी मनाची थरथर थांबेल एवढी ऊब देतात. म्हणून रानावनांइतकीच या गावांची मला ओढ आहे. विजनातून फिरत फिरत मला जनात जावेसे वाटते ते यामुळेच.

निसर्ग नावाची माणूसद्वेष्टी शक्ती मला आवडत नाही. खरे म्हणजे निसर्गाचीच निर्जन व सजन अशी दोन रूपे असतात असे मला वाटते ...की निर्जन रूप नसतेच? निर्जन रूप कोणी पाहिले आहे? ज्या क्षणी पाहाणारा तिथे जातो त्या क्षणी तेथली निर्मनुष्यता संपत नाही

का? निसर्गाला भव्यता वा क्षुद्रता, उग्रता वा सौम्यता, सुंदरता वा कुरूपता बहाल केली ती आम्ही, माणसांनी! पण माझा विचार याच्याही पुढे जातो. तो असा की सगळ्या वाड्यावसत्या आणि गावे-नगरे हादेखील निसर्गच आहे! हा निसर्ग कसा ते समजायल सूक्ष्म देह धारण करून जरा उंचावर जायची सिद्धी हवी.

डोंगराच्या उतारावरून पाऊसपाणी वाहिले की माती दरीच्या तळाशी साचते आणि तळ कसा हिरवागच्च होऊन जातो. नदीचा पूर ओसरला की मागे रेंगाळणारा गाळ तिथेच मख्खपणे बसतो आणि त्याच्यावर मळीतली कवळी गोड कणसे धरतात. रखरखत्या वाळवंटात कुठेतरी झिरपते, तिथे चार बुटबैंगण झाडे वसती करतात. खडकांच्या आडोशाला पाणी लपते, साचते, कुजते, वर साय धरते, शेवाळ दाटत जाते, तिथे जीव खसफसू लागतात. आपली माणसांची वसती तरी काय ही अशीच जमते, वाढत राहाते. कुठून कुठून प्रवाह येत असतात, स्थिरावतात, कधीं साचेबंद होतात, कुजतात, मोडतात, पुन्हा भरतात. भुकेची पराणी लागून धावणारी माणसे, हिंस्र अशा स्वव्रांधवांना भेदरलेली माणसे, आपल्या गोतावळ्याच्या पोटात दोन घास ढकलता यावे म्हणून मिळेल त्या जमिनीची शिकार करायला निघालेली माणसे, केवळ दाटीवाटी झाल्यामुळे कढईच्या बाहेर पडून ओघळत राहिलेले प्रवाह, त्यांचे पडलेले बुंद, त्यांवर धरणाऱ्या बुरशा, त्यांत वाढणारी गजबज! ही खेडी, ही गावे, ही नगरे. काही खबदाडातली हिरवळ, काही वैराणातील ओल, काही युगायुगांच्या रवेदार गाळावर पोसलेली हिरवीकंच राने. काही ओघ हिमालयाच्या खिंडीतून हळूहळू खाली सरकले. काही खैबरच्या दारातून घुसले. काही वाळवंटातून झिरपले. जमेल तेथे स्थिरावले, वाढले. काही थेट दक्षिणेपर्यंत घसरत गेले आणि तिथल्या अगाध काळ्या डोहांना मिळाले. हे डोहदेखील केव्हा ना केव्हा अशाच वाहाणाऱ्या प्रवाहांनीच बनले होते.

या ना त्या प्रकारे या माणसांचे पुंज बनले, या किंवा त्या आकाराचे. त्यातूनच घडली ही विचित्र बेटे. ही अनेकदा फुलली, फळली. अनेकदा इथे पानगळ झाली, पालवी धरली. इथले प्रत्येक घर म्हणजे एकेक झाड आहे, प्रत्येक वर्षाचा एक नवा थर याच्या खोडावर

आहे. या झाडांचे सम किंवा विषम प्रकार दाटीवाटीने वा विरळतरळ उभे असतात, पडतात, झडतात, घेरले जातात. कोणी महावृक्ष होईतो जगतात, कोणी अकाली खुरटतात, मरतात. काही गावे राईसारखी, काही वेतसबनांसारखी. काही जंगले, काही उद्याने. कुठे एकाच गावात इथे कळकी तर तिथे केतकी, इथे वड तर तिथे फड्या निवडुंग अशी दृश्ये दिसतात; तर कुठे सबंध वस्ती कशी आमराईसारखी नागर, डौलदार, डेरेदार, पोसलेली, ठाकठीक आणि गारेगार असते. ही सृष्टी पाहायला हवी, तटस्थपणे पण फटकून दूर न जाता !

मी या सृष्टीतही रमतो. कशी एकेक गावे-नगरे ! काही नदीच्या एका काठावर राहून दुसऱ्या काठाची मशागत करणारी. काही दोन्ही तीरांवर पंखांसारखी पसरलेली. काही तीरावरच नव्हे तर प्रत्यक्ष प्रवाहावरही वसलेली ! काही डोंगरांच्या उतारावर संथपणे रवंथ करीत बसलेली. काही संकोचाने दरडीआड वस्त्रांतर करणारी. काही एखाद्या गोत्रपुरुषासारखी भव्य आणि उदार. काही कशी कंजुष आणि कर्मदरिद्री. काही मधमाशांच्या प्रचंड पोळ्यासारखी—गजबज गजबज करणारी, काही कोळ्याच्या जाळ्यांइतकी निवांत. काही नेहमी पाणथळीत राहिल्यासारखी गप्पगार निवलेली. काही धगधगत्या भट्टीसारखी रात्रंदीस पेटलेली. काही स्वतःवर लोभावून स्वतःमध्ये रमलेली. काही विमनस्कपणे दूर टक लावणारी. काही उठवळ, काही गरती ! काही भव्य दिव्य पर्वतांच्या आश्रयाला गेलेली, काही मानीपणाने पूर्ण दिगंबर ! काही गर्भश्रीमंत काही नवश्रीमंत. काही राजाश्रयावर माजलेली, काही लोकाश्रयावर ! काही, काही केले तरी दरिद्रीच वाटणारी ! काही चिरतरुण, चिरसुंदर, चिरसस्मित. प्रत्येकाचा वेगळा सूर, वेगळा नूर. प्रत्येकाचा वेगळा गंध, वेगळा छंद. क्वचित भावंडांसारखा तोच तोंडवळा, पण स्वभाव भिन्न. प्रत्येक ठिकाणी भाकरीची चव वेगळी, पाण्याचे वजन वेगळे. 'लक्ष चौऱ्यांऐशी ठसे, वेगळाले केले कसे,' म्हणून 'देव रंगारी' म्हणणाऱ्या नामदेवाप्रमाणे आपणदेखील रंगारी मानवजातीने रंगवलेली ही परस्परभिन्न विचित्रावली पाहून स्तिमित होतो.

या गावांचे वेगळेवेगळे पाणी मला दिसले. मी मनाची कावड भरून घेतली. डोळ्यांच्या शिंपलीत ते मावेना. ते अंगातच भिनले.

त्याने मला केवढे तरी बडबडायला लावले. अशा वेडाला उतारा एकच. हे वेड वाटून द्यावे, श्रोत्यांमध्ये, वाचकांमध्ये !

मुशाफरीने माणूस माणसाळतो. तो आपला शिकारी स्वार्थ आणि दुष्ट पूर्वग्रह सोडून देतो. जेवढ्या नद्या तो ओलांडतो तेवढ्या खंदकांच्या पलीकडे जातो. जेवढ्या राज्यांच्या सीमा तो उल्लंघून जातो तेवढे तट तो मोडून टाकतो. जेवढी क्षितिजे तो छेदतो तेवढ्या त्याच्या शृंखला तुटतात. आणि जेवढ्या शहरा-गावांतून तो राहातो तेवढी नवी दालने त्याच्या वाड्यात उगवतात. जिकडे जातो तिकडे त्याला भावंडे दिसतात. जमेल तेथे तो खूण जमवतो. मिळेल ते पाणी पितो. बारा गावचे पाणी पितो म्हणजे वारा पितो, जन्मभर वासरासारखे बागडण्यासाठी !

REFBK-0013679